शास्त्र
७३६

म. ग्रं. सं. ठाणें
विषय शास्त्र
सं. क्र. ७३६

# सुलभ अर्थशास्त्र

पुरुषोत्तम-साठे

# सुलभ अर्थशास्त्र.

लेखक

पुरुषोत्तम बाळकृष्ण साठे
बी. ए. एल्एल्, एम्. उमरावती.

ग्रेट ब्रिटनचा इतिहास, १९२४ चा महाराष्ट्र, चहाच्या पेल्यांतील वादळ (कादंबरी), पुष्पगुच्छ (गोष्टी), झुकती दुनिया (कादंबरी), Lectures on the Law of Constitution, Evolution of the Indian Constitution इत्यादि ग्रंथांचे लेखक.

किंमत १। रुपया.

जून १९२५.

प्रकाशकः—पुरुषोत्तम बाळकृष्ण साठे
बी. ए. एल्एल्, एम्. उमरावती.

[ कर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. ]

मुद्रकः—गणेश काशिनाथ गोखले,
सेक्रेटरी, श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स
४९५-४९६ शनवार पेठ, पुणें शहर.



उदयोन्मुख महाराष्ट्रास–

समर्पण.

ग्रं. क्र.

# वाचकांशीं हितगुज.

मी उमरावतीस वकीली करावयास आलों, त्याच वर्षी उमरावतीच्या वऱ्हाड शाळापत्रकाच्या संपादकांनीं त्यांच्या मासिकाकरतां मी एखादा लेख लिहावा अशी आपली इच्छा माझेजवळ प्रकट केली; व त्यांच्या इच्छेस मान देऊन मी त्यांचेकरतां अर्थशास्त्रांतील एका विषयावर एक लेख त्या वेळीं लिहिला. त्यानंतर त्याच तऱ्हेचे एक दोन लेख मी शाळापत्रकाकरतां लिहिले. हे लेख वाचल्यानंतर नागपूरच्या 'उद्यम' मासिकाचे कर्तृत्ववान संपादक रा. रा. नानासाहेब पाध्ये यांनीं मी अशा तऱ्हेचे निरनिराळ्या विषयावर लेख लिहिण्यापेक्षां सुसंबद्ध अशी एक लेखमालाच लिहावी व अशा तऱ्हेनें सोप्या व सुलभ भाषेंत महाराष्ट्रांतील वाचकवर्गाला अर्थशास्त्रासारख्या महत्त्वाच्या विषयाची ओळख करून द्यावी असें मला सुचविलें. रा. नानासाहेब पाध्ये यांचे सूचनेप्रमाणें मी सुलभ अर्थशास्त्र लिहिण्यास घेतलें, व त्याचीं पहिलीं सात आठ प्रकरणें 'उद्यम' या मासिकांत प्रसिद्धही झालीं आहेत. हीं प्रसिद्ध झालेलीं प्रकरणें लोकांना बरींच आवडलीं असें समजल्यावर मला हें पुस्तक पुरें करण्यास जास्त उत्साह वाटू लागला, आणि त्याचें, दृश्य फल म्हणजे आजचें हें पुस्तक मी वाचक वर्गापुढें ठेवीत आहें हें होय.

तसें पाहू गेलें असतां मराठी भाषेंत अर्थशास्त्रावर फारशीं पुस्तकेंच नाहींत. त्यांतल्या त्यांत नांव घेण्यासारखें पुस्तक म्हटलें म्हणजे प्रोफेसर भाटे यांचें "अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें" हें होय. आणि मला माझें पुस्तक लिहितांना त्या पुस्तकाचा पुष्कळ उपयोगही झाला आहे.

सध्यां महाराष्ट्रांत नुसत्या कादंबऱ्या व नाटकें यांचाच सुळसुळाट झाला आहे. या गोष्टीचीं कारणें कांहींही असोत, पण असें आहे ही गोष्ट दुर्दैवानें खरी आहे. या परिस्थितीबद्दल वाचक वर्गाकडे थोडाबहुत दोष आहे हें जितकें खरें आहे, तितकेंच लेखकवर्गाकडेही त्या दोषाचा कांहीं

वांटा जातो हेंही खरें आहे. इंग्रजींत Popular Series सारख्या ग्रंथमालांत शास्त्रीय विषय अगदीं सुलभ भाषेंत लोकांना समजावून दिलेले असतात व ते इतक्या सुलभ भाषेंत व मनोरंजक रीतीनें लिहिलेले असतात कीं, तें पुस्तक वाचावयाला घेतलें कीं वाचकाला त्याच्या इच्छेविरुद्ध त्यांत गोडी लागते; व त्यांतील माहिती वाचकाला आपोआप होते. एकदां शास्त्रीय विषयाची गोडी वाचकाला लागली कीं मग तो त्या विषयावरचे दुसरे ग्रंथ आपोआपच वाचूं लागतो. दुर्दैवानें सध्यां महाराष्ट्रांतील विद्वानांनीं या विषयाकडे आपलें पाहिजे तितकें लक्ष दिलेलें नाहीं. मराठी भाषा ज्यांनीं अगदीं करतलमलवत् करून टाकली आहे अशा विद्वान् साहित्यसेवकांनीं हें काम अंगावर जर घेतलें तर लोकशिक्षणाचें काम सुकर होणार आहे. पण सध्यां तरी 'साहित्य' याचा अर्थ ललितवाङ्गमयापलीकडे जात नाहीं; ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

अर्थशास्त्रावर असें पुस्तक लिहावयाचें मी ठरविलें खरें; पण पहिल्याप्रथमच पारिभाषिक शब्दांची अडचण दत्त म्हणून उभी राहिली. थोडेबहूत शब्द मी प्रोफेसर भाटे यांच्या पुस्तकावरून घेतले आहेत; पण पुष्कळ ठिकाणीं मी इंग्रजी शब्दच वापरले आहेत. सोप्या इंग्रजी शब्दाला एखादा बोजड शब्द साध्या मराठी वाचकांचे पुढें ठेवून सर्वच विषय दुर्बोध करून ठेवण्यापेक्षां सुटसुटीत इंग्रजी शब्दच आपण घेऊन त्यालाच मराठी बनवून टाकावा अशा मताचा मी आहें. 'कोट' 'टेबल' अशांसारखे अस्सल इंग्रजी शब्द आतां पूर्णपणें मराठी झाले आहेतच कीं नाहीं? मग आमच्या अर्थशास्त्राच्या इंग्रजी शब्दांनींच असें काय पाप केलें आहे कीं त्यांना आम्हीं 'मराठी करुन' घेऊं नये?

जेथें मराठींत किंवा संस्कृत भाषेंत सुलभ शब्द सांपडतील तेथें आपले शब्द जरूर वापरावेत. पण तसे शब्दच नसले किंवा असूनही फारच बोजड असले तर इंग्रजींतल्या शब्दालाच मराठा करून घेणें जरूर आहे असें मला वाटतें. परधर्मांतला मनुष्य जर हिंदु धर्मांत घेतला जातो तर परभाषेंतल्या शब्दांना मराठी करून घेण्याला काय हरकत आहे?

अर्थशास्त्राची सांगोपांग माहिती द्यावी हा हें पुस्तक लिहिण्यांत लेखकाचा हेतु नाहीं. 'अर्थशास्त्र' म्हणतांच लोकांनीं बुजगावून न जातां त्यांत आहे तरी काय हें पहाण्याची त्यांना इच्छा व्हावी येवढाच लेखकाचा हें पुस्तक लिहिण्याचा हेतु आहे. संभाषणरूपानें पुस्तक लिहिण्याचा हेतु, हा विषय मनोरंजक व्हावा हा आहे. प्रस्तुत लेखक अर्थशास्त्राचा एक विद्यार्थी आहे. इ० स० १९१८ सालीं नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजमध्यें असतांना त्या वेळचे अर्थशास्त्राचे प्रोफेसर मॅक फेडियन ( Mc. Fadyeu) हे फारच सुबोध इंग्रजी भाषेंत हा विषय समजाऊन देत असत. त्यामुळेंच लेखकाला या विषयांत गोडी वाटूं लागली. प्रोफसर मॅक फेडियन हे सध्यां हिंदुस्थानांत नाहींत; पण त्यांच्या एका विद्यार्थ्यानें मराठींतही "सुलभ अर्थशास्त्र" लिहिलें आहे हें ऐकून त्यांना खात्रीनें आनंद वाटेल.

हें पुस्तक म्हणजे अर्थशास्त्राचा पहिला भाग आहे. अशा तऱ्हेचे आणखी तीन चार भाग सहज होतील. हें पुस्तक जर वाचकांना पसंत पडलें तर पुढचे भागही वाचकांना सादर करण्यांत लेखकाला खात्रीनें आनंद वाटेल. महाराष्ट्र-साहित्याची ही अल्पशी सेवा उद्ययोन्मुख महाराष्ट्रास पसंत पडेल अशी उमेद आहे.

मी अर्थशास्त्रावर पुस्तक लिहीत असतांना पुष्कळांना ही कल्पनाच आवडली नाहीं. अशा वेळीं मी पुष्कळ वेळां निराश होऊन लेखन टाकूनही दिलें होतें. पण रा. रा. नानासाहेब पाध्ये, रा. अण्णासाहेब ओक ( उमरावतीच्या नॉर्मल स्कूलचे सुपरिंटेंडंट ) कु. द्वारकाबाई भालचंद्र व सौ. ताराबाई साठे इत्यादि मंडळींनीं मला उत्तेजन देऊन माझ्याकडून हें काम पूर्ण करून घेतलें. या मंडळींचे नुसत्या शब्दांनींच आभार मानण्यापेक्षां आज मी जास्त काय करूं शकणार? उमरावतीच्या नार्मल स्कूलच्या विद्यार्थ्यांचाही मी त्यांनीं मला दिलेल्या उत्तेजनाबद्दल आभारी आहें.

त्याचप्रमाणें पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजमधील 'अर्थशास्त्र' या विषयाचे अध्यापक प्रोफेसर कर्वे यांनीं आपलेपणानें माझें पुस्तक वाचून

पाहिलें व वेळोवेळीं महत्त्वाच्या सूचनाही केल्या ह्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

श्री गणेश प्रिंटिंग वर्क्सच्या मंडळींनींही मला पुष्कळ मदत केली व अल्पावकाशांत माझें पुस्तक तयार करून दिलें. रा. चिन्तोपंत कोल्हटकर, श्री गणेश प्रिंटिंग वर्क्सचे सेक्रेटरी रा. गोखले, व मॅनेजर रा. गानू यांनीं मनावर घेतल्यामुळेंच हें पुस्तक इतक्या लवकर वाचकांचे पुढें मला ठेवतां येत आहे. या सर्व मंडळींचा मी फार आभारी आहें.

माझा हा अल्प प्रयत्न कितपत सिद्धीस गेला आहे हें ठरविण्याचें काम महाराष्ट्रांतील वाचक वर्गाचें आहे.

अनसूयासदन,<br>
उमरावती.<br>
माहे मे १९२५ इ.

**पुरुषोत्तम बाळकृष्ण साठे.**

# अनुक्रमणिका.


| प्रकरण. | पृष्ठें. |
|---|---|
| १ अर्थशास्त्राचा नसता बागुलबुवा.... ... | १–९ |
| २ संपत्ति, संपत्ति ती काय ? ... ... | १०–१५ |
| ३ संपत्तीची उत्पत्ति, विनियोग विनिमय आणि वांटणी | १६–२२ |
| ४ संपत्तीच्या उत्पत्तीचीं चार कारणें.... ... | २३–३२ |
| ५ उत्तमराव देशमुखांची जमीन. ... ... | ३३–३७ |
| ६ उत्तरत्या पैदाशीचा सिद्धान्त. ... ... | ३८–४४ |
| ७ श्रम ... ... ... ... | ४५–५३ |
| ८ लोकसंख्येची वाढ व मालथसचें भाष्य. ... | ५४–६४ |
| ९ गणबाची हकीकत. ... ... ... | ६५–७३ |
| १० बॅरिस्टर भालचंद्र यांची मुलाखत. ... | ७४–८१ |
| ११ भांडवल. ... ... ... ... | ८२–८८ |
| १२ धंद्यांतील शिस्तवार मांडणी म्हणजे काय ? ... | ८९–९७ |
| १३ श्रमविभाग व त्या दृष्टीनें यंत्रसामुग्रीचा उपयोग. | ९८–१०४ |
| १४ धंद्यांतील यशाची गुरुकिल्ली. ... ... | १०५–१११ |
| १५ माणेकजीशेट यांची मुलाखत ( पुढें चालू ) | ११२–११९ |
| १६ संपत्तीच्या उत्पत्तीचें शेवटलें प्रकरण. ... ... | १२०–१२४ |


## पुस्तक दुसरें.


| | |
|---|---|
| १७ मनुष्याच्या गरजा. ... ... ... | १२७–१३३ |
| १८ आवश्यक वस्तु, समाजानें जरूरीच्या ठरविलेल्या वस्तू व चैनीच्या वस्तू. ... ... | १३४–१३९ |
| १९ उतरत्या उपयुक्ततेचा सिद्धांत. ... | १४०–१४५ |
| २० जगूचा बाजार. ... ... ... | १४६–१५३ |

# सुलभ अर्थशास्त्र.

## प्रकरण पहिलें.

## अर्थशास्त्राचा नसता बागुलबोवा.

२८५१

आप्पासाहेब देशमुख हे माझे अगदीं जीवश्चकंठश्च मित्र आहेत ह्याबद्दल लोकांना खरोखरच आश्चर्य वाटतें आप्पासाहेब हे आमच्या गांवच्या श्रीमंत दादासाहेब देशमुख यांच्यासारख्या अती धनाढ्य सावकाराचे चिरंजीव. दादासाहेबांचे वऱ्हाडांत कितीतरी इजारे गांव आहेत व त्यांचें देणेंघेणेंही पुष्कळ आहे. आप्पासाहेब अशा तऱ्हेचे लक्ष्मीपुत्र, तर मी थोड्याशा वडीलार्जित शेतीवर उपजीविका करणारा शेतकरी; आणि तरीही आम्हीं मित्रच आहोंत, आप्पासाहेब हे गेले वर्षींच अलाहाबाद विश्वविद्यालयाची इंटरची परीक्षा पास होऊन नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजांत बी. ए. चा अभ्यास करीत आहेत. बी. ए. करितां त्यांनीं अर्थशास्त्र हा विषय घेतला आहे. अर्थशास्त्र ह्या विषयाचा त्यांना अगदीं नादच आहे असें कां म्हणा नात घटकाभर. अर्थशास्त्रासंबंधीं निरनिराळ्या मतांच्या ग्रंथकारांचे ग्रंथ ते वाचीत असतात, येवढेंच नव्हे तर त्या विषयासंबंधानें ते स्वतः विचारही करीत असतात, गणबा, हरबा माळी, विठु कोष्टी जानू कुंभार यांच्यासारख्या लोकांशीं बोलून त्यांचेकडून त्यांचे धंद्याची माहीति करून घेतांना पाहून मला आप्पासाहेबांचें कौतुक वाटतें.

आप्पासाहेबांचे संबंधानें येवढी माहीति सध्यां पुरे. त्यांची जास्त स्तुति केली तर त्यांना ती आवडणार नाहीं. आणि नाहींतरी मी माझ्या वाचकांना त्यांची जास्त ओळख हळुं हळुं करून देणारच आहें

गेल्या उन्हाळयांतील गोष्ट. मी बहुतेक दररोज सकाळीं आप्पासाहेबांकडे जात असें. उन्हाळयाचे सुटीत आप्पासाहेब घरीं आलेले; तेव्हां त्यांचे संगतीचा लाभ मी थोडाच चुकविणार! शक्य तेवढा जास्त वेळ मी त्यांचे संगतींत घालवी, आणि एखादी गोष्ट कितीही कठीण असली तरी ती अगदी सोप्या शब्दांत सांगायची आप्पा साहेबांची हातोटी कांहीं विलक्षणच एके दिवशीं सकाळीं मी गेलों तेव्हां आप्पासाहेब सकाळचा फराळ आटोपून आपल्या दिवाणखान्यांत वाचीत बसले होते.

"काय आप्पासाहेब" मी म्हणालो "तुम्ही सुटींत देखील कसला अभ्यास करतां बुवा? सगळया वर्षभर अभ्यास केल्यावर उन्हाळयाच्या सुटीत हक्कानें चैन करायची नाही तर ती करायची तरी केव्हां? बरं, ते राहूं द्या. पुस्तक तरी कोणतें वाचतां आहात तुम्हीं सध्यां? अर्थशास्त्रावरचेंच असेल एखादें; नाहींतर काय! तुम्हांला कीं नाहीं आप्पासाहेब या अर्थशास्त्राचें जवळ जवळ वेडच आहे म्हणाना.

आप्पासाहेबांनीं आपलें पुस्तक टेबलावर ठेवलें व म्हणाले, "तुम्ही तरी बाबूराव असे आहांत! मी हीं पुस्तके वाचतों तीं परीक्षेकरितां वाचतो अशी तुमची कल्पना आहे का? परीक्षेंत पास होणें ही माझी मोठीशी महत्त्वाकांक्षा नाहीं आणि परीक्षेत पास व्हावें एवढ्या हेतूनेंच मी अर्थशास्त्राचा अभ्यास करितों असेही नाहीं."

"थांबा आप्पासाहेब" मी मध्येंच म्हणालों, परीक्षेंत पास

व्हावें म्हणूनच जर तुम्ही अर्थशास्त्राचा अभ्यास करीत नाहीं तर मग हा येवढा खटाटोप कां करतां हेंच मला कळत नाहीं,

" मी तुम्हांला खरें सांगूं का बाबूराव ! " आप्पासाहेब हंसत हंसत म्हणाले " तुम्हांला अर्थशास्त्र ह्मणजे काय हेंच मुळीं कळलें नाहीं हें तुम्हांला नीटसें कळलें असतें तर अर्थशास्त्र शिकण्याची प्रत्येक मनुष्याला किती जरूरी आहे हें तुमच्या चटकन् ध्यानांत आलें असतें. "

" तुम्हीं म्हणतां हें कांहीं खोटें नाही आप्पासाहेब. " अर्थशास्त्र म्हणजे काय हें मला खरोखरीच नीटसें कळलेलें नाहीं. माझ्या-सारख्या शेतकरी माणसाला असलीं शास्त्रें समजून घेण्याची कांहीं आवश्यकता नाहीं; इतकेंच नव्हे तर मी तें समजून घेण्याचा किती जरी प्रयत्न केला तरी माझ्यासारख्या साधारण बुद्धीच्या माण-साला तें कळणेंही अगदीं अशक्य आहे अशी आपली माझी प्रामा-णिक समजूत आहे. आणि म्हणून मी त्या विषयाकडे इतके दिवस लक्षच दिलें नाहीं पण आतां खरें सांगा आप्पासाहेब, अर्थशास्त्र अर्थशास्त्र म्हणून म्हणतात तें आहे तरी काय गौडबंगाल? अर्थ-शास्त्रांत कसला अर्थ सांगितला आहे? अर्थशास्त्र प्रत्येक मनुष्यानें शिकावें असें तुम्ही म्हणतां तें कां? आणि तें पहा—

" सबूर सबूर " आप्पासाहेब हंसत हंसत म्हणाले " तुम्ही तर प्रश्नांची नुसती झड उडविली आहे! आतां येवढ्या साऱ्या प्रश्नांचीं उत्तरें तरी कसा देऊं शकेन मी? एकेक प्रश्न विचारलांत तर उत्तर देण्याचा मी निदान प्रयत्न तरी करूं शकेन. बरें तें असो बाबूराव, पहिल्यानें अर्थशास्त्र म्हणजे काय हेंच आपण पाहू. "

" कांहीं हरकत नाहीं आप्पासाहेब, तुम्ही आपले माझ्या एक एक प्रश्नाचें उत्तरच द्या म्हणजे झालें. हं सांगा तर मग मला

अर्थशास्त्र म्हणजे काय आणि तें प्रत्येक मनुष्याला, शिकणें अत्यंत जरूर कां आहे ?"

"पहिल्यानेंच मी तुम्हांला सांगतों बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले "मी अर्थशास्त्राचा नुसता एक विद्यार्थी आहें. ग्रंथ वाचून व थोडासा स्वतःच विचार करून मला त्या विषयासंबंधानें जें कांहीं थोडें बहुत कळलें आहे तें मी तुम्हांला शक्य तेवढ्या सोप्या शब्दांत सांगण्याचा प्रयत्न करीन."

"अर्थ म्हणजे काय ? अर्थशास्त्र ह्या शद्बांत अर्थ हा शब्द संपत्ति या अर्थानें वापरला आहे. संपत्तीसंबंधीं जें शास्त्र तें अर्थशास्त्र. आपण संपत्तीसंबंधीं विचार करावयाचा म्हणजे काय करावयाचें ? संपत्ति जगांत कितीही असली तरी तिचा उपभोक्ता मनुष्यच जर तेथें नसला तर त्या संपत्तीचा उपयोग तरी कसला ? आतां संपत्तीचा उपयोग घ्यावयाला जशी मनुष्यप्राण्याच्या अस्तित्वाची गरज आहे, तशीच संपत्ति एके जागीं करावयाला किंवा संपत्तीची वाढ करावयालाही मनुष्यप्राण्याची व त्याच्या वागणुकीचें निरीक्षण करावयाचांही जरूर आहे. या सर्व गोष्टींवरून तात्पर्य काय निघेल बाबूराव ?"

"तात्पर्य हेंच कीं, संपत्तीसंबंधीं विचार करतांना आपल्याला मनुष्य प्राण्याच्या एकंदरींत व्यवहारांतील वागणुकी संबंधानेंही विचार करणं जरूर आहे.

"झालें तर मग" आप्पासाहेब म्हणाले "अर्थशास्त्र म्हणजे काय हें तुमचें तुम्हीच सांगितलेंत ! अर्थशास्त्र म्हणजे संपत्तीसंबंधानें आपल्याला ज्यांत माहीति मिळते तें शास्त्र; संपत्तीसंबंधानें माहीति मिळवावयाची म्हणजे संपत्तीचा कसा उपभोग घेतला जातो, संपत्ति कशी मिळविली जाते; संपत्ति कशी वांटली जाते; संपत्ति कशी राखली

जाते इत्यादि अनेक गोष्टींचा विचार करावयाचा. या सर्व गोष्टींचा विचार करावयाचा म्हणजे मनुष्य व्यवहारांत कसा वागतो याचा विचार करावयाचा. आणि म्हणून " अर्थशास्त्र " (Economics) ह्याची व्याख्या मार्शल नांवाच्या विख्यात ग्रंथकर्त्यानें अशी केली आहे. Economics is the study of mankind in the ordinary business of life. अर्थशास्त्र शिकावयाचें म्हणजे मनुष्य प्राणि आपल्या सुखसोयींकरतां व संपत्तीचा उपभोग घेण्याकरतां कसा प्रयत्न करतो याचा विचार करावयाचा आणि अर्थशास्त्राचा हा अर्थ आपल्या ध्यानांत आला कीं, अर्थशास्त्र कां शिकावयाचें हा प्रश्नही आतां सहजच सुटेल.

आतां असें पहा बाबूराव, मनुष्यप्राणि हा स्वभावतः सुखाकरितां प्रयत्न करणारा प्राणि आहे. जगांत सुख कशानें मिळतें ?

" मानसिक समाधान असलें म्हणजे मनुष्य सुखी होऊं शकतो " मी मध्येंच उद्गारलों.

" कबूल आहे तुमचें म्हणणें" आप्पासाहेब म्हणाले "मानसिक समाधान पाहिजे हें खरें. पण अशा तऱ्हेचा विचार सर्व साधारण लोक नेहमीं करीत नाहींत येवढेंच माझें म्हणणें. अंगाला राख फांसून हिमालयांत तपस्येला जाऊन बसणारा सत्पुरुष सुखी असूं शकतो; देशाकरतां हजारों रुपयांच्या वकीलीवर पाणी सोडणारे ' चित्तरंजन ' सुखी असूं शकतात; धर्माकरितां आपला हात जळत्या विस्तवांत घालून शारीरीक क्लेश मोठ्या आनंदानें सहन करणारे आर्च बिशप क्रॅन्मर सुखी असूं शकतात; पण प्रत्येक मनुष्य इतक्या योग्यतेचा असणें शक्य आहे का ?"

" खात्रीनें नाहीं. बहुतेक लोकांची सुखाची कल्पना इतकी उदात्त नसते " मी म्हणालों.

" बरोबर बोललांत बाबूराव " आप्पासाहेब म्हणाले, " साधारणतः प्रत्येक मनुष्य शारीरिक सुखाची जास्त पर्वा करतो. आतां तुम्हींच सांगा बाबूराव, तुम्हीं या खेड्यांत राहता. पण उद्यां तुम्हांला आमच्या नागपुरांत एक बंगला व फिरावयाला एक मोटार दिली तर तुम्हांला आनंद होईल कीं नाहीं? आतां हा नागपूरचा बंगला किंवा मोटार तुम्ही कशी मिळविणार? पैशाच्याच जोरावर ना! झालें तर मग. साधारणतः मनुष्याला कोणत्या सुखाची जरूर वाटते! खाणेंपिणें, उत्तम रहाणी, लग्नकार्य, इष्टमित्रांस देणग्या वगैरे गोष्टींची. आतां या सर्व इच्छा पुरविण्याचें सामर्थ्य 'दामाजींत' नाहीं का?

एकूण जगांतील बहुतेक सुखें संपत्तीचे जोरावर मिळूं शकतात हें आपण पाहिलें. तेव्हां ज्या गोष्टींच्या योगानें आपल्याला जास्त संपत्ति मिळवितां येईल, मिळविलेल्या संपत्तीचा जास्त सुख मिळविण्याकडे उपयोग करतां येईल, त्या गोष्टी आपल्याला ज्या शास्त्राचा अभ्यास केल्यानें कळतात तें शास्त्र शिकणें प्रत्येक मनुष्याला अत्यंत जरूर आहे असें नाहीं का तुम्हांला वाटत बाबूराव?"

" आहे खरें तुमचें म्हणणें आप्पासाहेब. पण कां हो आप्पासाहेब, मला एक शंका येत आहे. अर्थशास्त्र शिकणें हें जर इतकें उपयोगीं आहे तर पुष्कळसे लोक हें शास्त्र कां शिकत नाहींत?" मी म्हणालों.

" त्याचें असें आहे बाबूराव " आप्पासाहेब म्हणाले. "पुष्कळशा लोकांनीं या अर्थशास्त्राचा नसता बागुलबोवा उभा केला आहे. त्यांचें म्हणणें असें. मनुष्य प्राण्यानें सारखें पैशाच्यामागें लागणें हें इष्ट नव्हे. अर्थशास्त्राचा अभ्यास जर लोक ज्यास्त करूं लागले तर ते नुसते पैशाचे लोभी होतील आणि त्यामुळें ते जास्त अप्रा-

माणीक होण्याचा संभव आहे. खरें पाहूं गेलें असतां वरील विचार-सरणि अगदीं चुकीची आहे. पूर्वीपेक्षां लोक अर्थशास्त्राचा ज्यास्त अभ्यास करूं लागले आहेत म्हणून सध्यां जगांत प्रामाणीकपणा ज्यास्त वाढला आहे असें म्हणतां येणार नाहीं, तरी लोक पूर्वीपेक्षां जास्त वाईट झाले आहेत असेंही नाहीं."

"असें कसें म्हणतां आप्पासाहेब" मी मध्येंच म्हणालों. "पूर्वीच्या काळीं आपले कुटुंबांतील लोकांकरितां लोकांना किती आपलेपणा वाटत होता. आणि आतां! अहो सख्या भावालासुद्धां कुणी विचारीना"

"अशीं कांहीं उदाहरणें प्रत्येक काळांत सांपडायचींच" आप्पासाहेब म्हणाले, "पण येवढ्यावरूनच कांहीं पूर्वीच्या वेळचे सर्व लोक चांगले व आतांचे बहुतेक वाईट असें होत नाहीं. शिवाय असें पहा, तुमच्या कुटुंबांतील माणसांच्या संबंधानें तुम्हांला पूर्वी जितकें प्रेम वाटत असें तितकें आतां वाइट नाहीं असें जरी गृहीत धरलें; तरी परदेशांतील किंवा समाजाचे बाहेरील लोकांसंबंधीं आतां आपल्याला जितकी सहानुभूति वाटते, तितकी पूर्वी खात्रीनें वाटत नव्हती. इटालींतील एटना ज्वालामुखीचा स्फोट होऊन त्यामुळें कित्येक गांवें बेचिराख झालीं व हजारों लोक देशोधडीस लागले ही बातमी ऐकून तुम्हांलाही नाहीं का वाईट वाटलें? आणि समजा उद्यां एखादा वरील लोकांकरतां फंड निघाला तर तुम्ही त्याला नाहीं का मदत करणार?

एकंदरींत काय कीं अर्थशास्त्राच्या अभ्यासानें मनुष्य अत्यंत स्वार्थी होतो ही समजूत साफ चुकीची आहे. मी तर म्हणतों बाबूराव अर्थशास्त्राचा अभ्यास करणारें जग जास्त जास्त पैसा परोपकारीं खर्चूं लागेल. आपल्या हिमतीनें लाखों पौंडांची दौलत करणारे अमे-

रिकन दानशूर केवढाल्या मोठाल्या रकमा परोपकाराकरतां खर्च करीत आहेत हें तुम्हीं पाहातांच आहांत.

सध्यां युग आर्थिक स्वातंत्र्याचें आहे. प्रत्येक माणसाला आपल्याला जास्त सुख मिळावें, असें वाटणें साहजीक आहे. व त्याकरितां त्यानें जास्त संपत्ति मिळविण्याचा प्रयत्न करणें हेंही न्याय्य आहे अर्थात् त्या मनुष्याचे प्रयत्न दुसरे लोकांना जर त्रासदायक होऊं लागले तर काय करावयाचें हें ठरविण्याचें काम प्रत्येक देशांतील कायद्याचें आहे.

एकंदरींत बाबूराव आपण आज दोन तीन गोष्टींचा विचार केला अर्थशास्त्राचा अभ्यास करावयाचा म्हणजे साधारणतः संपत्ति मिळविण्याकरतां व मिळविलेली खर्च करण्याकरतां मनुष्यप्राणि व्यवहारांत कसा वागतो या विषयाचा अभ्यास करावयाचा हा आपला पहिला सिद्धांत झाला; आणि दुसरा–"

"थांबा मी सांगतों आप्पासाहेब" मी मध्येंच म्हणालों "अर्थशास्त्राचा अभ्यास प्रत्येक मनुष्यानें करणें इष्ट आहे, कारण प्रत्येक मनुष्याला सुख पाहिजे असतें, सुख साधारणतः संपत्तीपासून मिळतें व संपत्ति कशी संपादन करावयाची हें अर्थशास्त्र शिकवितें. होय ना आप्पासाहेब."

"शाबास बाबूराव तुम्हीं तर एकाद्या प्रोफेसरसारखे बोलूं लागलांत कीं" आप्पासाहेब म्हणाले "आतां तरी तुम्हांला अर्थशास्त्राचा नसता बागुलबोवा वाटणार नाहीं. आतां उद्यां सकाळीं तुम्हीं आलांत म्हणजे आपण संपत्ति म्हणजे काय याचा विचार करूं. याल ना तुम्हीं बाबूराव?"

"खात्रीनें येईन" मी म्हणालों "मला खरोखरीच तुमच्या अर्थशास्त्रांत फार गोडी वाटूं लागली आहे."

"हें पहा बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले "मीही अर्थशास्त्राचा विद्यार्थी आहें. आपण दोघे मिळून या शास्त्राचा अभ्यास करूं. बरें उद्यां यायचें, मग सकाळीं बरें का?"

आणि मीही आप्पासाहेबांचे जवळून अर्थशास्त्र समजून घेण्याचा निश्चय केला आहे. मला जेवढें समजेल तेवढें मी माझ्या वाचकांना जरूर सांगेन. पाहूं या पुढें काय होतें तें!

## प्रकरण दुसरें

# संपत्ति, संपत्ति ती काय !

काल आप्पासाहेब देशमुखांशीं अर्थशास्त्रासंबंधानें माझें बोलणें झालें. व उद्यां संपत्तीसंबंधानें आपण कांहीं तरी बोलूं असेंही ठरलें. हें मी माझ्या वाचकांना सांगितलेंच आहे. आप्पासाहेब संपत्ती-संबंधानें मला काय सांगणार हें मला खरोखरीच कळेना आणि म्हणून दुसरा दिवस उजाडण्याची अती उत्सुकतेनें मी वाट पहात होतों.

पहाट होतांच प्रातर्विधि आटोपून मी आप्पासाहेबांचे घरीं गेलों. आप्पासाहेब माझीच वाट पहात बसलेले दिसले.

" या बाबुराव " आप्पासाहेब म्हणाले " आजच्या विषयासंबंधानें तुम्ही कांहीं विचार केला आहे का ? आज आपण संपत्ती संबंधानें बोलणार आहोंत. "

" माफ करा आप्पासाहेब " मी मध्येंच म्हणालों " अर्थशास्त्र म्हणजे काय हें आपण काल पाहिलें, पण आज संपत्तीसंबंधानेंच बोलण्याचें तुम्ही कां ठरविलेंत ? "

" वाहवा बाबूराव " अहो अर्थशास्त्र म्हणजे संपत्तीसंबंधानें शास्त्र. व्यवहारांत मनुष्य सुख मिळविण्याकरतां कसा वागतो या संबंधीं विवेचन करणारें शास्त्र, असा आपण कालच अर्थ केला ना ! बरें तें जाऊ द्या. संपत्ति म्हणजे काय हें तुम्हीच सांगा बाबूराव. "

" यांत काय कठीण आहे आप्पासाहेब ! अहो संपत्ति म्हणजे पैसा, धन. "

"बरें तर मग बाबूराव आपण बसलों आहोंत ही जागा संपत्ति नव्हेतर. तसेंच आपला बगीचा ही संपत्ति नव्हे. तुमच्या मताप्रमाणें हें सारें बरें का! आतां असें पहा आमच्या दादासाहेबांची शेतवाडी, बंगले, बँकमधले शेअर्स वगैरे गोष्टी जर संपत्तींत मोजत नसत्या, तर दादासाहेब कांहीं श्रीमंत म्हटले गेले नसते. पण आपण जर पाहायला गेलों तर आपल्या या बाजूला दादासाहेबांचे येवढे श्रीमंत गृहस्थ नाहींत म्हणतात."

"होय, खरेंच आप्पासाहेब. नुसता पैसा म्हणजे कांहीं संपत्ति नव्हे. पण तुम्ही दादासाहेबांच्या इस्टेटीसंबंधानें आत्तां बोललांत ह्या इस्टेटीचे दादासाहेब म्हणतील त्या वेळेस पैसे नाहीं कां करतां यावयाचे ?"

"अर्थात् येतील; पण तुम्ही अजून मूळ मुद्यापासून लांब आहांत बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले "आतां असें पहा! संपत्तीचा अर्थ तुम्ही पैसा असा संकुचीत केलांत; पैसा कशाकरतां पाहिजे बरें ? त्यापासून आपल्याला वाटेल ती वस्तु घेतां येईल म्हणून ना? म्हणजे आपल्याला वाटेल ती किंवा "हवी ती" वस्तु पाहिजे असते आणि ती मिळावी म्हणून आपण पैशाचा फक्त साधन म्हणून उपयोग करीत असतों एकंदरींत "हवी ती वस्तु" हें साध्य असतें आणि पैसा हा फक्त साधन असतो. संपत्ति म्हणजे वर सांगितलेली हवी ती वस्तु; आपल्याला शेतें पाहिजे असतात; बँकांमधील शेअर्स पाहिजे असतात; मोटार पाहिजे असते; ह्या सर्व पाहिजे असणाऱ्या सदरांत मोडणाऱ्या वस्तु आपण संपत्ति म्हणूं शकतों. ज्या देशांत पैसा नाहीं पण जेथें धनधान्य वगैरे विपुल आहे, त्या देशाला आपण संपत्तीमान देश खात्रीनें म्हणूं ?"

"पण आप्पासाहेब मला एक शंका आली आहे" मी म्हणालों.

"आपल्याला हवीशी वाटते ती वस्तु म्हणजे संपत्ति असें तुम्ही म्हणतां. आईबापांचें प्रेम, किंवा मित्राचें प्रेम वगैरे गोष्टीही आपल्याला हव्याश्या वाटतात; मग त्याही संपत्तींतच मोडतात का?"

"नाहीं; आणि याचें कारण सांगूं का तुम्हाला बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले "आपण पहिल्यानें पाहिलेंच आहे कीं, अर्थ-शास्त्रासंबंधीं विचार करतांना आपण मनुष्य व्यवहारांत कसा वागतो येवढेंच पहातों. व्यवहारांत मनुष्य साधारणतः आपलें सुख पैशानें मोजत असतो. जास्त पैसा तितकें जास्त सुख असें जरी म्हटलें तरी त्यांत मोठीशीं चूक होणार नाहीं. तुम्हाला शेती हवीशी वाटते; याचें कारण वेळ पडल्यास तुम्हाला तिचे पैसे मिळतात, तुम्हाला शेअर्स पाहिजे असतात; कारण त्यांची किंमतही पैशानेंच ठरते. एखाद्या मनुष्याची इस्टेट एक लाख रुपयांची आहे असें जेव्हां आपण म्हणतो, त्या वेळेस त्याचेजवळ असणाऱ्या मनुष्याला हव्या अशा सर्व वस्तूंची आपण पैशांत किंमत ठरवितों. पण तशी किंमत आपल्याला आईबापांच्या प्रेमाची ठरवितां येईल का?

"अर्थात् नाहीं." मी म्हणालों.

"आणि म्हणूनच आईबापांचें प्रेम आपल्याला कितीही हवेसें वाटलें तरी त्याला आपण संपत्ति म्हणूं शकणार नाहीं."

"तर मग प्रत्येक जड वस्तु संपत्ति समजावयाची का?" मी विचारिलें.

"तसें ही पण नव्हे" आप्पासाहेब म्हणाले "पुष्कळशा जड वस्तु संपत्तींत मोडतात येवढें मात्र खरें समजा उद्यां मोठा पाऊस पडला व मारवाडांत चोहोंकडे पाणीच पाणी झालें, तर त्याचा परिणाम काय होईल? पाणी ही वस्तु लोकांना हवीशी वाटणार नाहीं. आणि मग सध्यां मारवाडांत घरांत पाण्याची विहिर असलेला

मनुष्य जसा संपत्तीमान् समजला जातो तसा तो समजला जाणार नाहीं.

आतां एक मुद्दा राहिला. पुष्कळशा जड वस्तु संपत्तींत मोडतात हें आपण पाहिलें. पण गिऱ्हाइकांचें वळण हें कांहीं जड पदार्थ नसून सुद्धां संपत्तींत मोडलें जातें."

"गिऱ्हाइकांचें वळण एखाद्या दुकानदाराकडे असतें ही गोष्ट खरी, पण त्यामुळें तें वळण त्या विविक्षित दुकानदाराची संपत्ति कां समजली जातें हें मला नीटसें कळलें नाहीं" मी म्हणालों.

"आपण एक उदाहरण घेऊं या. म्हणजे आपल्याला "गिऱ्हाइकांचें वळण" म्हणजे दुकानदाराची संपत्ति कां तें कळेल. आपल्या बाजार ओळींत देशपांडे कंपनीचें कापडाचें दुकान आहे ना? आतां आपण अशी कल्पना करूं कीं उद्यां दत्तोपंत देशपांड्यांच्या मनांत तें दुकान बंद करावयाचें आलें तर काय होईल? दुकानांतील सारा कपडा हरीभाऊ फडके घ्यावयाला तयार होतील. इतकेंच नव्हे तर हरीभाऊ दत्तोपंताला आणखीहि कांहीं जास्त पैसे देऊन दत्तोपंताचें नांव दुकानाला राहूं देण्याची दत्तोपंताकडून परवानगी घेतील; देशपांडे दुकानचे मालक दत्तोपंत देशपांड्यांचें जागीं हरीभाऊ फडके झाले; पण दुकानचें नांव तेंच राहिलें. धंदाही तसाच सुरू राहिला आणि त्यामुळें हरीभाऊंना दत्तोपंताचें गिऱ्हाईक मिळूं शकलें. आतां त्याच जागीं जर हरीभाऊ फडके आणि मंडळी या नांवचें दुसरें दुकान काढलें असतें, तर दत्तोपंताचें सर्व गिऱ्हाइक हरीभाऊंनां खात्रीनें मिळालें नसतें. तेव्हां दत्तोपंताचें नुसतें नांव राहूं दिल्यामुळें हरीभाऊला जास्त पैसा मिळतो आणि तो आपल्याला मिळावा म्हणून हरीभाऊ स्वतःचे फायद्यांतील कांहीं हिस्सा दत्तोपंताला त्यानें स्वतःचें नांव वापरण्याची परवानगी हरीभाऊला द्यावी.

म्हणून देतो. हा नफ्याचा भाग म्हणजे दत्तोपंताच्या गिऱ्हाइकांच्या वळणाची ( Good will ) किंमतच नव्हे का? आणि त्यामुळें दत्तोपंताचा आर्थिक फायदा नाहीं का होत."

"होय गिऱ्हाइकाचें वळण ( Good will ) असणें ही खरो-खर भाग्याची गोष्ट आहे." मी म्हणालों "आणि त्यामुळें ज्या अर्थी आपला आर्थिक फायदा होऊं शकतो त्या अर्थी त्याला संपत्ति म्हणणें कसें रास्त आहे हें मला आतां समजलें."

"झालें तर मग; संपत्ति म्हणजे काय हें आपल्याला समजलें, **मनुष्याला एकंदर आयुष्यांत ज्या वस्तू हव्याशा वाटतात. व ज्या वस्तु मनुष्य दुसऱ्याला देऊं शकतो, व विकूं शकतो त्या वस्तूंना संपत्ति म्हणायला कांहीं हरकत नाहीं.**

आतापर्यंत संपत्ति म्हणजे काय हें आपण पाहिलें. आतां तुम्ही जर कंटाळला नसाल बाबूराव, तर संपत्ति एकंदर जगांत वाढत आहे किंवा निराळ्या शद्वांत म्हणावयाचें म्हटलें म्हणजे जग श्रीमंत होत आहे म्हणजे काय याचा विचार करूं.

मनुष्याला पुष्कळ वस्तु हव्याश्या वाटतात. पण त्या वस्तु मिळ-विण्याचें सामर्थ्य जर त्याचेजवळ नसलें तर त्या नुसत्या वाटण्याचा काय उपयोग! "उत्पद्यन्ते विलीयन्ते दारिद्राणां मनोरथा:" अशीच त्याची स्थिति व्हावयाची. बरें संपात्त मिळविण्याचें नुसतें सामर्थ्य असून उपयोगीं नाहीं. मिळविलेली संपात्त आपल्या जवळ राहील अशी जेव्हां मनुष्याला खात्री वाटेल तेव्हांच तो संपात्त मिळविण्याचा प्रयत्न करील.

तेव्हां संपत्ति वाढत आहे याचा अर्थ संपात्त मिळविण्याचे सर्व न्याय्य मार्ग मनुष्याला खुले आहेत, व संपात्त मिळविल्यानंतर तिचा वाजवी रीतीनें उपभोग घेण्याला त्याला कोणीही प्रतिबंध

करूं शकत नाहीं असा आहे. अशी स्थिति केंव्हां असूं शकते बरें बाबूराव ? "

" अर्थात शांततेच्या काळीं; युद्धाचे धामधुमींत मिळविलेली संपत्ति तुमचे जवळ राहीलच असा थोडाच नियम असतो ! " मी म्हणालों.

" बरोबर सांगितलेंत तुम्ही बाबुराव. शांतता देशांत असली तर सर्व वस्तूंची, अर्थात बहुतांशी जड वस्तूंची, संपत्ति या सदराखालीं गणना करण्यास हरकत नाहीं. संपत्ति ही सुखोपभोगाकरतां आहे हें सांगण्याची जरूरी नाहीं. आतां देशांत शांतता केंव्हां नांदते ? जेंव्हां देशांतील कायदे लोकांचे हिताकरतां केले जातात व त्यांची अम्मलबजावणी नीट होते तेंव्हां. खरें ना ? "

" होय " मी म्हणालों.

"एकंदरींत देशांत संपत्तीची वाढ होण्याला तेथें कायद्याचें साम्राज्य पाहिजे आणि दुसरें कारण म्हटलें म्हणजे संपत्ति मिळविण्याची मनुष्याला इच्छा पाहिजे. एखाद्या साधूंच्या देशांत संपत्तीची कोणाला जरूर वाटावयाचीच नाहीं. आणि त्यामुळें तेथें संपत्तीची वाढ करण्याचे प्रयत्नही होणार नाहींत. संपत्तीचा अति सोस असणें हें जितकें वाईट, तितकेंच सर्वसंगपरित्याग करून नुसतें स्वस्थ बसणें वाईट.

बरें, बाबूराव आज एवढेंच पुरें करावें असें मला वाटतें. उद्यां जर सकाळीं तुम्हीं याल तर आपण संपत्तीची उत्पत्ति, विनियोग, विनिमय व वांटणी म्हणजे काय याचा विचार करूं. अर्थशास्त्राचे हे चार मुख्य विभाग आहेत. येवढेंच आज मी तुम्हाला सांगतों.

# प्रकरण तिसरें.

# संपत्तीची उत्पत्ति, विनियोग, विनिमय आणि वांटणी.

" काय बाबुराव आलांत तुम्ही ? तुम्हाला तर आमच्या अर्थशास्त्राचा अगदीं नादच लागला आहे म्हणायचा; बाकी तुमच्यामुळें मलाही हा विषय नीट समजला आहे कीं नाहीं हें चांगलें समजेल. बरें तें राहूं द्या ? आज आपण कसचा विचार करायचें ठरविलें आहे बरें ? हो संपत्तीची उत्पत्ति आणि विनियोग या संबंधानें नाहीं का? ठीक आहे.

सुरवातीला बाबुराव तुम्हाला मला एक गोष्ट सांगितली पाहिजे ती ही. अर्थशास्त्रासंबंधीं आपल्या मराठी भाषेंत अजून नीट पुस्तकेंच नाहींत. आणि पारिभाषिक शब्द तर सांपडतही नाहींत. त्यामुळें खरी गोष्ट अशी आहे, कीं अर्थशास्त्र हा विषय इंग्रजींतून समजायला जितका सोपा जातो जितका मराठींतून खात्रीनें जात नाहीं. आतां हेंच उदाहरण घ्याना. Consumption of wealth म्हटल्यानें मला त्या विषयासंबंधानें कल्पना जितकी चांगली होते तितकी संपत्तीचा विनियोग म्हटल्यानें होत नाहीं. पण त्याला सध्यां कांहीं इलाज नाहीं. "

" तर मग असें करीत जा तुम्ही आप्पासाहेब " मी मध्येंच म्हणालों. " ज्या ठिकाणीं जसला पारिभाषिक शब्द योजणें तुम्हांला जरूरच असेल त्या ठिकाणीं तुम्ही पाहिजे तर एखादा जाडासा शब्द वापरीत चला. पण त्याच वेळेस मला त्याचे जोडीचा इंग्रजी शब्द

सांगत जा आणि लगेच एखादें उदाहरण घेऊन ती गोष्ट मला जास्त चांगल्या रीतीनें समजेल असें तुम्ही करा म्हणजे झालें."

"होय बाबुराव तसें केल्याशिवाय आपल्याला गत्यंतरच नाहीं. बरें तें असो. आपल्याला आपल्या मुख्य विषयाकडे वळलें पाहिजे.

संपत्ति म्हणजे काय हें आपण काल पाहिलें. प्रत्येक मनुष्याला संपात्ति मिळवावीशी वाटते, कां? तर सुखोपभोगासाठीं. म्हणजे संपात्ति मिळविणें किंवा जवळ असलेल्या संपत्तींत भर घालणें यांत मनुष्याचा उद्देश त्या संपत्तीच्यायोगानें जास्त सुखाचीं साधनें हस्तगत करून घेण्याचा असतो. आपल्या संपत्तींत भर घालणें म्हणजेच संपात्ति उत्पन्न करणें. यालाच इंग्रजींत Production म्हणतात. संपत्तीचा उपभोग घेणें म्हणजे संपत्तीचा विनियोग करणें. याला इंग्रजींत Consumption म्हणतात. आतां तुह्माला संपत्तीची उत्पत्ति व विनियोग यांचा अर्थ समजला ना बाबुराव?"

"होय" मी हलकेंच म्हणालों, "अर्थशास्त्राचे नेहमीं चार मोठाले भाग पडतात. त्यापैकीं दोन आपण पाहिलेच. आतां तिसरा मोठा विभाग आपण पाहूंया. आणि तो संपत्तीच्या वांटणीचा. यालों इंग्रजींत Distribution of wealth म्हणतात. संपात्ति वाढविली जाते ती केव्हांही एकाच माणसाच्या बळानें वाढत नाहीं, निरनिराळीं माणसें निरनिराळ्या तऱ्हेनें व निरनिराळ्या गोष्टींच्या मदतीनें जेव्हां संपत्तीची वाढ करावयाचा प्रयत्न करतात, तेव्हांच संपत्तीची वाढ झपाट्यानें होते;"

"थांबा अप्पासाहेब" मी म्हणालों "मला तुमचें हें म्हणणें

नीटसें कळलें नाहीं. एखादें उदाहरण घेऊन नीट स्पष्ट करून सांगाल का ?"

" हें पहा बाबुराव ! आपण अशी कल्पना करूं कीं एखादा मनुष्य मी स्वतः पिकविलेलें धान्य व स्वतः विणलेला कपडा या खेरीज दुसरें कांहीं वापरणार नाहीं असें म्हणून त्याप्रमाणें सारा दिवस मेहनत करूं लागला तर त्यामुळें काय होईल ? सर्व वर्षभर मेहनत करून तो आपल्याला पुरेसें अन्न व अंगभर कपडा फार तर काढूं शकेल. पण दुसऱ्याच एखाद्या मनुष्यानें सर्व दिवसभर कपडाच विणावयाचें कबूल केलें व पहिल्या मनुष्यानें नुसतें शेतीवरच काम केलें तर दोघांनीं मिळून कितीतरी जास्त संपत्ति मिळविली जाईल. पुढें पहिल्यानें आपलें धान्य दुसऱ्याला देऊन त्याच्या जवळचें कापड स्वतःला घेतलें म्हणजे संपत्तीची देवघेव सुरूं झाली. ही संपत्तीची देवघेवच संपत्ति वाढविण्याला मदत करते. देवघेवीला Exchange किंवा संपत्तीचा विनिमय असें म्हणतात.

आपल्या समाजांतली किंवा देशांतली संपत्ति जर वाढवावयाची असली तर आपल्याला सहकारित्वानें काम करावयाला पाहिजे. 'अ' नें कापड विणलें पाहिजे. 'ब' 'नें' धान्य पिकविलें पाहिजे. 'क' नें सूत काढलें पाहिजे. प्रत्येक मनुष्य जर माझें काम मीच करीन असें म्हणूं लागला तर त्याच्या संपत्तीची वाढ फारच कमी होईल. आतां **अशा तऱ्हेनें संपत्तीची वाढ होऊं लागली, कीं प्रत्येक मनुष्य आपआपल्या मेहनतीप्रमाणें, किंवा कर्तबगारीप्रमाणें म्हणा पाहिजे तर, त्या संपत्तींत हिस्सा मागेलच** आणि या असल्या हिस्सेरशीला संपत्तीची वांटणी म्हणतात.

" अर्थशास्त्राचे असे एकंदरींत मोठाले असे चार भाग पडतात.

मनुष्य संपत्ति मिळविण्यासाठीं प्रयत्न करतो. ही संपत्ति त्याला जगांतील सुखें हस्तगत व्हावीत म्हणून पाहिजे असते. नुसत्या एकेकट्यानेंच संपत्ति वाढविण्याचा प्रयत्न केला तर जितकी संपत्तीची वाढ व्हावयाला पाहिजे तितकी होत नाहीं असें मनुष्याला कळून आलें, ( आणि तें फार लवकर कळून येतें.) म्हणजे मनुष्य दुसऱ्या लोकांची मदत घेऊन व जवळ असलेल्या संपत्तीचा उपयोग करून शक्य तेवढी जास्त संपत्ति मिळविण्याचा प्रयत्न करतो, अर्थात् या जास्त मिळविलेल्या संपत्तींत ज्या लोकांची त्यानें संपत्ति मिळविण्याचे बाबतींत मदत घेतलेली असते, त्या लोकांना हिस्सेदार करावेंच लागतें. अशा रीतीनें संपत्तीची वांटणी होते. प्रत्येकास असल्या सहकारानें फायदा होतो. देशाची संपत्ति वाढते. कारण एकएकटा मनुष्य स्वतःचे प्रयत्नानें जितकी संपत्ति मिळवील त्यापेक्षां असल्या देवाण घेवाण तत्वानें त्याला कितीतरी जास्त संपत्ति मिळते. देशाच्या संपत्ति बरोबरच प्रत्येक नागरिकाचीही संपत्ति वाढते. जितकी जास्त संपत्ति तेवढी मनुष्याची सुखोपभोग घेण्याची इच्छा जास्त, व त्याचीं साधनेंही जास्त. जास्त साधनें असल्यामुळें मनुष्य जास्त सुखोपभोग घेऊं लागतो. त्याला निरनिराळया वस्तू हव्यात असें वाटूं लागतें, आणि त्या वस्तू तयार करावयाचे इतर लोक जास्त प्रयत्न करूं लागतात. शक्य तेवढ्या लवकर बाजारांत मागणी होत असलेल्या वस्तूंचा पुरवठा व्हावा म्हणून कारखानदार मोठ्या प्रमाणांत कारखाने सुरू करतात, यंत्रसामुग्री आणतात. स्वस्त माल पुरविण्याचे प्रयत्न करून गिऱ्हाइकांची मागणी वाढवितात आणि अशा योगानें संपत्तीची वाढ तर होतेच, पण तिची वांटणीही होत रहाते."

" आतां मला संपत्तीची उत्पत्ति, विनियोग, विनिमय व वांटणी

या चारी अर्थशास्त्राचे मोठाल्या विभागांची थोडीशी कल्पना आली आहे," मी म्हणालों.

" तर मग आतां तुम्हींच सांगा बाबूराव, या चारी भागांचा कसा अन्योन्य संबंध आहे तो आप्पासाहेब म्हणाले."

"ठीक आहे. जितकी जास्त संपत्तीची उत्पत्ति तितकी मनुष्याची सुखोपभोग घेण्याची लालसा जास्त, व त्यामुळें तितका संपत्तीचा विनियोग जास्त. आतां जितका संपत्तीचा विनियोग जास्त तितकी संपत्तीची जास्त वाढ करावयाची जरूरी जास्त व संपत्तीची खूप वाढ होण्याकरतां निरनिराळ्या लोकांना निरनिराळ्या तऱ्हेनें प्रयत्न करावयाचे असल्यामुळें वाढलेल्या संपत्तींत तितके हिस्सेदार जास्त.

तसेंच जितकी संपत्तीच्या वाढीची जरूरी जास्त तितकीच ती सहकारानें वाढविण्याची प्रवृत्ति जास्त, व सहकार्यानें संपत्ति वाढवावयाची म्हटली ह्मणजे ' देवाण घेवाण ' आलीच."

"शाबास बाबुराव, तुम्ही तर एखाद्या अर्थशास्त्राच्या प्रोफेसरासारखें मला उत्तर दिलेंत," आप्पासाहेब म्हणाले " आतां फक्त एकाच प्रश्नाचा विचार करून आपण आपली आजची सभा संपवूं या."

आपण आपली संपत्ती वाढवितों म्हणजे काय करतों व तिचा उपभोग घेतों म्हणजे काय करतों ?

एक उदाहरण आपण घेतलें म्हणजे मी काय म्हणतों हें तुमच्या ध्यानांत येईल. माझ्या आंगांतला हा कोट पहा. कापसाचें बीं गणबानें पेरलें व झालेला कापूस गणेशदास शेटजींना विकला. गणेशदास शेटजींनीं रुई काढून एंप्रेस मिल्सच्या एजंटला विकली. एंप्रेस मिलच्या मालकांनीं हा कपडा तयार केला. हें कपड्याचें ठाण जोशी देशपांडे मंडळीनें आपल्या दुकानांत आणविलें. बेडेकर

शिंपीबुवा यांनीं त्या कपड्याचा छानसा कोट माझ्याकरतां बनविला. हा एकंदरींत माझे अंगांत असलेल्या कोटाचा इतिहास आहे.

यावरून आपल्याला दिसून येईल कीं **आपण कोणचाही पदार्थ अगदीं नव्यानें उत्पन्न करीत नाहीं तर जगांत परमेश्वरानें उत्पन्न केलेल्या पदार्थांची नुसती उपयुक्तता** (Utility), **वाढवितों.** कापसाचें बी पेरल्यामुळें नवा कापूस झाला. पोत्यांत भरून ठेवलेल्या बियाचा कापूस झाल्यामुळें त्या बियांची उपयुक्तता वाढली. गणेशदास शेटजींनीं कापसाची सरकी काढून त्याची उपयुक्तता वाढविली. एंप्रेस मिल्समध्यें त्या रुईचें सूत काढलें गेलें; त्या सुताचें कापड विणून त्याच्या उपयुक्ततेंत जास्त भर पडली. नागपूराहून कापड आपले गांवीं आणल्यामुळें त्याची उपयुक्तता जास्तच वाढली व बेडेकरबुवानीं त्या कापडाचा कोट बनवून दुधांत साखर घातली.

आतां हा कोट फाटला म्हणजे त्याची उपयुक्तता ( Utility ) कमी होईल. पण ती वस्तु नाहींशी होणार नाहीं. ती चिंध्याच्या रूपानें आस्तित्वांत राहिलीच. उद्यां त्या चिंध्याची कदाचित् बाहुली बनेल. कदाचित् राखही होईल. एकंदरींत काय तर ती वस्तु कोणत्या तरी रूपानें आस्तित्वांत राहीलच. फक्त मनुष्य तिची उपयुक्तता कमी किंवा जास्त करूं शकेल.

एखाद्या वस्तूच्या उपयुक्ततेंत भर घालणें म्हणजे तिचा उपयोग वाढविणें. म्हणजे ती वस्तू आपल्याला हवीशी करणें; याचाच अर्थ संपत्ति वाढविणें. एखाद्या वस्तुची उपयुक्तता कमी करणें म्हणजे कोणाच्या ही तऱ्हेनें कां होईना, पण ती आपल्याला त्या रूपांत नकोशी करणें म्हणजे संपत्तीचा विनियोग करणें.

या तीन दिवसांत आपण साधारणपणें अर्थशास्त्राचा सामान्य विचार केला. पहिले दिवशीं अर्थशास्त्राचा संपत्तीशीं काय संबंध

आहे, ह्याचा विचार केला. काल संपत्ति म्हणजे काय हें ठरविलें, आणि आज अर्थशास्त्राच्या मुख्य चार विभागांचा अर्थ समजून घेतला. व त्यांचा कसा अन्योन्य संबंध आहे हें ठरविलें. आतां उद्यां?

" उद्यां काय " मी मध्येंच म्हणालों " आप्पासाहेब मला हें सारें शास्त्र तुम्ही समजून दिलें पाहिजे. "

" उद्यां कशासंबंधानें बोलायचें आहे. हें आपण उद्यांचें उद्यांच पाहूं; बरें पण उद्यां जरूर लवकरच या बरें का बाबूराव!"

" तें मला सांगायला का पाहिजे आप्पासाहेब, बरें आहे. नमस्कार. "

प्रकरण चवथें

# संपत्तीच्या उत्पत्तीचीं चार कारणें.

## जगू गवत्या काय म्हणाला ?

दुसरे दिवशीं सकाळीं नेहमींप्रमाणें मी आप्पासाहेबांचेकडे गेलों. काल संपत्तिची उत्पत्ति, विनियोग, विनिमय, व वांटणी म्हणजे काय या संबंधानें आम्हीं बोलत होतों, व या चारी गोष्टी एकमेकांवर किती अवलंबून आहेत हेंहीं आम्हीं पाहिलें होतें. उपभोग घेण्याकरतां संपत्ति पाहिजे. जितकी जास्त ऐहिक सुख मिळविण्याची इच्छा जास्त, तितकीच त्या सुखाचीं साधनें हस्तगत करून घेण्याकरतां संपतिची जरूरी; ही जास्त संपत्ति कशी हस्तगत करून घ्यायची ? कोणत्या कारणांनीं संपत्तीची वाढ होईल, इत्यादि विचार माझे मनांत सारखे घोळत होते. आप्पासाहेबांचे घरीं गेल्याबरोबर प्रथम मी याच विषयासंबंधानें बोलायला सुरवात केली.

" आप्पासाहेब सुखोपभोगाकरितां संपत्तीची जरूर आहे, व जितकी जास्त सुखोपभोगाची इच्छा तितकी स्वतःचे संपत्तीची वाढ करण्याची जरूरी हें मला समजलें. पण संपत्ति वाढवायची म्हणजे काय करायचें ! कोणच्या कारणांनीं आपले जवळ असलेल्या संपत्तींत भर पडेल? काय केलें म्हणजे आपणाला जास्त संपत्ति मिळेल? कोणत्या गोष्टींच्या साह्यानें आपल्याला कुबेराचा खजीना आपल्याकडे ओढुन घेतां येईल ?

" कां बाबुराव " आप्पासाहेब हंसत हंसत म्हणाले आज फारसा संपत्तीचा विचार चालला आहे ? संपत्तीचा इतका हव्यास

चांगला नाहीं बरें का? बरें पण तें जाऊं द्या. तुम्हाला संपत्ति कशी वाढवावयाची, व ती कोणच्या कारणांनीं वाढते याची माहिति पाहिजे आहे. आणि माझा अर्थशास्त्रांचा जो कांहीं थोडाबहुत अभ्यास झाला आहे तेवढ्या माझ्या तुटपुंज्या शिदोरींतील ज्ञानानें तुमच्या येवढ्या प्रश्नाचें उत्तर देण्याचा मी प्रयत्न करीन.

"तुम्ही आपल्या जगू गवत्याला ओळखतां का बाबुराव. ?"

" हें काय विचारतां आप्पासाहेब," मी म्हणालों, "अहो जगू गवत्या आतां आपले गांवांतील एक प्रतिष्ठित व्यक्ति व्हावयाला लागला आहे ना? आपल्या गांवाजवळील बंदींतील गाड्याचे गाड्या गवत तो दररोज उमरावतीला धाडतो. आणि आतां त्याचा सर्व कारभार तो नोकर लोकांचेकडून करून घेतो. त्याचा पोशाख जर कुणी पाहिला तर तो एक गवताविक्या आहे असें कुणालाही म्हणण्याची छाती व्हावयाची नाहीं. अहो! त्याच्या गवताच्या व्यापारावरूनच लोक त्याला आतांशा जगू गवत्या म्हणायला लागले आहेत. पूर्वी त्याचें नांव जगू मोरे असें होतें "

" तर मग तुम्ही आपल्या जगू गवत्याला चांगला ओळखतां बाबुराव " आप्पासाहेब म्हणाले " आज जगू कांहीं पैसे कर्जाऊ मागण्याकरितां दादासाहेबांचेकडे आला आहे. त्याला आपण विचारूं तूं धंदा कसा करतोस म्हणून. जगू एके वेळीं डोक्यावर मोळी आणून गवत विकीत होता, व आतां तो स्वतःच्या गाड्याबैल, नोकरमाणसें अशा सरंजामानें व्यापार करतो आहे. त्याच्या संपत्तीची वाढ कोणच्या कारणानें झाली हें आपण त्यालाच विचारूं म्हणजे झालें."

" पण आप्पासाहेब जगू गवत्यानें दिलेल्या माहितीवरून

आपण निष्कर्ष काय काढायचा हें तुम्ही मला सांगितलें पाहिजे, बरें कां!" मी ह्मणालों.

" तें नंतर पाहूं आपण " आप्पासाहेब हंसत हंसत म्हणाले आणि त्यांनीं जगू गवळ्याला आम्हीं बसलों होतों त्या दिवाणखान्यांत बोलाविलें.

जगू गवळ्याचा पोषाख नीटनेटका होता. हातांत एक सोन्याचें कडें, डोक्यावर एक छानदार पागोटें त्याच्या श्रीमंतीची साक्ष देत होतें. जगू गवळ्या दादासाहेबांचेकडे पैसे कर्जाऊ मागायला आला होता. तिकडे अहमदनगराकडे दुष्काळ पडल्यामुळें जगू गवळ्या इकडून त्या बाजूला आगगाडीनें गवत पाठविण्याच्या इराद्यांत होता, आणि त्याकरतां त्याला पैसे पाहिजे होते.

" ये जगू " जगू आंत येतांच आप्पासाहेब त्याला म्हणाले, " या बाबूरावांना तूं ओळखत असशीलच. यांना तुला कांहीं प्रश्न विचारायचे आहेत त्यांचीं त्यांना तूं उत्तरें नीट दे "

" आप्पासाहेब " जगू म्हणाला " मी कांहीं परीक्षा देऊन विद्वान मनुष्य झालेलों नाहीं. स्वतःच्या कष्टानें पैसा मिळवितों, व खातों झालें. देवदयेनें धंद्यांत थोडी बर्कत येत आहे आणि त्यामुळें जरा टामटुमीनें रहातां येतें दुसरें काय? बरें तें जाऊं द्या बाबूरावजींनां मला काय विचारायचें आहे?"

" बाबूराव विचारतात कीं तूं इतका श्रीमंत कसा झालास! तूं कसेकसे प्रयत्न केलेस हें थोडक्यांत आम्हाला सांग " आप्पासाहेब म्हणाले.

" परमेश्वराची इच्छा व माझे प्रयत्न. या दोन गोष्टींच्या जोरावर आप्पासाहेब मी चार पैसे जवळ बाळगून आहें झालें. बरें तें

जाऊं द्या. माझ्या जवळ थोडेसे पैसे कसे जमा झाले हें मी आपलें माझ्या खेडवळ पद्धतीनें तुम्हाला सांगतों.

त्या गोष्टीला सरासरी पंचवीस वर्षें झालीं असतील आप्पासाहेब. मी १० वर्षांचा असेन तेव्हां. त्या वेळच्या मोठ्या बिमारींत माझा बाप मेला अन् मी पोरका झालों. घरांत एक पैसा नाहीं अशा स्थितींत मला मजूरीशिवाय दुसरा कोणचा उद्योग असणार ? आमच्या रघू नांवाच्या शेजाऱ्याबरोबर मी गवताला जाऊं लागलों. गवत कापण्याकरतां एखादा खुरपा पाहिजे, पण त्याचे पैसे कोठून द्यायचे? शेवटी रघूनें मला खुरपा विकत घ्यावयाला थोडे पैसे उसने दिले. आणि दर आठवड्याला थोडे थोडे असे पैसे देऊन चार महिन्यांत रघूचे पैसे मी फेडावे असें ठरलें.

माझ्या परिस्थितीची जाणीव आप्पासाहेब मला पूर्ण झाली होती. मी फार मोठ्या सकाळीं जंगलांत गवताला जाईं व संध्याकाळपर्यंत मेहनत करून शक्य तेवढें जास्त गवत घरीं आणी. जंगलांत गवत पुष्कळ असल्यामुळें मला वाटेल तेवढें गवत कापावयाला सांपडे. माझे सोबती माझी चेष्टा करीत पण मी मुळीं तिकडे लक्षच देत नसें.

गवत विकून आलेल्या पैशांतून मी फक्त निम्मे माझेकरतां खर्च करी. पोटाला लागेल तितकें मी खाई. पण चैनीकरितां त्यावेळीं मी एक पैसाही खर्च केला नाहीं. माझे सोबती दारू पीत पण मी तिकडे ढुंकूनही पहात नसे. रघू फार दारू पीत असे. आप्पासाहेब पुढें रघूला कित्येक रोग जडले. अन् शेवटीं तो अगदीं झिजून झिजून मेला.

निम्या पैशांतून मी पहिल्यानें खुरप्याकरतां घेतलेले पैसे फेडण्याकरतां चवथा हिस्सा एके बाजूला ठेवी व उरलेला चवथा हिस्सा मी शिल्लक म्हणून बाजूला ठेवीत असें.

खुरप्याचे पैसे लवकरच फिटले. माझी शिल्लकही वाढत चालली माझेजवळ पन्नास रुपये जमले असें पाहून मी एक बैल विकत घेतला. व पुढें गवत त्या बैलाचे पाठीवर घालून आणूं लागलों.

बैल ठेवल्यावर माझा बराच फायदा झाला. मी डोक्यावर आणी त्यापेक्षां कितीतरी पट जास्त गवत मी बैलाचे पाठीवर घालून आणूं लागलों. बैलाचा खर्च वाढला खरा, पण त्याबरोबरच माझा नफा बराच वाढला.

मी माझा खर्च पूर्वीइतकाच ठेवला होता. त्यामुळें, व माझें उत्पन्न जास्त वाढल्यामुळें माझी शिल्लक वाढूं लागली. पुढें जवळ बरेंचसे पैसे जमतांच मी एक बैलजोडी व गाडी विकत घेऊन गाडींतून गवत आणूं लागलों. परमेश्वरानें मला सारखी बरकत दिल्यामुळें आज माझ्याजवळ पांच सहा जोड्या व गाड्या आहेत; आणि हाताखालीं पांच सहा माणसें आहेत.

इतकेंही झालें तरी मी अजून स्वतः कधीं कधीं गवत आणण्याकरितां गाडीवर जातों आणि माझ्या लोकांच बरोबर अंगमेहनतीनें काम करतों माझ्या मुलालाही मी याच धंद्यांत घातला आहे, आणि त्यानें या धंद्यांतच प्रामाणीकपणानें व सचोटीनें राहून पैसे मिळवावेत अशी माझी फार इच्छा आहे.

अहमदनगरकडे गवताची फार टंचाई आहे असें मी कालच ऐकलें. आपल्याकडे गवत पुष्कळ आहे आणि म्हणून इकडलें गवत रेल्वेनें तिकडे पाठवावें असें माझ्या मनांत आहे. अर्थात् हें सगळें करावयाला पैसे रगडून पाहिजेत आणि म्हणून मी आज दादासाहेबांचेकडे पैसे मागावयाला आलों आहे.

संपली माझी हकीगत आप्पासाहेब. पण मला आतां जाऊं द्या.

तुम्ही मला बोलाविलेंत म्हणून मी माझें हातचें काम सोडून येथें आलों."

"बरें पण काय रे जगू" आप्पासाहेब म्हणाले "दादासाहेब तुला पैसे द्यायला तयार आहेत ना?"

"नसायला काय झालें आप्पासाहेब" जगू म्हणाला "मी पैसे कधींही बुडविणार नाहीं हें दादासाहेबांना पक्के माहीत आहे बरं जातों आप्पासाहेब रामराम" जगू ह्मणाला "रामराम बाबूराव"

जगू गेल्यावर आप्पासाहेब कांहीं मिनीटें स्वस्थ बसले होते. बहुधा ते विचार करीत असावेत.

"काय आप्पासाहेब" मी म्हटलें "विचार कसला चालला आहे?"

'जगूची गोष्ट ऐकलीतच तुम्ही बाबूराव. त्या गोष्टीपासून संपत्तीची उत्पत्ति व्हावी. व ती संपत्ति आपणास मिळावी म्हणून मनुष्य कशी खटपट करीत असतो, व कोणच्या गोष्टींचें तो सहाय्य घेत असतो हें आपणास शिकावयाचें आहे. आणि त्या संबंधींच मी विचार करीत होतों.

जगू पहिल्यानें डोक्यावरून गवत आणीत असे. जगूनें गवत आणून विकण्याचा धंदाच कां पसंत केला असावा असें वाटतें तुम्हाला बाबूराव!"

"नाहीं बुवा! मला कांहीं सांगतां यायचें नाहीं जगूनें गवताचा धंदा कां पसंत केला तो!" मी म्हणालों.

"'आपल्या गांवाजवळील बंदींत खूप गवत आहे हें तुम्हाला माहीत आहे ना बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले "झालें तर मग. आपल्या गांवाजवळची जमीन जगूला सहाय्य करावयाला तयार असल्यावर मग जगूसारख्या नुसत्या स्वतःच्या हिमतीवर पोट भरूं

इच्छिणाऱ्या माणसाला आणखी काय पाहिजे! थोडक्यांत सांगायचें म्हटलें म्हणजे जगूला संपत्ति मिळवावयाला मदत प्रथम जमीनीनें केली.

आतां जमीन कितीहि तयार असली—किंवा परमेश्वर मदत करायला तयार असला असें म्हणा पाहिजे तर बाबूराव तुम्ही—तरी त्याचा फायदा घ्यायला मनुष्य तर पाहिजे ना? आपल्या बंदींत कितीही गवत असलें तरी जोंपर्यंत जगू तेथें जाऊन तें कापून आणून बाजारांत विकायला तयार नाहीं तोंपर्यंत बंदींतल्या गवताचा खरोखरच नाइलाज आहे. त्या गवताला कांहीं जगूच्या घरासमोर येऊन उभें रहातां येत नाहीं. सारांश काय—पण तुम्हीच सांगा बाबूराव सारांश या सगळ्या गोष्टींचा."

**"सारांश हाच कीं, परमेश्वरनिर्मीत सृष्टि मनुष्याला मदत करावयाला कितीही तयार असली तरी मनुष्यानें स्वतःमेहनत केल्याशिवाय त्याला त्या मदतीचा फायदा घेणें अशक्य आहे.** बरोबर आहे का माझा अंदाज आप्पासाहेब?" मी म्हणालों.

"अगदीं बरोबर" आप्पासाहेब उद्गारले "तुम्ही तर अगदीं अर्थशास्त्राचे प्रोफेसरच होणार बुवा! बरें असूं द्या तें.

सृष्टीच्या देणगीचा जगू स्वतः मेहनत करून फायदा घेऊं लागला, किंवा शास्त्रीय भाषेंत बोलायचें म्हटलें म्हणजे जगू संपत्ति मिळवूं लागला, तरी अजून एक प्रश्न राहिलाच आहे. जगू श्रीमंत झाला कसा? गवत विकून जगू दररोज जी मजूरी मिळवीत असे ती दररोज जर त्यानें खर्च केली असती, तर वीस वर्षांपूर्वी जगू ज्या स्थितींत होता त्याच स्थितींत अजूनपर्यंत राहिला असता. पण आज आपण पहातों तो जगू मारे गाड्या, बैल, नोकरमाणसें बरोबर घेऊन मोठ्या प्रमाणावर गवताचा व्यापार करीत आहे. या-

वरून आपल्याला एक गोष्ट दिसून येते. जगू जितकी मजूरी मिळवी, तितकी खर्च करीत नसला पाहिजे; **त्यानें कांहींतरी पैसे दररोज शिल्लक टाकले असले पाहिजेत.**

पण येवढ्यानेंही जगू इतका श्रीमंत झाला कसा या प्रश्नाचें उत्तर देतां येत नाहीं. आपण अशी कल्पना करूं कीं जगू रोज एक आणा शिल्लक टाकीत असे. या हिशोबानें जगूचे वर्षांत ३६५आणे शिल्लक म्हणजे २२ रुपये १३ आणे पडले असले पाहिजेत. जगूला व्यापार करायला लागून आज कमींत कमी वीस वर्षे झालीं. ह्या वीस वर्षांत आपल्या हिशोबानें जगूजवळ ४५६ रु, ४ आणे शिल्लक रहावयाला पाहिजे होते. पण आज जर आपण पाहिलें तर जगूची इस्टेट कित्येक हजारांनीं मोजतां येईल इतकी आहे. असें झालें कसें?

जगूनें आपल्या धंद्याच्या सुरवातीलाच आपल्या मित्राजवळून पैसे उसने घेऊन एक खुरपा विकत घेतला होता. चांगला खुरपा विकत घेतल्यामुळें जगू पूर्वींपेक्षां जास्त गवत कापूं लागला. पण जगूचा खर्च तेवढाच राहिला. त्यामुळें जगूजवळ शिल्लक जास्त रहावयाला लागली असली पाहिजे.

**ही शिल्लक एखाद्या बोळक्यांत घालून पुरून न ठेवतां जगूनें ते पैसे त्याच धंद्यांत घातले.** त्यानें पुढें बैल घेतला. बैल घेतल्यामुळें त्याला जास्त गवत बैलावर लादून बाजारांत आणणें परवडूं लागलें. जगूची प्राप्ति अशा रीतीनें वाढूं लागली पण खर्च तितकाच राहिल्यामुळें त्याची शिल्लक मात्र झपाट्यानें वाढूं लागली.

जवळचा पैसा त्यानें धंद्यांत घातला किंवा हा पैसा त्यानें खुरपें बैल वगैरे धंद्याला उपयोगीं पडणाऱ्या वस्तू विकत घेण्यांत खर्च

केला. हें जगूचें धंद्यांतलें भांडवल होय. ह्या भांडवलाच्या मदतीनें जगूनें आपला धंदा मोठ्या प्रमाणावर सुरू केला.

धंदा मोठ्या प्रमाणावर सुरु केला ह्मणजे जगूनें काय केलें? गाड्या ठेवल्या; बैल ठेवले; हाताखालीं नोकरमाणसें ठेवलीं. गवत कापणारीं माणसें निराळीं, गाड्यांत गवत भरणारीं माणसें निराळीं. येवढा जगूनें प्रपंच थाटला. जगूनें बाहेरगांवीं गवताचे गठ्ठ बांधून गवत धाडावयाला सुरवात केली. ही धंद्यांतील मांडणी किंवा शिस्त म्हटलें तरी चालेल, उत्तम साधल्यामुळें सर्व व्यवस्था चांगली व्हावयाला लागली. या धंद्यांतल्या शिस्तीला ( Organisation of Production ) असें आपण म्हणू या.

एकंदरींत जगू श्रीमंत व्हावयाला चार कारणें झालीं. कोणचीं तीं समजलीं का तुम्हाला बाबूराव?"

"थांबा मी प्रयत्न करून सांगतों" मी म्हणालों.

**पहिलें सृष्टीनें जगूला मदत केली; दुसरें जगू स्वतः मेहनत करून सृष्टीच्या मदतीचा फायदा घेऊं लागला; तिसरें सर्व मिळविलेली मजूरी खर्च करून न टाकतां त्यांतले पैसे वांचवून त्यानें भांडवल जमा केलें** व त्याचे जोरावर बैल गाडी वगैरे खरेदी करून धंदा वाढविला आणि **चवथें नोकरमाणसांत व एकंदर धंद्यांत उत्तम शिस्त ठेवल्यामुळें जगूला धंद्यांत खूप नफा होऊं लागला."**

"बरोबर बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले "संपत्तीच्या उत्पत्तीचीं कारणें तुम्ही बरोबर सांगितलींत. पहिलें **कारण जमीन किंवा सृष्टि म्हटलें तर जास्त बरें; दुसरें श्रम; तिसरें भांडवल व चवथें धंद्यांतली शिस्त.** या चार कारणांनीं जगांतली संपत्ति वाढते. आतां उद्यां तुम्हीं आलांत म्हणजे आपण सृष्टि संपत्तीच्या

वाढीला कशी कारण होते याचा जरा सविस्तर विचार करूं, आणि आज तुम्ही जरा विशेष कंटाळलेले दिसतां बाबूराव " आप्पासाहेब म्हणाले.

"छे ! तसें नव्हे कांहीं" मी म्हणालों " बरें पण आतां आपण थांबू याच. आजचा विषय एक दिवस विचार करावयाला पुरेसा आहे असें मला वाटतें. बरें नमस्कार आप्पासाहेब."

" नमस्कार "

## प्रकरण पांचवें

# उत्तमराव देशमुखांची जमीन.

दुसरे दिवशीं सकाळीं मी नेहमींप्रमाणें आप्पासाहेबांचेकडे गेलों आज आप्पासाहेब नेहमींप्रमाणें एकटे बसलेले नव्हते. आप्पासाहेबांचे जवळच आमचे गांवांतील उत्तमराव देशमूख बसले होते. उत्तमराव देशमूख आमचे गांवांतील एक प्रतिष्ठित गृहस्थ समजले जात असत. उत्तमराव यांची आमचे गांवचे आसपास बरीच शेती होती आणि त्यांना शेतीचा पुष्कळसा नादच होता असें म्हटलें तरी फारसें चुकणार नाहीं.

"या बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले. "हे उत्तमराव मघांपासून तुमची वाट पहात आहेत. पण बाबूराव, उत्तमराव आज अगदीं सकाळीं कां आले आहेत हें कळलें कां तुम्हाला ? आपला विठू धनगर माहीत आहे ना तुम्हाला ? त्याचें आपल्या गांवच्या शिवेजवळचें शेत विकावयाचें आहे आणि तें आपण घ्यावें अशी उत्तमराव यांची अति इच्छा आहे. त्या शेताला १५०० रुपयापासून तों १६०० रुपये तिफण पर्यंत किंमत द्यायला ते तयार आहेत. आतां उत्तमराव तुम्हाला मी एकच प्रश्न विचारतों; तुम्ही इतकी जबरदस्त किंमत देऊन हें शेत घ्यायचें असें म्हणतां तें कां ?"

"तें असें आहे आप्पासाहेब" उत्तमराव म्हणाले "किंमत जास्त आहे हें मलाही समजतें आहे. पण येवढी किंमत देऊन सुद्धां मी हें शेत घ्यावें असें म्हणतों याचीं पुष्कळ कारणें आहेत.

पहिली गोष्ट म्हटली म्हणजे विठू धनगराचें शेत गांवापासून जवळ आहे. फार लांब शेत असलें म्हणजे आपल्याला पाहिजे तितकी चांगली देखरेख ठेवतां येत नाहीं. शिवाय आपलें गांवापासून उमरावती अगदीं जवळ आहे. त्यामुळें आपल्या गांवाहून पाठविलेली शाकभाजी किंवा फळफळावळ उमरावतीला आपण स्वस्त विकूं शकतों; कारण आपल्याला येथून भाजी व फळें उमरावतीला पाठवावयाला जो खर्च येतो त्यापेक्षां आपले गांवापेक्षां लांब असलेल्या गांवांतील मालाला उमरावतीस येण्याला जास्त खर्च येतो. येवढ्याकरितां मी होतां होईल तों याच गांवची शेती विकत घ्यावयाला पहात आहें. शेतीची किंमत आप्पासाहेब पुष्कळ अंशीं तिच्या जागेवर अवलंबून असते.

दुसरी गोष्ट म्हणजे विठू धनगराचे शेताची जमीन अगदीं उत्तम प्रकारची आहे. अहो सरकारी साराच आहे मुळीं तीन रुपये एकर त्या जमीनीचा. या जमीनींत काय वाटेल तें पिकेल. अशी जमीन आपल्याला मिळावी असें कुणाला वाटणार नाहीं आप्पासाहेब! जितकी जमीन जास्त सुपीक तितका तिला भाव जास्त येतो.

तिसरी गोष्ट म्हटली म्हणजे विठू धनगराचे शेताजवळून जो नाला जातो त्या नाल्याचें पाणी त्या शेताला वाटेल तेव्हां वापरावयाला सांपडतें. त्या नाल्याला नाला म्हणावयाचें येवढेंच. ती एक लहानशी नदीच आहे असें म्हणतात.

या सर्व गोष्टींचा विचार करून आप्पासाहेब विठू धनगराची जमीन घेण्याची माझी फार इच्छा आहे. बरें आहे आप्पासाहेब, मला येथें येऊन फार वेळ झाला आतां आपण मला जायची परवानगी दिली पाहिजे. रामराम.''

" रामराम " आप्पासाहेब म्हणाले. व ते उत्तमराव देशमुखांना पोंचवावयाला दारापर्यंत गेले.

" काय बाबूराव " शेतीच्या जमीनींत काय गुण असायला पाहिजेत हें आपल्याला आतांपर्यंत उत्तमरावांनीं सांगितलेंच. शेती ही पुष्कळ अंशीं संपत्तीच्या उत्पत्तीला कारणीभूत होते. आपल्या हिंदुस्थानांत बहुतेक लोक,–शेकडा ९० पेक्षांही जास्त लोक— शेतीवर उदर निर्वाह करतात आणि म्हणून शेती ही संपत्तीच्या उत्पत्तीचीं जीं कांहीं कारणें आहेत त्या पैकीं एक प्रमुख कारण समजलें जातें.

आपण काल पाहिलें आहे बाबूराव आप्पासाहेब पुढें म्हणाले कीं सृष्टि आपल्याला संपात्ति मिळविण्याला मदत करते, सृष्टीची मदत म्हणजे काय? शेती म्हणजे सृष्टीच नव्हे काय? शेती जरी सृष्टीचीच मदत असली तरी सृष्टीची सारी मदत फक्त शेतीच्याच रूपानें होते असें नाहीं. परमेश्वर मनुष्याला आणखी पुष्कळ तऱ्हेनें संपात्ति मिळविण्याला मदत करतो. परमेश्वरानें जगांत आपला जो संसार मांडला आहे त्या संसाराचा मनुष्यप्राण्यानें पूर्ण उपयोग करून घ्यावा अशीच परमेश्वराची इच्छा आहे; परमेश्वराचा हा जगाचा संसार ह्मणजेच अर्थशास्त्रांतील सृष्टि; आणि यालाच इंग्रजींत land असें म्हणतात.

पृथ्वीच्या पोटांतील नानाधातूंच्या खाणी, कोळशांच्या खाणी, पृथ्वीच्या पोटांत सांपडणारें रॉकेल तेल, हिरे वगैरे सर्व गोष्टि परमेश्वराची मनुष्याला संपात्ति मिळविण्याकरितां सृष्टिरूपानें केलेली मदत होय.

सरोवरें, नद्या, समुद्र वगैरे पाण्याचे लहान मोठे जलसंचय हेही मनुष्याला संपात्ति मिळविण्याकरतां मदत करतात. समुद्रकिनारीं

नुसता मासे पकडण्याचा धंदा करणारे कितीतरी लोक आहेत. आपण समुद्रापासून फार लांब रहात असल्याकारणानें मच्छेमारीच्या धंद्याचें महत्व आपल्यास चांगल्या रीतीनें कळणें शक्य नाहीं.

उत्तमसा सूर्य प्रकाश, पिकाला पुरेसा पाऊस, चांगली हवा हीं सुद्धां मनुष्याला संपत्ति मिळविण्याला मदत करतात. सूर्य प्रकाश चांगला असला तर पिकें चांगलीं येतात. फार पाऊस पडणाऱ्या प्रदेशांत कापूस पिकावयाचा नाहीं हें तुम्हाला माहीत आहेच. रोगराई असलेल्या मुलुखांत फारशी मुळीं वस्तीच नसते. कारण असल्या रोगट हवेंत राहून आपली प्रकृति बिघडवून घेण्याची लोकांना थोडीच इच्छा असते. बरें; तिथें ज्या लोकांना रहाणें भागच पडतें त्या लोकांना तेथील हवेमुळें चांगलें काम करतां येत नाहीं व त्यामुळें त्यांचे कडून नेहमींच्या परिस्थितींत जितकी संपत्ति मिळविली जावी तितकी मिळविली जात नाहीं.

एकंदरींत काय कीं, कमलावर अनंत हस्तें मनुष्यप्राण्याला मदत करतो आहे. मनुष्यानें त्या मदतीचा फायदा घेऊन श्रीमान व्हावें अशी त्याची इच्छा आहे. हा जगताचा पसारा म्हणजेच परमेश्वरी मदत, आणि ही परमेश्वरी मदत म्हणजेच आपल्या अर्थशास्त्राच्या भाषेंतली सृष्टि. ''

'' मला सृष्टि म्हणजे काय हें चांगलें समजलें आतां आप्पासाहेब; पण मी शेतकरी मनुष्य असल्यामुळें मी आपलें माझ्या शेतीलाच जास्त प्राधान्य देतों येवढें खरें'' मीं म्हणालों.

'' जगांतील बहुतेक लोक शेतीलाच प्राधान्य देतात. पण शेती म्हणजेच सर्व कांहीं असें मात्र नाहीं येवढेंच सागण्याचा माझा उद्देश.

प्रत्येक धंद्याला थोड्या बहूत जमीनीची जरूर लागतेच. कार-

खाना काढावयाचा झाला तरी जमीन पाहिजेच. येवढेंच काय जमीनी-शिवाय मनुष्य प्राण्याला मुळीं जगतांच यायचें नाहीं. आणि म्हणून जमीनीला अर्थशास्त्रांत इतकें महत्व.

आतां ज्या अर्थी बाबूराव तुम्हाला शेतींतच जास्त गोडी आहे त्या अर्थी आपण उद्यां आपल्या शेती संबंधानेंच थोडेंसें जास्त बोलूं या. आज मला वाटतें येवढेंच पुरें झालें. सृष्टि ( land ) म्हणजे काय येवढें आज आपण ठरवलें हें काय थोडें झालें? उद्यां आपण उतरत्या पैदाशीचा सिद्धांत म्हणजे काय हें पाहूं."

## प्रकरण सहावें.

# उतरत्या पैदाशीचा सिद्धान्त.

### उत्तमराव देशमुखांचा अनुभव.

उतरत्या पैदाशीचा सिद्धांत हें काय गौडबंगाल असावें हें मला कितीही विचार केला तरी कळेना. या सिद्धान्ताचा संबंध जमीनींतून उत्पन्न होणाऱ्या पिकाशीं आहे, येवढें मात्र माझ्या लक्षांत आलें होतें, आणि त्याचें कारण आप्पासाहेब तसें कांहींतरी म्हणाले होते म्हणून. माझें मला त्या संबंधानें कांहीं कळलें नव्हतें येवढें मात्र अगदीं खरें.

दुसरे दिवशीं सकाळीं मी आप्पासाहेबांचेकडे गेलों तों तेथें कालचेच उत्तमराव देशमूख मला बसलेले दिसले. विठू धनगराचा व उत्तमराव देशमुखांचा सवदा पक्का झाला व खरेदीखत उद्यां होणार असें मला तेथें कळलें. उत्तमराव आपल्याला विठू धनगराचें शेत विकत घ्यायला सांपडलें म्हणून फार खूष झालेले दिसले.

" उत्तमराव तुम्ही हें शेत विकत घेतलेंत हें एकंदरींत बरें केलेंत " आप्पासाहेब म्हणाले " पण तुम्ही माझ्या एका प्रश्नाचें उत्तर दिलें पाहिजे. तो प्रश्न हा. "

"पण आप्पासाहेब आपला उतरत्या पैदाशीचा सिद्धांत राहिला ना!" मी मध्येंच म्हणालों.

" राहूं द्या हो बाबूराव तुमचे सिद्धांत बाजूला. आपण सध्यां या उत्तमरावजीशींच बोलूं या. नाहीं तरी असले लोक कुठें आप-

त्याला नेहमीं भेटत असतात. हं! उत्तमराव, तुम्ही हें नवें शेत घेण्याचे ऐवजीं आपल्या जुन्या शेतींतच जास्त सुधारणा केली असतीत, तर तुम्हाला सध्यां मिळतें त्यापेक्षां त्याच जमीनींत पीक आलें नसतें का? आणि तसें जर जास्त पीक येणें शक्य आहे असें तुम्हाला वाटत असलें तर तुम्ही ही नवी शेतीची भानगड कशाला अंगावर घेतलीत?"

"तुम्हाला असें वाटतें आप्पासाहेब" उत्तमराव म्हणाले "कीं आम्हां म्हाताऱ्या माणसांनां व्यवहार कांहीं कळत नाहीं. आतां तुमच्यासारखे आम्हीं कांहीं शिकलेलों नाहीं; तेव्हां तुम्हाला तसें वाटणें साहजीक आहे. पण येवढें खरें आप्पासाहेब कीं एखादी गोष्ट आम्हाला तुमच्या सारखी शास्त्रीय व डौलदार भाषेंत जरी न सांगतां आली तरी ती आम्हाला समजत नाहीं असें मात्र नाहीं. पण तें जाऊं द्या. जुन्या जमीनींत ज्यास्त सुधारणा करण्याऐवजीं मी नवी जमीन कां विकत घेतली हा तुमचा प्रश्न आहे व त्याला मी माझ्या खेडवळ पद्धतीनें तुम्हांला उत्तर देतों.

शेतकरी जमीनींत आप्पासाहेब जितकी सुधारणा करील तितकें त्यांत जास्त पीक येईल ही गोष्ट खरी आहे. माझ्या येथल्या जमीनींत दरएकरीं जर १५ रुपयांचें पीक येत असलें, व ह्यांत मी जर ३ रुपयांचें खत टाकलें, तर मला खातीनें २५ रुपये एकर पर्यंत पीक येईल. मनुष्याची येवढी मेहनत कधींतरी फुकट जाईल कीं काय आप्पासाहेब? तात्पर्य काय कीं ३ रुपये जास्त खर्च करून मला १० रुपये किंमतीचें जास्त पीक काढतां येईल. आतां अशी कल्पना करूं आप्पासाहेब आपण, कीं मी ३ रुपये किंमतीचें खत न टाकतां ६ रुपये किंमतीचें खत दर एकरीं टाकलें, तर मला कांहीं २० रुपये दर एकरीं पीक जास्त येणार नाहीं. फारतर १६

रुपये एकरीं जास्त पीक येईल म्हणजे मुळींच खत न टाकतां जर मला १५ रुपये एकर प्रमाणें पीक आलें असतें, तर ६ रुपये एकर खत टाकून मला ३१-३२ रुपये एकर प्रमाणें पीक येईल. एकंदरींत काय आप्पासाहेब कीं मीं जितकें जितकें जास्त खत टाकीन तितकें तितकें मला जास्त पीक मिळत जाईल, हें जरी खरें असलें तरी तितक्या प्रमाणांत जास्त मला पीक मिळायचें नाहीं, हेंही खरें आहे.

आपण नुकतेंच पाहिलें आप्पासाहेब कीं ३ रुपये एकरीं जास्त खर्च करून मला पहिल्याप्रथम १० रुपये एकरीं नफा करून घेतां आला; पण पुढें सहा रुपये एकरीं जास्त खर्च केल्यावर माझा नफा एकरीं १७ रुपये झाला. हिशोबानें तो २० रुपये व्हायला पाहिजे. आणखी मीं माझ्या शेतावर जास्त खर्च वाढवत गेलों तर माझा नफा कमी होत होत शेवटीं माझा जमा व खर्च सारखा होईल. तेव्हां इतकी स्थिति येऊं देण्यादेवजीं आपण दुसरा एखादा उपाय पाहणें जास्त श्रेयस्कर नाहीं का?

आप्पासाहेब मी माझ्या शेतीवर बहुतेक सुधारणा केल्या आहेत. माझे शेतीवर ट्रॅक्टर नांगर मी चालवतों; लोखंडी मोटा वापरतों; उत्तम बियाणी मी यवतमाळच्या दादा कण्यांचेकडून आणवितों. अहो अकोला प्रदर्शनांत माझे कापसाला पहिलें बक्षिस मिळालें होतें ना आप्पासाहेब? तेव्हां आप्पासाहेब माझा आपला अनुभव मला असें सांगतो कीं आतां आहे त्याच्यांतच ज्यास्त सुधारणा करणें कांहीं किफायतशीर नाहीं, आणि म्हणून मी हातीं असलेला पैसा दुसरी शेती घेण्यांत खर्च करीत आहें."

उत्तमराव आणखी कांहीं बोलणार होते इतक्यांत त्यांना खालीं दादासाहेब बोलावत आहेत असें सांगत विठू धनगर वर आला.

तेव्हां कांहींतरी खरेदीखताची गडबड असेल असें म्हणत उत्तमराव विठूबरोबर खालीं गेले व आम्ही दोघेच हॉलमध्यें राहिलों.

"काय बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले " कसचा विचार करीत आहांत तुम्हीं ? उतरत्या पैदाशींच्या सिद्धान्तासंबंधानें होय ? मला वाटतें तुम्हाला आतांपर्यंत उतरत्या पैदाशीचा सिद्धान्त समजला असेलच. सांगा बरें मग उतरत्या पैदाशीचा सिद्धान्त म्हणजे काय तें ?"

" हें ठीक आहे तुमचें आप्पासाहेब! तुम्ही मला त्या सिद्धांन्ता संबंधानें कांहींतरी सांगितलेंत कां ? मग मला तरी तुम्हाला काय बरें सांगतां येईल ? मी म्हणालों.

" मग बाबूराव उत्तमराव आतांपर्यंत आपल्याला काय सांगत होते याचेकडे तुमचें लक्ष नसलें पाहिजे. उत्तमरावनीं नवीन शेत विकत कां घेतलें. व जुन्याच जमीनीची मशागत जास्त कां केली नाहीं याचें कारण त्यांनीं जें सांगितलें तें तुम्हाला समजलें का ?"

" तें न समाजायला काय झालें आप्पासाहेब " मी म्हणालों. " उत्तमराव म्हणाले कीं जुन्याच जमीनीची जास्त मशागत करणें त्यांना फायदेशीर पडेना. ते जितकी जास्त सुधारणा करीत, तितकें त्यांना जास्त पीक येई. पण तें तितक्या प्रमाणानें जास्त येईना आणि म्हणून त्यांना आपली मेहनत व पैसा जुन्याच शेतीवर खर्च करण्यापेक्षां तो नवी शेती घेऊन तीवर खर्च करणें जास्त श्रेय-स्कर वाटलें."

"झालें तर मग बाबूराव" तुम्हाला उतरत्या पैदाशीचा सिद्धान्त समजला." आप्पासाहेब म्हणाले "उत्तमरावनीं खताचें उदाहरण घेतलेलें तुम्हाला ठाऊक असेलच. दर एकरीं १५रुपये पीक येणाऱ्या शेतांत ३ रुपये किमतीचें खत घातलें तर २५ रुपये एकर उत्पन्न होतें म्हणजे ३

रुपये किंमतीचें भांडवल व मेहनत जास्त घातली म्हणजे उत्पन्न १० रुपये एकर प्रमाणें वाढतें. पण पुढें ६ रुपये एकर प्रमाणें जास्त खत जर घातलें तर उत्पन्न २० रुपये एकरीं वाढत नाहीं. ६ रुपये एकरीं जास्त मशागतींत खर्च केले तर उत्तमरावनां एकरीं ३१-३२ रुपये पीक होतें असें ते म्हणाले, तेव्हां पहिल्या तीन रुपये किंमतीच्या मशागतींत उत्तमरावांनां जितकें पीक झालें त्या पेक्षां ६ रुपये किंमतीच्या मशागतींत जरी जास्त झाले असलें तरी तें **त्या प्रमाणांत जास्त** झालें नाहीं. पहिल्या मशागतींत त्यांनां २५ रुपये एकर पीक आलें. तर दुसऱ्या मशागतींत ३२ रुपये एकर पीक आलें. म्हणजे पहिल्या ३ रुपये खर्चांत १० रुपये एकर जास्त पीक आलें तर आपल्या साध्या हिशोबानें ६ रुपये खर्चांत २० रुपये किंमतीचें जास्त पीक यायला पाहिजे होतें. म्हणजे ३५ रुपये एकरीं पीक यायला पाहिजे होतें. या उदाहरणावरून काय सिद्धांत निघतो बाबुराव?"

**" सिद्धान्त हाच कीं जितका जास्त पैसा व श्रम मनुष्य शेतीवर खर्च करील तितकें जास्त उत्पन्न त्याला होईल. पण ज्या प्रमाणांत मनुष्य आपला खर्च शेतीवर वाढवील त्या प्रमाणांत त्याचें उत्पन्न कांहीं वाढणार नाहीं तर तें कमी होत जाईल व शेवटीं अशी एक वेळ येईल कीं ज्या वेळेस शेतीवर करावा लागणारा खर्च हा शेतीच्या उत्पन्नाचे किंमती येवढाच झाल्यामुळें मनुष्य त्याच शेतीवर जास्त मेहनत करण्यापेक्षां नवी शेती घेणें पसंत करील.**

"ब्रेव्हो बाबुराव" आप्पासाहेब एकदम ओरडले " तुम्ही तर अगदीं कमाल केलीत कीं. आतां आपण आपली एक चूक दुरुस्त केली पाहिजे बाबुराव. आपण वर म्हटलें कीं उत्तमरावांनीं ३ रुपये

किंमतीचें खत शेतींत घातलें कीं १० रुपये किंमतीचें जास्त पीक येतें, खरें पाहूं गेलें असतां पीक जें येतें हें धान्याचें; त्या धान्याची किंमत कमी जास्त व्हावयाची. तेव्हां आज जें १० रुपये किंमतीचें पीक आहे तितकेंच पीक पुढल्या वर्षी कदाचित् १५ रुपये किंमतीचें होईल. तेव्हां आपल्याला शास्त्रीय भाषेंत जर सिद्धांत सांगावयाचा झाला तर आपल्याला तो अशा रीतीनें सांगावा लागेल. **जितकी जास्त मजुरी व भांडवल शेतीवर लावावें तितका तिचा मगदुर वाढून तिच्यांत जास्त पीक येईल पण जास्त पीक जरी आलें तरी तें त्या प्रमाणांत जास्त येणार नाहीं.** या उतरत्या पैदाशीच्या सिद्धांताला इंग्रजींत Law of Diminishing Returns असें म्हणतात.

हा उतरत्या पैदाशीचा सिद्धान्त खाणींनाही लागू आहे. कारण आपण जितकें जास्त खालीं खणत जाऊं तितका खर्च जास्त होईल. आणि कोळसा जितका पूर्वी आणला जात होता तितकाच एका दिवसांत वर आणला जाईल. म्हणून खाणवाला जरूरच पडली कीं मग खालीं खणायला लागतो यांत नवल तें कसलें.

तशीच स्थिति घरांचा पहिला मजला बांधावयाला जितका खर्च येतो त्या मानानें त्याला भाडें बरें येतें; पण समजा आपण दहा मजली घर बांधलें तर ज्या मानानें पहिल्या मजल्याला भाडें येईल त्या मानानें दहाव्या मजल्याला कमी भाडें येईल. इतक्या वर रहाण्याचा साधारणतः सळ्यानांच कंटाळा येतो, व विजेच्या पाळण्यांची वगैरे कितीही रेलचेल असली तरी इतक्या वर रहाणाऱ्या लोकांचें एकंदर जीवित पराधीन होतें. बरें खर्चाच्या दृष्टीनें १० वा मजला बांधणें फारच खर्चाचें होतें. इतक्या वर सामान न्यावयाचें

म्हणजेच कोण त्रास. तेव्हां खर्च जातो वाढत, व उत्पन्न होतें कमी एकंदरींत उतरती पैदासच.

एकंदरींत बाबूराव ज्या गोष्टींचा त्यांच्या निव्वळ अस्तित्वाकरतां सृष्टीशीं संबंध येतो त्या सर्व गोष्टींना हा उतरत्या पैदाशीचा सिद्धान्त लागूं आहे.

ही उतरती पैदास निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या वेळीं सुरू होते. जिथें शेतकीच्या मशागतीचीं पुष्कळ साधनें उपलब्ध आहेत तेथें कदाचित् ही सुरवात उशीरां सुरू होईल; हिंदुस्थानसारख्या देशांत, लवकर होईल इतकाच काय तो फरक. एकंदरींत हा सिद्धात साधारणतः सर्व देशांत सर्व काळीं लागू पडायाला हरकत नाहीं.

काल व आज मिळून बाबूराव आपण द्रव्योत्पादनाकरतां मनुष्य जी खटपट करतो त्या कामीं सृष्टिदेवता त्याला कशी मदत करते हें पाहिलें. संपत्तीच्या मूर्त कारणांपैकीं आपण सृष्टीसंबंधानें विचार केला. आज आपण सृष्टीची मदत आपल्याला सारखी कमी कमी कशी होत जाते हें पाहिलें. आतां उद्यां मनुष्य स्वतःच्या अंगमेहनतीनें संपत्ति कशी मिळवितो तें आपण पाहूं; आज इतकेंच पुरे असें नाहीं तुम्हाला वाटत बाबुराव?

"ठीक आप्पासाहेब" मी म्हणालों, "आतां उद्यां पुन्हां आपलें संभाषण पुढें चालवूं, नमस्कार."

## प्रकरण सातवें.

# श्रम.

नेहमींप्रमाणें मी जातांच आमचे संभाषणाला सुरवात झाली.

"काय बाबूराव आपलें जहाज कुठपर्यंत आलें आहे, याची आहे का कांहीं कल्पना तुम्हाला ?" "आप्पासाहेब म्हणाले" आपण पहिल्यानें अर्थशास्त्र म्हणजे काय तें पाहिलें; संपत्ति मिळवीत असतांना मनुष्य व्यवहारांत ज्या रीतीनें वागतो त्या रीतींचा ज्या शास्त्रांत विचार केला जातो तें अर्थशास्त्र हें आपण प्रथम पाहिलें. नंतर संपत्ति म्हणजे काय हें आपण ठरविलें. नंतर संपत्ति उत्पन्न केली जाते म्हणजे काय ? कोणाच्या उपायांनीं किंवा मार्गांनीं संपत्ति हस्तगत करून घेतां येते, याचा आपण थोडक्यांत विचार केला. संपत्ति उत्पन्न करावयाची कशाकरतां, तर तिचा आपल्याला उपभोग घेतां यावा म्हणून. आणि उपभोग घेणें म्हणजे त्या संपत्तीचा नाश करणें. ही संपत्ति उत्पन्न करीत असतांना मनुष्य ज्या सर्व शक्तींची मदत घेतो त्या त्या सर्व शक्तींना त्याला आपल्या प्राप्तींतील वाटा देणें मनुष्याला जरूर असतें आणि संपत्तीच्या असल्या हिस्सेरशीला वांटणी Distribution ) म्हणतात.

संपत्ति मनुष्याला मिळवितां यावी म्हणून परमेश्वर सृष्टिरूपानें उद्योगी मनुष्याला सहाय्य करतो आणि सगळ्यांत ज्यास्त डोळ्यांत भरणारें परमेश्वराचें सहाय्य म्हणजे जमीनीची मनुष्याला अन्न उत्पन्न करून दिली जाणारी मदत हें होय. काल आपण सृष्टीच्या मदतीसंबंधानें, व त्यांतल्या त्यांत शेतीच्या जमीनीसंबंधानें विचार केला. उतरत्या पैदाशीचा सिद्धांत काय आहे हें आपण काल ठरविलें.

आतां आज संपत्तीकरतां मनुष्यानें स्वतः अंगमेहनत करणें किती जरूर आहे हें आपण पाहूं या. तुम्हाला जांभूळलोष्याची गोष्ट माहीत आहे का बाबुराव? एक अति आळशी मनुष्य जांभळाच्या झाडाखालीं निजला होता. झाडावरून एक जांभूळ पडलें; पण तें पडलें त्या गृहस्थाच्या ओंठावर; आतां काय करावयाचें? जांभूळ खावयाची तर इच्छा फार पण ओंठावरचें जांभूळ तोंडांत ढकलावयाचें कोणी? रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येक मनुष्याला हे गृहस्थ ओंठावरचें जांभूळ त्यांचे तोंडांत ढकलून देण्याची विनंति करीत. पण कोणी कांहीं त्यांचेकडे लक्ष देईना सरतेशेवटीं तें जांभूळ या बुवांचे पोटांत गेलें नाहींच.

परमेश्वरानें जरी संपत्तीचा भांडारखाना तुमचे पुढें उघडून ठेवला तरी तुम्हाला त्यांतली संपत्ति घेण्याची तरी मेहनत जरूर पडते. प्रत्येक गोष्ट नुसत्या इच्छेवर अवलंबून नसते. त्या इच्छाशक्तीला प्रयत्नाची म्हणजेच अंगमेहनतीची जोड द्यावी लागते आणि ह्या अंग मेहनतीलाच श्रम किंवा इंग्रजींत Labour म्हणतात.

आपण गणबाला कामाला जातांना नेहमीं पहातोंच बाबूराव. कामावर जातांना तो नेहमींच खूष नसतो. मनुष्य प्राण्याचा मुळीं असा स्वभावच आहे कीं शक्य तों मुळींच काम न करतां चैन करावयाला सांपडावी. गणबाला जर घरच्या लोकांचीं पोटें भरण्याचीं जबाबदारी वाटली नसती, स्वतः साधारणतः बरें रहावें असें जर त्याला वाटत नसतें, तर तो पावसांत कामावर कधींच गेला नसता. तात्पर्य हेंच कीं मनुष्य जी मेहनत करतो ती बहुतांशीं संपत्ति मिळविण्याकरतां असते. ती मेहनत करण्यांत मनुष्याला सूख वाटत असतें म्हणून नव्हे.

एखादे वेळेस मनुष्य चैन म्हणूनच अंगमेहनत करतो. ग्लँड-

स्टन साहेब स्वतः लांकडे फोडीत असत. आणि आतां सुद्धां आपले बॅरिस्टर देशपांडे स्वतःच आपली मोटार चालवितात. पण ह्या गोष्टी ते जरी करतात तरी ती त्यांची खुषीची चैन किंवा चैनीची खुषी असते, अर्थात् असलीं अपवादादाखल उदाहरणें आपण सोडूनच द्यावयाचीं. बॅरिस्टर देशपांडे सभेकरतां म्हणून आंत गेल्यावर मोटारमध्यें त्यांची वाट पहात बसलेला शॉफर चैनीनें तेथें बसला असेल असें आपण खास्नीनें म्हणणार नाहीं.

आपण पूर्वी पाहिलेंच आहे बबूराव कीं संपत्ति मिळविणें किंवा वाढविणें म्हणजे असलेल्या वस्तूंची उपयुक्तता वाढविणें. सृष्टिरूपानें किंवा शेतीच्या जमीनीच्या रूपानें अनंतहस्तें कमलाकर मदत करीतच असतो पण ती मदत घ्यायला मनुष्य तरी तयार पाहिजेत ना?

एकंदरींत काय बाबूराव कीं बहुतेक लोक संपत्तीकरतां श्रम करतात. श्रमाचा मोबदला त्यांना संपत्ति पाहिजे असते. गणबानें एक दिवस श्रम केले तर त्याला आपण आठ आणे देतों व तो आठ आणे रोज मजूरी मिळवितो असें आपण म्हणतो, पण तेच बॅरिस्टर देशपांडे पांशचें रुपये रोज मागतात व रुपये हातांत पडल्याशिवाय कोर्टांत उभा रहाणार नाहीं म्हणून पक्षकाराला बजावीत असतात. गणबाही दिवसभर श्रम करून पैसे मिळवितो व बॅरिस्टर देशपांडेही पैसे मिळवितात पण गणबाच्या पैशाला मजूरी म्हणतात व देशपांड्यांच्या पैशाला-पण ते मोठे लोक आहेत.

प्रत्येक मनुष्य श्रम करून संपात्ति वाढवूं शकतो. अर्थात देशांतले जितके जास्त लोक श्रम करतील तितकी त्या देशांतील संपत्ति वाढेल हें उघड आहे.

शारीरिक मेहनत करून पैसे मिळविणाऱ्या लोकांना मजूर

( labour ) म्हणतात. आतां इंग्लंडांतला साहेब- इंग्लंडांत मजूरी करूं लागला असतां त्याला इंग्लंडांत जितके पैसे मिळतात त्याच्या तिसऱ्या हिश्याइतके सुद्धां हिंदी मजूराला हिंदुस्थानांत पैसे मिळत नाहींत. याचें कारण काय असेल तुम्हाला वाटतें बाबूराव ? ”

“ याचें कारण इंग्लंडमधले लोक जास्त हुशार असतील ” मी म्हणालों.

“ तसें नव्हे बाबूराव ” आप्पासाहेब म्हणाले “ मजूरींतला हा फरक असायला मुख्य कारण म्हटलें म्हणजे दोन्ही मजूरांच्या कार्य-क्षमतेंत ( efficiency ) फार फरक आहे. हा फरक पडण्याचीं कारणें मुख्यत्वेंकरून तीन आहेत. पहिलें कारण म्हटलें म्हणजे मजूराची काम करण्याची ताकत, त्याची प्रकृति. त्याची रहाणी वगैरे.

दुसरें कारण मजूरांची संख्या.

आणि तिसरें म्हणजे त्याचें धंदे शिक्षण.

नुसतीं अशीं कारणें सांगून तुमची समजूत पटायची नाहीं ही गोष्ट माझ्या आली आहे लक्षांत बाबूराव” आप्पासाहेब पुढें म्हणाले” आणि म्हणून आपण एकएक कारणाचा निरनिराळा विचार करूं.

कोकणांतला एखादा बाल्या पाहिला आहेत ना तुम्ही बाबूराव ! मुंबईस तुम्हाला पुष्कळ लोक असे पहायाला सांपडतील ! सारा दिवस मेहनत करायची त्यांची तयारी असते. आतां इकडचा विठू धनगर पहा. सारा दिवस सुस्त. हा फरक हवेंतील फरकामुळें होतो. आपल्या वऱ्हाडांत उन्हाळ्यांत कांहींच काम करणें शक्य नसतें पण तेंच थंड हवेच्या ठिकाणीं आपण जरी सर्व दिवस काम केलें तरी थकवा येत नाहीं. आतां सारा वर्षभर काम करणाऱ्या मनुष्याला दहा महिनेच काम करणाऱ्या माणसापेक्षां जास्त पैसा मिळणार हें उघड आहे. आणि दहा महिने चांगलें

काम करणाऱ्या माणसाला १२ महिने आळसानें काम करणाऱ्या मनुष्यापेक्षां जास्त पैसा मिळेल हेंही उघड आहे.

आपलें पोट भरलें असलें म्हणजे आपल्याला काम करावयाचा जो हुरूप असतो तो आपण अर्धपोटीं काम करूं लागलों तर खात्रीनें रहाणार नाहीं. अर्थात् ज्या मजूराला पोटभर खावयाला मिळेल असा मजूर अर्धपोटीं काम करणाऱ्या मजूरापेक्षां जास्त चांगल्या रीतीनें काम करील हें उघड आहे. दुष्काळांत रिलीफ-कामें सुरूं होऊन त्यावर कितीतरीं मजूर काम करीत असतात; पण त्यांचेकडून चांगलीं कामें होत नाहींत हें आपण नेहमीं पहातोंच.

आतां हिंदुस्थानचें दारिद्र्य सुप्रसिद्धच आहे. दररोज अर्ध-पोटीं राहून जिवंतपणीं मरणाचे सोहाळे भोगणारे अभागी हिंदु-स्थानांत कोट्यावधी आहेत. हिंदुस्थानांत दर तीन मुलांत एक लहान मूल पांच वर्षांच्या आंत मरतें. भुकेनें पीडलेल्या आईबापांना झालेलीं मुलें इतक्या लवकर मरतात यांत नवल कसलें बाबूराव! आणि म्हणून प्रत्येक राष्ट्रभक्तांचें हें म्हणणें असतें कीं प्रथम देशांतल्या मनुष्याला पोटभर खायला मिळूं द्या.

इंग्लंडांतल्या मजूरांची तेथें तेथल्या सरकारला भीति वाटते. मजूराला काम दिलें पाहिजे कारण त्याच्या पोटाला अन्न पाहिजे; आणि तें मिळविण्याचा प्रामाणीक मार्ग त्याला जर न राहिला तर वाटेल त्या उपायांनीं तो आपली पोटाची खळगी भरील हें तेथील सरकारच्या पूर्ण ध्यानांत आहे.

तसेंच बाबूराव मजूराला विश्रांतीही हवीच. आठवड्याचे सारे

दिवस जर तुम्ही मनुष्याकडून काम करून घ्याल तर त्याला कामाचा फारसा हुरूप राहणार नाहीं.

आतां तुम्हीच सांगा बाबूराव, मजूराची काम करण्याची ताकद कोणत्या गोष्टींवर मुख्यत: अवलंबून असते ? ”

“ उत्तम हवा, पाणी. पोटभर अन्न, जरूर तेवढा कपडा, आणि थोडीशी विश्रांति ह्या गोष्टींचा मजूराच्या काम करण्याच्या उमेदीवर फार परिणाम होतो. ”

“ शाबास बाबूराव ! तुम्हीं बरोबर उत्तर दिलेंत. त्याचप्रमाणें मजुराला अरोग्यकारक रहाणी हीपण पाहिजे असते; कारण मलेरियानें किंवा अशाच कांहीं रोगांनीं जर्जर झालेला जरत्कारु मजूर काय काम करूं शकेल हें त्याचें शरीरच सांगूं शकतें. अंगभर कपडा असणें जरूर आहे हें मी तुम्हाला सांगायला विसरलोंच होतों. तें तुमच्याच ध्यानांत आलें हें फार चांगलें झालें.

आतां बाबूराव आपण एकदम तिसऱ्या कारणाचा विचार करूं; आणि त्याकरतां आपल्याला आपल्या गावांतीलच उदाहरण घेतां येईल आपल्या गणबाला आपण आठ आणे रोज सुद्धां देतों पण धोंडबाला कोणी सहा आणे द्यावयाला तयार नसतो. याचें कारण काय बाबूराव ?”

“ अहो धोंडबा म्हणजे नुसता धोंडा आहे ” मी म्हणालों “ सांगितलेलें काम सुद्धां त्याचे हातून नीटपणानें होईना. त्याला पैसे देणें म्हणजे ते नुसते फेंकून देणें होय. ”

“ ठीक बोललात बाबूराव ! मजूरी करावयाची आणि ती जरी अंगमेहनत करावयाची असली तरी मजूराला थोडेंबहुत डोकेंही पाहिजेच. डोकें म्हणजे मुंडासें ठेवावयाची खुंटी असेंच कांहीं नाहीं. गणबाला कामाचा उरक आहे. लहान सहान मोडतोड नांगरांत

२६५९

झाली तर गणबा ती दुरुस्त करून घेऊं शकतो. सारांश काय तर गणबाला तारतम्य आहे. गणबाचें सामान्य शिक्षण झालेलें आहे."

"अप्पासाहेब सामान्य शिक्षण म्हणजे काय?" मी विचारलें.

"सामान्य शिक्षण म्हणजे शाळेंत जाऊन मिळालेलें शिक्षण असें नव्हे, तर सामान्यतः धंद्यांत पडलें असतां कसें वागावयाचें याची त्रोटक माहिती असली तरी तें पुरेसें सामान्य शिक्षण होईल. सामान्य शिक्षण अनुभवानेंही येईल. आणि गणबाचें सामान्य शिक्षण नुसत्या अनुभवानें मिळविलेलें आहे. असल्या सामान्य शिक्षणाला इंग्रजींत general training म्हणतात. धोंडबासारख्या मनुष्याला कोणी होतां होईलतो कामावर बोलवत नाहीं याचें कारण त्याचेकडून त्याला मजूरी देणें परवडेल इतकें सुद्धां काम होईल अशी लोकांची खात्री नसते हें होय.

मजूराला सामान्य शिक्षण पाहिजे असतें. त्याचप्रमाणें एखाद्या धंद्याचें विशिष्ट शिक्षण त्याला मिळालें असलें म्हणजे त्याची प्राप्ति खात्रीनें वाढते. गणबाला आठ आणे रोज मिळतो. विठू गवंड्याला दोन रुपये अडीच रुपये रोज मिळूं शकतो. पण विठू जोंपर्यंत गवंड्याचें काम करीत आहे, तोंपर्यंतच त्याला इतके पैसे मिळतील. उद्यां तोच गणबाबरोबर शेतांत सोंगणीकरतां जाऊं लागला, तर त्याला गणबाच्या इतकें कांहीं काम होणार नाहीं. असल्या तऱ्हेचें विशिष्ट शिक्षण ( Special Training ) ज्या मनुष्याला असेल त्याला त्याचे धंद्यांत जास्त पैसे मिळतात यांत आश्चर्य नाहीं.

कांहीं एका मर्यादेपर्यंत आपला जातिभेद बाबूराव विशिष्ट शिक्षणाला पोषक आहे. विठू गवंड्याचा मुलगा हरी हाही गवंडीच व्हावयाचा. विठू त्याला आपल्या धंद्यांतलें सर्व हुन्नर सांगणारच. तेव्हां हरी हाही आपल्या बापाप्रमाणें गवंडीकामांतच तयार होणार

अशा तऱ्हेनें त्या धंद्यांतलें विशिष्ट शिक्षण पिढ्यानपिढ्या टिकतें, व त्या कुटुंबांत उत्तम गवंडी निपजूं शकतात. अर्थशास्त्राच्या दृष्टीनें जातिभेदांत एक मोठा दोष आहे; तो हा कीं त्यामुळें मनुष्याला अंगांत कर्तबगारी असूनसुद्धां दुसरा जास्त फलदायी असा धंदा करतां येत नाहीं. असो.

इंग्लंदांतल्या मजूराला जास्त मजूरी मिळते याचें कारण तेथील मजूराला साधारण शिक्षण तर असतेंच; पण त्याला ज्या धंद्यांत पडावयाचें त्या विशिष्ट धंद्यांसंबंधानेंही थोडेंबहुत शिक्षण असतें. बहुतेक इंग्लिश मजूर यंत्रावर कामें करतात. आतां हिंदुस्थानांत पाहिलें तर बहुतेक मजूर नुसते हरकामे. स्वतःला डोकें म्हणून नाहींच. अशा मजूरांना जास्त मजूरी देणें मालकांना तरी कसें परवडेल तुम्हींच सांगा,

दहा धोंडब्यासारख्या मजूरांपेक्षां ३–४ इंग्रज मजूर कितीतरी जास्त काम करूं शकतात. मालकांना आपल्या मजूरांनीं जास्त व चांगलें काम करावें असें वाटणें सहाजीक असतें. आणि म्हणून मजुरांना साधारण व विशिष्ट शिक्षण देणें त्यांना जरूर वाटतें. जितका मालक मजूराला जास्त कार्यक्षम बनवील, तितका मजूर मालकावर खूष असेल, तितका मजूर मन लावून काम करील, व काम चांगलें झाल्यामुळें मालकाला मजूराला जास्त मजूरी देऊन सुद्धां चांगला नफा राहील.

मजुरामध्यें प्रामाणीकपणा, काम करण्याची हौस, व वक्तशीरपणा ज्या मानानें असेल त्या मानानें त्याचे कडून चांगलें काम होईल. व त्यां मानानें त्याला जास्त मजूरी मिळेल.

निरनिराळ्या देशांतील मजुराच्या पैदाशींत फरक कां पडतो याचीं आपण तीन मुख्य कारणें ठरविलीं. पहिलें कारण मजूर

वर्गाची रहाणी, अन्न, विश्रांति, कपडालत्ता वगैरे. दुसरें " कारण कोणचें बाबूराव? "

"दुसरें कारण मजुरांची संख्या व तिसरें ' त्यांचें शिक्षण "— मी म्हणालों ' "पण आप्पासाहेब तुम्हीं तर मजूराच्या संख्येसंबंधानें बोललांतच नाहीं."

"जरा सबूर कराल कीं नाहीं बाबूराव. तुमची आपली सर्व गोष्टींत घाईच. मजुराच्या संख्येसंबंधानें आपण उद्यां विचार करूं; पण मजर वर्गाला शिक्षणाची जास्त जरूर कां आहे हें सांगतां येईल का तुम्हाला बाबूराव ? "

' सांगतों कीं मी ' मी म्हणालों " सामान्य शिक्षण मिळालेला मजूर नासधूस न करतां आपलें काम करूं शकतो, व विशिष्ट शिक्षण मिळालेला मजुर आपल्या शिक्षणाच्या बळावर पुष्कळ काम धोंडब्यापेक्षां जास्त उत्तम करतो. जितका मजूर कार्यक्षम तितकी संपत्तीची उत्पति जास्त आणि जास्त संपत्ति मिळविणें जगांतील बहुतेक लोकांचें ध्येय आहे. "

" फार उत्तम बाबूराव " अप्पासाहेब ह्मणाले " आतां उशीर झाला. आज इतकेंच पुरे. उद्यां आपण मजूरांच्या संख्येसंबधानें बोलूं. नमस्कार बाबूराव "

" नमस्कार आप्पासाहेब. "

---

## प्रकरण आठवें

# लोकसंख्येची वाढ व मालथसचें भाष्य.

" मजुरांच्या कार्यक्षमतेचीं काय कारणें आहेत याचा बाबूराव आपण काल विचार केला. मजूरवर्गाची प्रकृति, त्यांचें खाणेंपिणें व रहाणी इत्यादि गोष्टींचा त्यांचे कार्यक्षमतेवर किंवा त्यांचे काम करण्याचे कर्तबगारीवर कसा परिणाम होतो हें आपण पहिल्यानें पाहिलें; व नंतर मजूरवर्गाला सामान्य शिक्षण, व विशिष्ट शिक्षण याची किती जरूरी आहे हेंही आपण पाहिलें. धोंडबाला आपण सहा आणे रोज द्यायला तयार नसतों; पण गणबाला आपण आठ आणे रोज सुद्धां देऊं शकतों, कारण गणबाचें साधारणत: कामांत नेहमीं लक्ष असतें; शेतांत काय काम पडतें, कोणत्या गोष्टींवांचून एकंदर काम एकदम अडतें या गोष्टींचीं साधारणत: त्याला माहिती असल्यामुळें, गणबाचे हातून काम चांगलें होतें. असल्या गणबाला असलेल्या माहीतीला सामान्य शिक्षण ( General Education) असें म्हणतात. विठू गवंडी आपल्या धंद्यांत वाकबगार असल्यामुळें त्याला आपल्याला दोन रुपये रोज देणें सुद्धां परवडतें. कारण विठू गवंड्यानें आपले बापाचे हाताखालीं काम करून आपल्या धंद्यांत चांगलें प्राविण्य मिळविलें आहे.

हीं झालीं दोन कारणें, आज आपण तिसऱ्या कारणासंबंधानें बोलूं असें ठरविलें होतें. कोणचें बरें तें तिसरें कारण बाबूराव ?"

" आज आपण मजुरांच्या संख्येसंबंधानें बोलणार होतों " मी म्हणालों. " पण आप्पासाहेब मला एक शंका आहे. मजुरांची

संख्या त्यांच्या काम करण्याच्या कर्तबगारींत कसा फरक करील, हेंच माझ्या ध्यानांत येत नाहीं. "

" तर मग तेंच मी तुम्हाला पहिल्यानें सांगतों बाबूराव " आप्पासाहेब म्हणाले " जेव्हां आपण मजूरांच्या संख्येसंबधानें बोलतों तेव्हां आपण कांहीं एखादे विशिष्ट गांवांतील मजूरांचेसंबंधानें बोलत नाहीं, तर एकंदर देशांतील मजूरांसंबंधानें आपण बोलत असतों. आतां पूर्वी आपण पाहिलेंच आहे कीं, मनुष्य आपल्या मेहनतीनें वस्तूंची उपयुक्तता वाढवितो व अशा रीतीनें देशाचे व स्वत:चे देखील संपत्तींत भर घालतो. धोंडबा काम करून जितकी संपत्ती मिळवील त्या पेक्षां कितीतरी जास्त पैसा गणबा मिळवितो. आतां एक गणबा ज़र राष्ट्रीय संपत्तींत म्हणजे देशाच्या एकंदर संपत्तींत इतकी जास्त भर घालूं शकतो, तर मजूर वर्गांत असे जितके अधीक गणबा असतील तितकी देशाची संपत्ति अधिक वाढणार नाहीं का ? जास्त लोकसंख्येच्या देशांत जास्त लोक काम करीत असल्यामुळें जास्त संपत्तीची कमाई होते, व अशा रीतीनें राष्ट्रीय संपत्तींत ( National Wealth ) जास्त भर पडते. वाढत्या लोकसंख्येचा राष्ट्रीय संपत्ती वाढविण्याचे कामीं इतका उपयोग होत असल्यामुळें आज आपण लोकसंख्येसंबंधानें जास्त विचार करावयाचें ठरविलें आहे. मी काय म्हणतों आलें का तुमच्या ध्यानांत बाबूराव ?"

" होय " मी हलकेंच म्हणालों.

तर मग आतां आपण देशांतील लोकसंख्या वाढते कशी तें पाहूं. आपल्या जातीची वाढ करावयाची मनुष्य प्राण्याची साधारणत: सहाजीकच इच्छा असते आणि जर दुसऱ्या अडचणी मध्यें आल्या नसत्या तर आज जगाचे पाठीवर मनुष्य प्राण्याला रहावयाला जागा मिळाली नसती इतकी मनुष्य प्राण्याची सपाटून वाढ झाली असती.

नॉर्थ अमेरिकेमध्यें जेव्हां पहिल्यानें इंग्लिश लोक रहावयाला गेले कीं नाहीं बाबूराव, तेव्हां तेथें त्या लोकांची नुसती चैन होती. मोकळी व शुद्ध रहाणी, वाटेल तेवढी जमीन व पूर्ण स्वातंत्र्य असल्यामुळें तेथील रहिवाशी अगदीं खुषींत असत. अशा स्थितींतील तेथील लोकसंख्या सुमारें पंचवीस वर्षांत दुप्पट झाली व कांहीं कांहीं संस्थानांत तर ती पधरा वर्षांतच दुप्पट झाली."

"तर मग आप्पासाहेब" मी म्हणालों. "लोकसंख्या जर इतक्या थोड्या वर्षांत दुप्पट होते तर मग जगांत आतांपर्यंत खरोखरच अतिशय गर्दी व्हायला पाहिजे होती. पण तसें तर कांहीं झाल्यासारखें दिसत नाहीं."

"मघांचें जें मी नॉर्थ अमेरिकेचें उदाहरण सांगितलें तें एका विशिष्ठ परिस्थितीचें सांगितलें. लोकसंख्येची वाढ होण्याचे बाबतींत दुसऱ्या अनेक अडचणी असतात. तेव्हां आतां आपण लोकसंख्येची वाढ होण्याला पोषक व विघातक अशा कोणाच्या गोष्टी आहेत हें पाहूं.

प्रत्येक राष्ट्राला पुष्कळ वेळां संकटाचे वेळीं सशस्त्र राहून आपल्या भांडणांचा निकाल तरवारीचे बळावर करून घ्यावा लागतो. लढाईचे वेळीं शिपायांची किती जरूरी पडते. व केवढालीं मोठालीं लष्करें समरांगणावर उभीं करावीं लागतात हें आपल्याला गेल्या महायुद्धाचे वेळीं दिसून आलेंच आहे; अशा वेळीं सरकारसुद्धां वाढत्या लोकसंख्येला उत्तेजन देत असतें."

"पण आप्पासाहेब" मी मध्येंच म्हणालों "अशा वेळीं जरी लोकसंख्या वाढली तरी तीं मुलें त्या वेळीं थोडींच लढाईच्या उपयोगीं पडणार आहेत!"

"त्या लढाईंत तीं मुलें लढाईचे उपयोगीं पडणार नाहींत ही

गोष्ट खरी. पण लढाईंत मिळालेले यशाचा उपयोग घेण्याचे वेळीं तरी तीं मोठीं होतीलच कीं नाहीं ? तसेंच देशाचे तरूण लढाईंत ठार झाल्यामुळें देशांत कामकरी लोकांची पडणारी उणीव शक्य तेवढ्या लवकर भरून यावी याची सरकारला व्यवस्था नको का करावयाला ?

लोकसंख्येच्या वाढीची लढाईचे वेळीं जरूर वाटते तशीच व्यापारधंदा वाढला म्हणजे वाटते. जितके जास्त कारखाने निघतील तेवढी कामकरी लोकांची जरूरी जास्त. जास्त कामकरी लोकांची मागणी असली आणि पुरेसे मजूर कामाला मिळत नसले म्हणजे मजूरी वाढते, व मजूरी वाढल्यामुळें मजूराच्या सुखांत एकंदरींत भर पडते. मजुरांच्या सुखांत भर पडली कीं त्याची हलगर्जीपणामुळें मरणारीं मुलें जगतात. व अशा रीतीनें लोकसंख्येची वाढ होते.

लोकसंख्येची वाढ व्हावयाला जास्त लोकांची जरूरी असावी लागते, आणि ती जरूरी लढाईचे वेळीं व व्यापारधंद्याची वाढ होऊं लागली म्हणजे वाटूं लागते.

आतां लोक संख्येची वाढ कमी केव्हां होते हें आपण पाहूं.

एकंदरींत मजुराला किंवा काम करणाऱ्या माणसाला कामच नसले म्हणजे त्याला पैसे कमी मिळतात. कमी पैसे मिळाले कीं ते वाढत्या कुटुंबाला पुरत नाहींत. त्यामुळें मुलांच्या शरीरप्रकृतीची जेवढी काळजी घेणें जरूर आहे तेवढी घेतली जात नाहीं व त्यामुळें पुष्कळ मुले अकालीं मृत्युमुखीं पडतात. आपल्या हिंदुस्थानचें उदाहरण या बाबतींत प्रसिद्ध आहे.

तसेंच लोकांना एकदां एखाद्या परिस्थितींत रहावयाची संवय झाली, व त्या परिस्थितींत रहाणें त्यांना पुढें जर अशक्य होऊं लागलें तर त्याची प्रवृत्ति कुटुंब वाढविण्याकडे होणार नाहीं.

लोकसंख्या फार न वाढण्याचीं अनेक कारणें आहेत. युरोपांत प्रत्येक राष्ट्राचीं मोठालीं सैन्यें असतात. सैन्यांत रहाणारे शिपाई व हापिसर हे तेथें एकटेच असतात. वयाचीं बरींच वर्षें असल्यातऱ्हेनें, म्हणजे अविवाहित किंवा एकटे रहावयाचें असल्यामुळें त्यांचीं कुटुंबें लहान असतात.

खरें पाहूं गेलें असतां आपल्या हिंदुस्थानांत लोकसंख्येची फारच झपाट्यानें वाढ व्हावयाला पाहिजे. पण तशी ती होत नाहीं. याचीं कारणें काय? हिंदुस्थानांत लष्करी नोकरीचो तर जरूर नाहींच व व्यापारधंद्याचीही मोठीशी वाढ नाहीं ह्या दोन्ही गोष्टी लोकसंख्येची वाढ होऊं देण्याविरुद्ध आहेत.

पण हिंदुसमाजांत प्रत्येक मनुष्याचें लग्न हें झालेलें असतेंच. व तेंही अती लहानपणीं. सत्तावीस अठ्ठावीस वर्षांच्या हिंदी बाईला चार पांच मुलें सहज असतात. ज्या वेळेस इंग्रज बाईचें लग्न होतें त्या वेळेस आमच्या हिंदी बाईला जांवई यावयाचा असतो असें म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. मग हिंदुस्थानची लोकसंख्या इतकी हळूहळू कां वाढत आहे?"

" याचें कारण हिंदुस्थानांतल्या पुष्कळशा लोकांना पुरेसें खायलाही मिळत नाहीं. अपत्य संगोपनाची माहिती नसल्यामुळें पुष्कळ लहान मुलें नुसत्या हलगर्जीपणामुळें मरतात." मी म्हणालों.

" ठीक बोललांत बाबूराव "

आप्पासाहेब म्हणाले, " अपत्यसंगोपनाची आयांना माहिती नसणें हें हिंदुस्थानांतल्या अर्भकांच्या भयंकर मृत्यूसंख्येचें कारण तर आहेच. पण हें एकच कारण पुरेसें नाहीं. तुम्हाला नुक्ताच होऊन गेलेला इन्फ्लुएन्झा आठवत असलेच बाबूराव. हिंदुस्थानां-

तली लाखों माणसें त्या आजारांत दगावलीं. महायुद्धांत इंग्लंडची मनुष्यहानि झाली नाहीं इतकी अभागी हिंदुस्थानची मनुष्यहानि एका इन्फ्लुएन्झाच्या साथींत झाली. दुष्काळ तर एकवर्षाआड हिंदुस्थानांत ठरलेलाच आहे. प्लेग, महामारी, देवी असे हजारों रोग आपला कर वसूल करीतच असतात.

अरे हो एक मूळ मुद्याची गोष्ट मी विसरलोंच कीं बाबूराव. आपल्या समाजांत प्रत्येक मनुष्याचें लग्न जरी बहुतेक हटकून व्हायचें हें ठरलेलें असतें, तरी हिंदुस्थानांत हजारों बालविधवा आहेत त्यांचीं लग्नें पुन्हां होणें निषिद्ध मानलें जात असल्यामुळें त्यांनां जन्मभर व्रतस्थ रहावें लागतें. आणि वाढत्या लोकसंख्येला समाजानें--अर्थात् जुन्या पद्धतीचा--विधवा विवाह निषिद्ध ठरवून एक तऱ्हेचा आळा घातला आहे."

"पण लोकांचें असें करणें ठीक आहे का? मी विचारलें.

"ठीक आहे कीं नाहीं हा आजचा प्रश्न नव्हे बाबुराव. असें आहे ही खरी गोष्ट आहे आणि अर्थशास्त्राला तेवढी गोष्ट पुरेशी आहे.

ज्या देशांत मनुष्यबल जास्त आहे तो देश लष्करीदृष्ट्या बलवान् तर रहातोच. पण त्या देशांत उद्योग धंदे करावयाला माणसें जास्त असल्यामुळें तेथील व्यापार वाढतो. समृद्ध देशांत लोकसंख्या जास्त झपाट्यानें वाढते. व जास्त लोकसंख्येच्या देशांत उद्योगधंदे वाढवावयाला जास्त मोकळी जागा असते."

"तर मग देशांतील लोकसंख्या सारखी वाढत रहाणें ही चांगलीच गोष्ट म्हणायची; नाहीं आप्पासाहेब?" मी विचारलें.

"देशांतली लोकसंख्या सारखी वाढत रहाणें हें देशांतील सुबत्तेचें लक्षण आहे हें खरें आहे. पण लोकसंख्या सारखी वाढणें

म्हणजे काय ? आपण अशी कल्पना करूं कीं एका देशांत १०० मुलें नवीं जन्माला आलीं व पन्नास माणसें मेलीं. म्हणजे एकंदरींत ५० नें देशांतली लोकसंख्या वाढली; पण ह्या शंभर मुलांपैकीं शेकडा ५० जर पांच वर्षांचे आंत मेली तर देशांतील लोकसंख्या एकंदरीनें पाहिजे तशी वाढणार नाहीं. यावरून आपल्या एक गोष्ट ध्यानांत येईल. आणि ती ही कीं, नुसतीं मुलें जन्माला येऊन उपयोगीं नाहींत; तर तीं वाचलीं व पुढें कामधंदा करूं लागलीं तरच देशाला त्यांचा फायदा मिळतो. व अशा काम करणाऱ्या लोकांची जितकी जास्त संख्या वाढेल तेवढा देश उर्जितावस्थेला येत आहे असें समजण्याला कांहीं हरकत नाहीं.

एकंदरींत देशांत सुबत्ता असली कीं लोकसंख्या आपोआप वाढत जाते ही गोष्ट जितकी खरी आहे तितकीच लोकसंख्या जरूरीपेक्षां जास्त झपाट्यानें वाढत जाते हीही गोष्ट खरी आहे."

" जरूरीपेक्षां जास्त झपाट्यानें लोकसंख्या वाढते म्हणजे काय आप्पासाहेब ? मी विचारलें.

" मला वाटतें मी काय म्हणालों याचा अर्थ तुमच्या ध्यानांत आलाच नाहीं. बरें तर आतां मी तुम्हाला दुसऱ्या रीतीनें सांगण्याचा प्रयत्न करतों.

मनुष्याला स्वभावतःच आपल्या वंशाची वृद्धि व्हावी ही एक उत्कट इच्छा असते. निपुत्रिक लोक पुत्रप्राप्तीकरतां किती नवस करीत असतात हें आपण पहातोंच. निपुत्रिकांची गोष्ट जरी सोडून दिली तरी बहुतेक लोक संततीची इच्छा करतात ही गोष्ट खरी आहे. अगदीं रस्त्यावर बसणाऱ्या आंधळ्या भिकाऱ्याच्या जवळ सुद्धां आपण एखादेवेळेस पोरांचें लटांबर पहातोंच कीं नाहीं ? अशा पंगु आणि सर्वस्वी लोकांच्या दानबुद्धीवर विसंबून रहाणाऱ्या दुर्दैवी

जिवाला सुद्धां मुलें पाहिजे असतात. भिकारी असतांना मनाची जर ही प्रवृत्ति, तर मग खायला प्यायला भरपूर व थोडासा पैसाही जवळ आहे अशा परिस्थितींत मनुष्याला जास्त मुलें असावींत असें वाटणें अगदीं सहाजीक आहे. तात्पर्य काय कीं, संपत्ति देशांत असली कीं लोकसंख्या वाढते ही गोष्ट खरी; पण मनुष्याचा एकंदर स्वभाव जर लक्षांत घेतला तर ज्या मानानें देशांतील संपत्ति वाढते त्यापेक्षां जास्त प्रमाणांत देशांतील लोकसंख्या वाढते. हा मनुष्य स्वभाव आहे आणि त्या स्वभावाला जर योग्य वळण लावलें गेलें नाहीं तर प्रत्येक देशांत, **लोकसंख्येची वाढ त्या देशांतील संपत्तीच्या वाढीच्या प्रमाणापेक्षां जास्त झपाट्यानें होत जाईल यांत शंका नाहीं.**

मालथस हें नांव कधीं ऐकलें आहे का तुम्ही बाबूराव" अप्पासाहेब म्हणाले.

"छे बुवा" मी उत्तर दिलें. "हा मालथस कोण आणि लोकसंख्येसंबंधानें आपण बोलत असतांना तुम्हांला तो मध्येंच कसा आठवला?"

"मालथस हा एक विख्यात ग्रंथकार होऊन गेला बाबूराव. यानें इ. स. १८०३ सालीं लोकसंख्येच्या वाढीचीं तत्त्वें या विषयावर एक निबंध लिहिला. त्या निबंधाचें नांव Essay on the Principles of Population असें आहे.

लोकसंख्येच्या वाढीसंबंधानें मालथसनें पुष्कळ विचार केला होता, आणि शेवटीं **मालथसनें एक सिद्धांत ठरवला. तो हा कीं, ज्या प्रमाणांत देशांत संपत्तीची वाढ होते त्यापेक्षां जास्त प्रमाणांत देशांत लोकसंख्येची वाढ होते.** आणि लोकसंख्येची वाढ देशाला कितीही श्रेयस्कर असली तरी ती ज्या मानानें

देशांतली संपत्ति वाढेल त्या प्रमाणांतच जर झाली, तरच ती श्रेयस्कर होईल; तेव्हां लोकांनीं मनोनिग्रह करून लोकसंख्या विनाकारण जास्त वाढणार नाहीं अशा संबंधानें काळजी घेतली पाहिजे. तुम्हाला कसें काय वाटतें मालथसचें हें मत बाबुराव ? अरे वा ! तुम्ही तर हंसताहांत ! मालथसचें म्हणणें तुम्हाला मूर्खपणाचें वाटतें कीं काय ?

आणि खरोखरच मला हसावयाला येत होतें. काय चमत्कारिक कल्पना मालथसची. " कांहीं म्हणा आप्पासाहेब " मी म्हणालों "मला तुमच्या मालथसचें म्हणणें पटत नाहीं. मुलें होणें न होणें ही कोणाच्या हातची गोष्ट आहे कीं काय ! ईश्वरी देणगी ती ! ज्यानें त्यानें आपल्या नशीबानें घ्यावयाची. एखाद्याच्या घरीं नको नको म्हणत असतांना दरवर्षीं पाळणा हालतो; तर दुसऱ्याला नवससायास करूनसुद्धां मूल होत नाहीं. आणि असें पहा आप्पासाहेब लोकांनीं प्रजोत्पत्ति नियमीत करायची असें एकदां तुम्ही म्हणूं लागलांत कीं देशांत व्यसनांनीं धूमाकूळ सुरू केलाच म्हणून समजा. तुमच्या मालथसच्या म्हणण्याप्रमाणें लोकसंख्या वाढणें हें एक वाईट चिन्हच समजायचें. पण तुम्हीच कांहीं वेळांपूर्वी म्हणालांत कीं लोकसंख्या वाढणें हें सुबत्तेचें लक्षण आहे. आतां तुम्हीच सांगा मला कीं तुमच्या मालथसचें म्हणणें खरें कीं तुमचें म्हणणें खरें ?"

"व्हो बाबूराव ! तुम्ही तर माझी अगदीं कसून उलट तपासणी सुरू केली आहे ! एकातर; माझेंही म्हणणें खरें आहे व मालथसचेंही म्हणणें खरें आहे. लोकसंख्या वाढणें हें सुबत्तेचें लक्षण आहे हें खरें आहे. लोकसंख्या वाढली पाहिजे पण ज्या प्रमाणांत देशांतली संपत्ति वाढते, त्याच प्रमाणांत देशांतली लोकसंख्या वाढली पाहिजे. मनुष्याचा स्वभाव जर आपण पाहिला तर लोकसंख्येची वाढ नेहमीं

प्रमाणाबाहेर होते. मालथसचें म्हणणें असें आहे कीं, अशी प्रमाणाबाहेर लोकसंख्येची वाढ होऊं नये म्हणून लोकांनीं शीलवान् व निग्रही झालें पाहिजे.

तुमचा जसा मालथससंबंधीं गैरसमज आज झाला आहे तसाच गैरसमज मालथसचे समकालीन लोकांचा झाला होता. मालथसला लोकसंख्येचें नियमन पाहिजे; पण तें नियमन पापी उपायांनीं समाजानें करावें असें मालथसचें मत नाहीं. देशांत पापाची प्रवृत्तीच कमी व्हावी म्हणून मालथसला लोकसंख्येचें नियमन पाहिजे.

ज्या देशांत संपत्तीची वाढ व लोकसंख्येची वाढ सारख्या प्रमाणांत होत असते त्या देशांतील लोकांत गुन्ह्यांची प्रवृत्ति कमी होते. अहो ! घरींच जर खावयाला प्यावयाला पुष्कळ असलें तर पुन्हां चोरी करायची कोणाला इच्छा होईल का ? आतां तरीं मालथस संबंधीं तुमचा गैरसमज दूर झाला का ? ''

मलाही मालथसचें म्हणणें पटूं लागलें होतें व मी तसें एकदम कबूल केलें.

मालथसच्या वेळीं इग्लंदमध्यें Poor Laws नांवाचे कायदे पास केले होते. त्या कायद्याप्रमाणें गरीब लोकांचीं मुलें पोसण्याचा भार सरकार आपले अंगावर घेई. मालथसचें म्हणणें असें कीं, ही सरकारची चूक आहे. मुलें सरकार पोसतें ही खात्री असल्यानें दरिद्री लोक खुशालचेंडूप्रमाणें रहातात व त्यांचीं बेकार मुलें पोसण्याचा भार विनाकारण उद्योगी लोकांचेवर पडतो. मालथसच्या मताप्रमाणें प्रत्येक बापानें शक्यतोंवर आपलीं मुलें पोसावयाची जबाबदारी आपल्या अंगावर घेतली पाहिजे. असें झालें कीं लोकसंख्येची जी वाढ होईल ती देशाला जरूर तेवढीच होईल.

'अरे हें काय! अकरा वाजले कीं; बोलत बसलों कीं वेळ कसा जातो हें समजत नाहीं. हं मग बाबूराव आपण आज काय शिकलों हें ध्यानांत आहे ना तुमच्या ? आतां आजचा विषय पुरे असें मला वाटतें बाबूराव. पण आजचें मालथसचें भाष्य विसरायचें नाहीं बरें का?"

"छे छे" मी म्हणालों "माझ्या तें चांगलें ध्यानांत राहील. बरें आहे नमस्कार आप्पासाहेब".

"नमस्कार."

## प्रकरण नववें.

# गणबाची हकीकत.

संपत्तीच्या वाढीला वाढत्या लोकसंख्येची जोड कशी जरूर असते हें मला काल खरोखर चांगलें समजलें. मजूरवर्ग कार्यक्षम असल्याखेरीज देशांतील संपत्तीची वाढ नीटशी होत नाहीं, हेंही माझ्या लक्षांत आलें. मजूरवर्ग कार्यक्षम असावा हें खरें; पण तो कार्यक्षम किंवा काम करण्यास योग्य असा कसा होईल? मजूर-वर्गाची कार्यक्षमता मुख्यतः तीन गोष्टींचेवर अवलंबून असते. पहिली गोष्ट ही कीं, मजूरवर्गाला पुरेसें अन्न, जरूरी पुरतें वस्त्र व कामा-पुरती विश्रांति मिळाली पाहिजे. मजूर म्हणजे कांहीं यंत्र नव्हे; आणि यंत्रें सुद्धां तेल न मिळालें तर काम करण्याचें नाकारतात हें आपण नेहमीं पहातों. मजूर जर उल्हासीत असला, कामाकडे त्याचें नीट लक्ष असलें, कामांत त्याला जर गोडी वाटत असली तरच त्याचे हातून काम चांगलें होऊं शकेल. आणि चांगलें काम कर-णारा एक मजूर अंगचुकारु दोन मजूरांपेक्षां जास्त चांगल्या रीतीनें काम करतो हें आपण नेहमीं पहातोंच.

दुसरी गोष्ट म्हणजे सशक्त व कामकरी मजूर वर्गाची संख्या वाढली पाहिजे. वाढती लोकसंख्या हें सुबत्तेचें लक्षण आहे. कारण खावयाची प्यावयाची चंगळ असली कीं मनुष्य स्वाभाविकतः निष्का-ळजी रहातो. आणि मनाची अशा तऱ्हेची बेफिकीरीची रंगेलवृत्ति मनुष्याला आपल्या वंशाची वाढ व्हावी असें वाटायला लावते.

**लोकसंख्या वाढावी. पण ती वाढत्या संपत्तीच्या प्रमाणांत**

वाढावी. त्याकरतां शहाण्या व समजदार लोकांनीं संततीचें नियमन करणें जरूर आहे. लोकांनीं तसें न केल्यास परमेश्वर दुष्काळ रोगराई असल्या सैतानांच्या सहाय्यानें तें काम करून घेईल. हा मालथमचा सिद्धांत दिसायला जरी चमत्कारिक दिसला, तरी त्यांत फार तथ्य आहे हें आप्पासाहेबांच्या सांगण्यावरून माझ्या चांगलें ध्यानांत आलें.

सरते शेवटीं मजूराला साधारण शिक्षण, व एखादा विशिष्ट धंदा अंगिकारावयाचा असला तर त्यांतील विशिष्ट शिक्षण मिळणें जरूर आहे. हेंही माझ्या ध्यानांत आलें. " सांग पाटला काय लिहूं " अशा तऱ्हेच्या धोंडबापेक्षां गणबा चांगलें काम करतो, कारण त्याला साधारण शिक्षण—म्हणजे काम करतांना एकंदरीत कसें वागायचें याची सर्वसाधारण माहिती आहे. पण गणबापेक्षां विठू गवंडी जास्त पैसे मिळवितो याचें कारण विठूला साधारण शिक्षण तर आहेच, पण त्याला गवंड्याचा धंदा चागला येत असल्यामुळें लोक गणबापेक्षां जास्त मजूरी देऊन त्याला कामाला बोलावितात.

वरील मुद्दे माझ्या चांगले ध्यानांत राहिले आहेत यांत नवल नाहीं. आमच्या आप्पासाहेबांची सांगण्याची धाटणीच मुळीं आहे तशी. पण आज आप्पासाहेबांनीं गणबाला कशाला आमच्या बैठकींत बोलाविले आहे हें कांहीं माझ्या ध्यानांत येईना.

नेहमींप्रमाणें मी सकाळीं आप्पासाहेबांचेकडे गेलों तों आप्पासाहेब माझीच वाट पहात आराम खुर्चीवर पडले होते. समोरच्या खुर्चीवर गणबा बसला होता.

" यावें ? बाबूराव ! आज उशीरसा केलांत ! पण तें जाऊं द्या.

दररोजच्या दररोज तुम्हाला माझ्या टकळीचा कंटाळा आला असेल; तेंव्हां आजचें लेक्चर आपला गणबाच देईल. "

" माझी थट्टा का करता आहांत तुम्ही आप्पासाहेब " मी म्हणालो. "गणबाला या विषयांत काय समजणार आहे? अर्थशास्त्र जरी कितीही सोपें असलें तरी तें गणबापर्यंत अजून खास पोंचलें नाहीं. "

" सध्यां भलताच वाद नको बाबूराव. गणबा काय म्हणतो तें तुम्ही ऐकून तर घ्या आणि मग त्यासंबधाचें तुमचें मत मागाहून बनवा. अगोदरच मत बनविण्यांत तुमची थ.डीशी चूकच होते आहे.

कायरे गणबा तुझे वडील वारल्यावर कांहीं दिवस तूं मुंबईला कां गेला होतास रे? आणि तेथून परत यावयाला कारणारें काय झालें? आप्पासाहेब पुढें म्हणाले.

गणबा काय म्हणतो इकडे मीही लक्ष देऊं लागलों कारण आप्पासाहेब ज्या अर्थी मला गणबाचे हकीगतीकडे लक्ष द्यायला सांगत आहेत त्या अर्थी त्यांत कांहीं तरी अर्थ असला पाहिजे ही माझी पक्की खात्री होती.

" खरें म्हटलें असतां आप्पासाहेब आम्हीं मुळीं खरे वऱ्हाडांतले नव्हेच. " गणबानें सुरवात केली " माझे आजोबा झाडींत रहात असत. पण झाडींत राहून पोट मुळींच भरेना. कुटुंब मोठें होत चाललें. आतां करायचें काय असा प्रश्न माझे आजोबाचे पुढें येऊन पडला. झाडी सोडणें खरोखरच आजोबांच्या जिवावर येत होतें. सगळें नातगोत झाडींतच. लांबवर जायला घरांतलीं सगळीं माणसें नाखूष. पण आप्पासाहेब पोटाची खाई भरण्याकरितां माझे आजोबा,

आणि एक भाऊ व माझे वडील इतके लोक जिवाचा धडा करून वऱ्हाडांत आले.

माझ्या आजोबांच्या सारखीच हलाखीची स्थिति आणखी कित्ती-तरी लोकांची होती आप्पासाहेब; पण आम्हां खेडवळ लोकांना घर सोडून जाणें म्हणजे अगदीं प्राणसंकट वाटतें. माझ्या आजोबांचे एक दोस्त सदोबा नांवाचे होते. आजोबांनीं त्यांना पुष्कळ आग्रह केला कीं, माझ्याबरोबर वऱ्हाडांत चल म्हणून, पण सदोबाच्यानें तें झालें नाहीं आणि आज आप्पासाहेब सदोबाचें कुटुंब झाडींत धुळीला मिळालें आहे.

आमच्या आजोबांच्या वेळेस आफ्रिकेंत जायची हुल्लड उठली होती. आफ्रिकेंत त्यावेळेस पुष्कळ पैसा मिळत होता असें म्हणतात; पण आमचे आजोबा जरी झाडींतून वऱ्हाडांत यायला तयार झाले तरी आफ्रिकेंत जायला मुळींच तयार नव्हते. वऱ्हाड जरी झालें कीं नाहीं आप्पासाहेब तरी झाडीपसून पायांनीं ८।१० दिवसांचा रस्ता. पण आफ्रिका कुठल्याकुठें! मनुष्य आजारी पडला तर तोंडांत पाणी घालायला आपल्या जातीचा मनुष्यसुद्धां मिळायचा नाहीं तेथें आफ्रिकेंत: नाहींतरी पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही जायचा जिवाचा धडा आप्पासाहेब फक्त साहेब लोकांनीच करावा. आपल्या घरकोंबड्या लोकांचें तें काम नाहीं.

माझे आजोबा झाडींतून इकडे आले खरे पण त्यांचे जातभाई सारे तिकडे राहिले. त्यामुळें त्यांना कित्येक दिवस चैन म्हणून पडत नसे. आपली जातगोत सोडून परदेशांत जाणें कठीणच एकंदरींत आप्पासाहेब. झाडींतून इकडे यायला आणखी एक अडचण माझे आजोबांचे रस्त्यांत होती. झाडींतली जमीन वेगळी, येथली वेगळी. झाडींतल्या जमीनीला केव्हां काय पाहिजे याची पक्की माहीति माझे

आजोबांना होती. पण वऱ्हाडांत जायचें ! तेथली जमीन कशी काय आहे कोण जाणे ! आपल्याला तेथल्या एकंदर जमिनीची माहिती केव्हां मिळेल वगैरे कित्येक अडचणी माझे आजोबांना वाटत होत्या; शेवटीं त्यांनीं इकडे येण्याचा हिय्या केला ही गोष्ट निराळी

माझे आजोबा इकडे निव्वळ पोटाकरितां आले होते. पण तुम्हाला माझ्या शेजारचा हिरामण माहीत आहे ना ? त्याचे आजोबा जे वऱ्हाडांत आले ते कांहीं निव्वळ पोटाकरितां आले नव्हते. ते कुठें चुकून दुसऱ्या जातीच्या माणसाच्या घरीं जेवले. ही गोष्ट बाहेर पडली तेव्हां जातगंगेनें त्यांना जातीबाहेर टाकलें, व दारू मागितली. हिरामणचे आजोबा मोठे खंबीर. जातगंगेला दारू देणें त्यांनीं नाकारलें आणि आपलें बिऱ्हाडबाजलें उचलून ते वऱ्हाडामध्यें यायला निघाले. मोठा खंबीर म्हातारा बरें तो आप्पासाहेब! परमेश्वरानें त्यांना वऱ्हाडांत बरकत दिली.आणि आज हिरामण आठ जोड्यांचे शेतीचा मालक आहे.

झाडींतून माझे आजोबा निघाले खरे, पण जायचें कुठें हें लवकर ठरेना. शेवटीं ते या जिल्हांत आले. वऱ्हाडची जमीन चांगली आणि रहाणी स्वस्त म्हणून बाहेरचे किती तरी लोक येथें रहायला येतात आणि खरें म्हटलें तर हे बाबूरावही असेच आमच्यासारखे बाहेरून आलेले आहेत. आम्ही पोटाकरतां येथें आलों तसेच बाबूरावही आले."

आप्पासाहेब हांसले;मीही हांसलों."गणबा कांहीं मूर्ख मनुष्य दिसत नाहीं," मी मनाशींच म्हटलें.

"माझे आजोबांचे दिवसांत अप्पासाहेब झाडींतून वऱ्हाडांत यायचें म्हणजे कमीत कमी दहाबारा दिवस लागत. पण आतां काय चोहोंकडे आगीनगाडी धावते आहे. आणि म्हणून माझे वडील वारल्या-

वर मी चटकन् मुंबईला गिरणींत काम करायला गेलों. काय गम्मत आहे आप्पासाहेब ! अहो आज संध्याकाळीं बडनेरला गाडींत बसलें कीं नाहीं, कीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपण आपले मुंबईत या आगगाडीनें बघा कुठेंही जायचें कांहीं वाटत नाहीं. कडोस्रीला पैसा असला कीं मग कोणचेंच गांव लांब नाहीं.

आणि कोणी कांहींही म्हटलें कीं नाहीं अप्पासाहेब तरी आतां दिवस सपाटून बदलत चालले आहेत. लोकही पुष्कळ शहाणे होत चालले आहेत. मुंबईला मी ज्या गिरणींत काम करीत होतों त्या गिरणींत कुठून कुठून लोक मजूरीकरतां आले होते. एक म्हण आहे आपल्यांत आप्पासाहेब "अन्नासाठीं दाही दिशा। आम्हां फिरवीशी जगदीशा ॥"

"अरे वा हा गणबा तर विद्वान् झाला कीं" आप्पासाहेब म्हणाले.

"मी कीं नाहीं आप्पासाहेब मुंबईला कांहीं दिवस रात्रीच्या शाळेंत शिकलों आहें.

मी खरा धंद्यानें शेतकरी अप्पासाहेब. मुंबईला जाऊन मला कापडाच्या गिरणींत काम करायचा प्रसंग आला. आपला एक धंदा सोडायचा व दुसरा धंदा नवा शिकायचा हें काम फार कठीण आप्पा साहेब. कित्येक दिवस मुंबईत मला मुळीं चैनच पडेना. मनाला वाटत असे कीं, आपला शेतीचा नांगर बरा; हा गिरणीचा धडधडाट नको. पण मुंबईला मजूरी चांगली मिळत होती म्हणून राहिलों तेथें कांहीं दिवस झालें. पुढें एकदां मुंबईला कापडाच्या गिरण्यांत मोठा संप झाला, आणि त्यावेळीं मी जो परत वऱ्हाडांत आलों तो येथेंच राहिलों. दादासाहेब आप्पासाहेब यांच्या सारख्यांच्या आश्रयानें येथें पोटाला भाकरी मिळवीत आहें झालें कशीतरी. बरें

आप्पासाहेब नऊ वाजले नाहीं का! मला आतां कामावर गेलें पाहिजे. तुम्ही म्हणाल त्या वेळेस तुमच्या दिमतीला हजर आहेंच मी. रामराम अप्पासाहेब, रामराम बाबूराव "

" रामराम " मी व आप्पासाहेब एकदम म्हणालों.

" काय बाबूराव" अप्पासाहेब म्हणाले " गणबाच्या गोष्टीवरून तुम्हाला काय समजलें ? गणबाचा आजा झाडींतून वऱ्हाडांत मजूरी करतां आला. तो कशाकरतां, तर झाडींत पोटाला पुरेसें मिळेना म्हणून. त्याचे मनांत झाडी सोडायची नव्हती. कारण ज्या प्रदेशांत आपण राह्यलों तो प्रांत सोडणें त्याच्या जिवावर आलें होतें.

**अगदीं जरूरीच पडली म्हणजे मनुष्य घर सोडून बाहेर कामधंदा पहायला निघतो. हा सिद्धांत गणबाचे गोष्टीवरून आपण काढूं शकूं.**

आपला प्रदेश सोडायचा म्हणजे मार्गांत कितीतरी अडचणी येतात. देशांतल्या देशांत जर ही स्थिति, तर परदेशांत जायची गोष्ट बोलायलाच नको.

गणबाचा आजा साधा शेतावरचा मजूर; त्याच्या धार्मिक समजुति, त्याची घरावरची थोडीशी वेडी आंधळी भक्ति वगैरे गोष्टी चमत्कारीकच; आणि एकंदर मजूरवर्गाची तीच स्थिति असते. त्यांच्या धार्मीक समजुति जातिभेद वगैरे कित्येक गोष्टी मजूराला आपलें घर सोडूं नको म्हणून सांगत असतात.

तसेंच एका प्रांतांतील शेती दुसरे प्रांतांतील शेतीसारखीच नसते. त्यामुळें एका प्रांतांतील मजूर दुसरे प्रांतांत जाण्यापूर्वी विचारच करतो.

पोटाकरतां स्वतःचा प्रांत सोडणारे लोक असतात. **तसेंच लोकांच्या त्रासाला कंटाळूनही परदेशीं जाणारे लोक आप-**

णाला पहायला सांपडतात. हिरामणच्या आजाचें उदाहरण गणबानें आपल्याला दिलेंच आहे.

एकंदरीनें आतां तुम्हीच सांगा बाबूराव, मजूर आपला प्रांत सोडून बाहेर जातो तें कां?"

" पोटाला मिळावें म्हणून; आणि परदेशीं जास्त मजूरी मिळणें शक्य दिसतें म्हणून " मी म्हणालों.

"स्वभावत: मनुष्याला घर सोडावेंसें वाटत नाहीं " आप्पासाहेब म्हणाले " पण नाइलाजच झाला म्हणजे त्याला तसें केल्यावाचून गत्यंतर रहात नाहीं.

गणबाच्या आजाला झाडींतून वऱ्हाडांत यावयाला जो त्रास पडला तितका त्रास गणबाला वऱ्हाडांतून मुंबईला जायला कांहीं पडला नाहीं. त्याचें कारण काय? पहिलें कारण म्हणजे परदेशासंबंधीं लोकांचें अज्ञान दिवसेंदिवस दूर होत आहे व त्यामुळें परदेशचा पूर्वीं जो बाऊ वाटत असे तो वाटेनासा झाला आहे. व दुसरें कारण म्हटलें म्हणजे आगगाडीनें आतां सारें हिंदुस्थान अगदीं जवळ केलें आहे. गणबाच्या आजाला झाडींत परत जावयाला १०-१२ दिवस लागत असत; गणबा आज मुंबईहून १७-१८ तासांत परत वऱ्हाडांत येऊं शकतो.

मनुष्य जरी परदेशांत जायला तयार असला तरी एक धंदा सोडून दुसऱ्या धंद्यांत पडणें मनुष्याला खरोखरीच अती कठीण जातें. गणबा खरें म्हटलें असतां शेतीचा मजूर. गिरणींत काम करावयाला तो कंटाळला यांत नवल तें कसलें?

बाबूराव आज आपण मजूर वर्गाच्या धंद्यांकरतां देश सोडण्याच्या मार्गांत कशा अडचणी येतात, व त्या कशा दूर होतील याचा विचार केला. मजूर वर्गाचा धंद्याकरतां परदेशीं जाण्याचा जो गुण

किंवा धर्म, त्याला इंग्रजींत Mobility of labour म्हणतात. आपण त्याला **गमनयोग्यता** म्हणूंया. आपला शब्द आहे वेडावाकडाच. पण आपल्याला शब्दांशीं काय करायचें आहे. आपल्याला त्याचा अर्थ समजल्याशीं कारण.

आज आपण येथेंच थांबू या बाबूराव. उद्यां आपण बॅरिस्टर भालचंद्र यांचे धंद्यासंबंधानें कांहीं तरी बोलूं. बरें आहे नमस्कार.

मी आप्पासाहेबांचा निरोप घेऊन घरीं यायला निघालों.

---

## प्रकरण १० वें.

# बॅरिस्टर भालचंद्र यांची मुलाखत.

अर्थशास्त्रावरील आमच्या संभाषणाला आतां कोठें रंग यायला लागला होता. कामकरी मजूर धार्मीक समजुतीमुळें, किंवा गैरसमजुतीमुळें म्हटलें तर जास्त शोभेल, अज्ञानामुळें, परदेशांत काम काय पडेल याची जाणीव नसल्यामुळें, व दुसऱ्या अनेक कारणांनीं आपलें घर सोडून परदेशीं काम करायला जायला तयार नसतो. पोटाची खूपच फिकीर पडली, किंवा सामाजिक बहिष्कारासारखीच जर एखादी अडचण आली, तरच मनुष्य जरूर म्हणून परदेशांत जातो. ह्या गोष्टी गणब्याच्या आजाचे हकीकतीवरून माझ्या ध्यानांत आल्या. पूर्वीइतकें गाढ अज्ञान आतां राहिलें नाहीं; व आगगाड्या, आगबोटी इत्यादि साधनांच्या योगानें दोन देशांतील अंतर पुष्कळ कमी झालें असल्यामुळें, निदान तसें वाटत असल्यामुळें, पूर्वीपेक्षां आतां जास्त खुषीनें मजूर परदेशीं जावयाला तयार असतो; हें गणबा मुंबईस कापडाचे गिरणींत काम करायला गेला या गोष्टीवरून मला कळून चुकलें.

वरील गोष्ट मजूरासंबंधानें झाली. मजूर अंगमेहनत करून संपात्ति मिळवितो. पण जगांत बुद्धीच्या जोरावर पैसा मिळविणारे हजारों लाखों लोक आहेत त्यांनांही वरील नियमच लागू आहेत कीं काय हा प्रश्न माझ्यापुढें सारखा उभा रहात होता. आप्पासाहेब, बॅरिस्टर भालचंद्र यांचे संबंधानें मला आज कांहीं सांगणार होते. आणि तें “ कांहींतरी ” काय असावें याचा मी विचार करीत होतों.

" या बाबूराव " मी गेल्याबरोबर आप्पासाहेब मला म्हणाले "काल तुम्हाला गणबाची गोष्ट समजली. आज तुम्हाला गणबापेक्षां एक खूप मोठे गृहस्थ भेटणार आहेत. आपल्या उमरावतीचे बॅरिस्टर भालचंद्र तुम्हाला माहीत असतीलच. कांहीं खाजगी कामाकरतां ते येथें आले आहेत. आपले रावसाहेब आठवले आहेत ना? त्यांचे घरीं ते उतरले आहेत. आच मी तुम्हाला घेऊन त्यांचेकडे जायचें ठरविलें आहे. आजचें लेक्चर बॅरिस्टर साहेबांचें.

मी व आप्पासाहेब आठवल्यांचेकडे गेलों. वर्दी माडीवर पोंचल्याबरोबर आम्हाला घ्यायला स्वत: बॅरिस्टर साहेब खालीं आले. बॅरिस्टरसाहेब मला अगदीं साधे दिसले. त्यांच्या चेहऱ्यावर विद्वत्तेची झांक दिसत होती, व एकंदर रहाणीवरून त्यांची प्रॅक्टिस चांगली चालत असली पाहिजे असें मानायला खूप जागा होती.

" या आप्पासाहेब, Good morning बॅरिस्टरसाहेब म्हणाले. माझी व बॅरिस्टर मजकुरांची आप्पासाहेबांनीं ओळख करून दिली; व नंतर आमच्या भाषणाला सुरवात झाली.

" तसें जर पाहूं गेलो तर आप्पासाहेब तुमच्या गणबामध्यें व माझ्यामध्यें काय फरक आहे? गणबा मेहनत करून ८ आणे रोज मिळवितो; आणि मलाही मेहनत करूनच पैसे मिळतात. पण गणबाला मजुर म्हणतात, आणि मला म्हणत नाहींत येवढाच काय तो फरक. आपल्या सोयीकरतां आपण पाहिजे तर असें म्हणूं कीं अंग मेहनतीनें काम करणाऱ्या माणसांना मजुर म्हणायचें व बुद्धीनें काम करणाऱ्या माणसांना, लोकांना " धंदेवाले गृहस्थ " किंवा " श्रेष्ठी " म्हणायचें.

जगांत आप्पासाहेब अंगमेहनतीनें द्रव्यार्जन करणारे लोकच फार आहेत. बुद्धीच्या जोरावर पैसा मिळविणारे लोक फारच थोडे.

बुद्धीच्या जोरावर पैसा मिळविणाऱ्या लोकांना आपल्याला Intellectual classes असें म्हणतां येईल. ह्या बुद्धिमान् लोकांत आपल्याला सरकारी नोकर, वकील, डॉक्टर, एंजिनियर, सावकार, व्यापारी, लष्करी अधिकारी इत्यादि लोकांचा समावेश करतां येईल.

एकंदरींत जर पाहूं गेलें तर ज्या देशांत शिक्षणविषयक प्रगति जास्त आहे तेथील लोकांत बुद्धीवर भिस्त ठेवणाऱ्या लोकांचें अंग मेहनतीनें मजुरी मिळविणाऱ्या लोकांशीं असणारें प्रमाण दुसऱ्या देशांतील लोकांपेक्षां बरेंच जास्त आढळतें. आणि मजूरीसंबंधानें येथल्या येथेंच पहाना ! तुमच्या धोंडबापेक्षां गणबा आपल्या बुद्धीचा उपयोग खरोखरीच जास्त करतो आणि म्हणून तो जास्त पैसे मिळवितो.

मजूर परदेशांत अगदीं जरूरी पडल्याशिवाय जात नाहीं, तसें या वरच्या दर्जाच्या लोकांसंबंधानें नाहीं. या लोकांना शिक्षण मिळलेलें असतें. धार्मीक गैरसमजुती दूर झालेल्या असतात. पैसा जास्त कोठें मिळेल याची त्यांना माहिती असते आणि त्याप्रमाणें हे लोक जगाच्या पाठीवर कोठेंही जावयाला तयार असतात. आपल्यांतले कितीतरी लोक सध्यां इंग्लंदमध्यें उद्योगधंदा करण्याकरतां कायमचे जाऊन राहिले आहेत. आणि इंग्लिश लोकांच्यासंबंधानें जर म्हटलें तर जगांतला असा एकही देश नाहीं कीं, ज्यामध्यें ह्या बुवांनीं आपलें चंबुगवाळें टाकलें नाहीं.

इतकें जरी असलें आप्पासाहेब, तरी आपल्या घराचा मोह कांहीं विलक्षणच असतो. वरील मोह मजूर वर्गाला अति असतो व बुद्धिमान् वर्गाला कमी असतो येवढाच काय तो फरक.

आपल्या जिल्ह्याच्या ठिकाणीं प्रॅक्टिस चालणें फार कठीण आहे, हें माहीत असतांना देखील त्या ठिकाणीं आपलें घर आहे म्हणूनच तेथें रहाणें पसंत करणारे वकील आपल्याला डझनानें मोजतां येतील.

जसा प्रकार वकीलीच्या धंद्याचा तसाच प्रकार इतर पांढरपेशा धंद्यांचा आहे. ज्या गांवीं आपलें घरदार आहे त्याच गांवीं एकादें लहानसें दुकान खोलून कार्यक्रमणा करणारे आपल्याला कितीतरी लोक भेटतील.

साध्या मजूरापेक्षां पांढरपेशा वर्गांतले लोक आपल्या अकलेनें जास्त पैसे मिळवूं शकतात. पण आपल्या हिंदुस्थानांत झाली आहे काय मजा, कीं पांढरपेशे धंदेच मुळीं थोडे आहेत. आपल्या वऱ्हाडांतल्या सुखवस्तु घराण्यांतल्या होतकरू मुलांची महत्त्वाकांक्षा डॉक्टर, वकील, श्रीमंत असला तर बॅरिस्टर, व श्रीमंत असून बुद्धिमान असला तर I. C. S. होण्याची असते. त्यामुळें थोड्याच धंद्यांत जास्त बुद्धीमान लोक पडतात. याचा परिणाम असा होतो कीं, देशांतल्या बऱ्याच बुद्धीमान लोकांची व्यर्थ कुचंबणा होत असते. आपल्या देशांतील बुद्धीमान लोक आतां व्यापाराकडे, व कारखान्याकडे लक्ष द्यावयाला लागतील तर देशाला व त्यांनां सुद्धां पुष्कळच फायदा होऊं शकेल,

पांढरपेशा वर्गांतील लोकांना धंदे बदलण्याचे मार्गांत एक मोठी अडचण असते. एखादा विवक्षित धंदा शिकलेल्या माणसाला आपला धंदा बदलणें अगदीं अशक्य होतें. आपण आतां अशी कल्पना करू कीं एखादे गृहस्थ एम्. बी. बी. एस. झाले आहेत. आणि त्यांचा डॉक्टरीचा धंदा तर चालत नाहीं. त्यांनीं काय करायचें ? डॉक्टरीचा धंदा शिकण्याकरतां त्यांनी वयाचीं उत्तमोत्तम पांच सहा वर्षें खर्च केलेलीं असतात. पुष्कळसा पैसाही खर्च केलेला असतो. तेव्हां त्यांना धंद्यांत बदल करणें अशक्य होतें. शेतीवर काम करणारा मजूर थोड्याच दिवसांत गिरणींत उत्तम काम करूं लागतो. पण M. B. B. S. झालेले गृहस्थ वकीलीचा अभ्यास संपविल्या-

शिवाय कांहीं वकील होऊं शकत नाहींत. पांढरपेशा धंद्यांत ही एक मोठी गोम असल्यामुळें आपल्या मुलानें पुढें कोणचा धंदा करावयाचा हें ठरविण्याची फार मोठी जबाबदारी आईबापांचेवर असते.

आप्पासाहेब सध्यां काळ फार झपाट्यानें बदलत आहे. नवीन नवीन शास्त्रीय शोध लागत आहेत आपण कधीं ऐकल्या नाहींत अशा गोष्टी यंत्रानें साध्य होत आहेत. नुसत्या अंगमेहनतीपेक्षां आतां कामकरी मनुष्याला कांहींतरी जास्त पाहिजे आहे. आणि तें " कांहींतरी " जास्त, म्हणजे " बुद्धीचा उपयोग " होय. शरीरबल व बुद्धिबल या दोहोंचा मिलाफ जर कामकरी मनुष्य करूं शकेल तर या शर्यतींत त्याचा निभाव लागेल. आणि म्हणून मजूर वर्गाला साधारण शिक्षण व त्याच्या धंद्याचें विवक्षित शिक्षण देणें अत्यंत जरूर आहे.

मजूर वर्गाच्या शिक्षणाचा प्रश्न तुम्हाला वाटतो त्यापेक्षां फार महत्वाचा आहे बाबूराव, खरें म्हटलें असतां आपल्याकडे या विषयाचा अजून कोणीं विचारच केलेला नाहीं. मजूर म्हणजे समाजाचा घटकावयव आहे ही गोष्ट आपणाला जवळ जवळ माहीतच नाहीं असेंच म्हणाना तुम्ही! तिकडे विलायतेंत मजूर वर्गाला आपले अधिकार समजायला लागले आहेत. मजूरांचे मोठमोठाले संघ तिकडे आहेत. राज्यकारभारात मजूर लोकांचें प्रस्थ आताशें वाढूं लागलें आहे. आणि आतां तर इंग्लंदमध्यें आपल्याला मजूरपक्षाचें प्रधानमंडळ पहावयाला गेल्या वर्षींच मिळालें होतें. पण जाऊं द्या. आजचा आपला विषय तो नव्हे. आज आपल्याला येवढीच गोष्ट ध्यानांत ठेवावयाची आहे कीं, देशांतील संपत्तीची वाढ करावयाची जर असली तर प्रत्येक कामकरी मजूराला सामान्य शिक्षण व त्याच्या धंद्याचें विशिष्ट शिक्षण पाहिजेच."

"माफ करा बॅरिस्टरसाहेब, मी एक शंका आपल्याला विचारतों" मी म्हटलें.

" विचारा कीं, मला सुद्धां कोर्टांत असें मध्येंच अडवून घ्यायची संवय आहे " बॅरिस्टर म्हणाले

" तुम्ही म्हणालांत कीं देशांतील संपत्ति वाढण्याकरतां मजूराला शिक्षण देणें अवश्य आहे पण शिक्षणाला पैसा नाहीं का लागणार? आणि हा पैसा खर्च केला तरी आधीं पैसा खर्च करावयाचा व मग पुढील फायद्याची आशा करीत बसायाचें असा हा आंत बट्याचा व्यापार नाहीं का होणार ? "

" तुमच्या घरीं शेती आहे बाबूराव. तुम्ही शेतीची मशागत करतां, बी पेरतां तें कां ? तुम्हाला उद्यां उत्पन्न व्हावें म्हणून ना ? पण पुढल्या वर्षीं पीक येईलच ही खात्री तुम्हाला असते का ? अर्थात् नाहीं. प्रत्येक गोष्टींत थोडा बहुत धोका (risk) असायचाच. तसेंच मजूरवर्गाला शिक्षण देण्यासंबंधानें.

मजूरवर्गाच्या शिक्षणाला पैसा खर्च होईल ही गोष्ट कबूल आहे. आणि सध्यां इंग्लंडमध्यें शिक्षणाचा भार होतां होईल तों सरकारनें सोसावा असें तेथील लोकमत झालें आहे. मी तर म्हणतों शिक्षणाचा भार सरकारबरोबर मजूरांच्या मालकांनींही सोसायला तयार असलें पाहिज. तुमच्या धोंडबापेक्षां गणबा जास्त चांगलें काम करतो. गणबासारखे सर्व मजूर कां नाहींत ? याचें कारण गणबाइतकी कामाची माहिती त्यांना नाहीं. एक चांगला व आपल्या धंद्यांत दर्दी असलेला मनुष्य दोन तीन आडमुठ्या लोकाचेपेक्षां जास्त चांगलें काम करतोच कीं नाहीं ! मग अशा तऱ्हेचा एक दर्दी मनुष्य तयार व्हावा म्हणून त्याचे शिक्षणावर झालेला खर्च तो जास्त चांगलें काम करून भरून देईल. व कांहीं दिवसांनीं त्याची शिक्षणाची

किंमत भरुन आली कीं त्यापुढें त्यानें केलेलें काम मालकाला निव्वळ नफ्यांत पडेल.

कोणत्याही देशांत मजूरवर्ग हा संख्येनें जास्त असतो. यांत कांहीं फार बुद्धिमान लोक असण्याचा संभव असतो. समजा एक लाखांत एक बुद्धिमान मजूर निघून त्यानें कांहीं शोध लावला तरी त्या शोधानें देशाच्या संपत्तींत इतकी भर पडेल कीं, त्या पुढें लाख मजूर लोकांच्या सामान्य शिक्षणावर खर्च केलेला थोडाबहुत पैसा म्हणजे कांहींच वाटणार नाहीं.

मजूर वर्गाला साधारणतः लिहितां वाचतां आलें पाहिजे. लिहितां वाचतां येणें याचा अर्थ अआ इई येणें येवढाच नव्हे. त्या मनुष्याला एखाद्या गोष्टीकडे मन लावतां आलें पाहिजे. उच्च शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या मनुष्याला जसा बीज गणीताचा उपयोग होतो, तसाच साधारण शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या मनुष्याला लिहितां वाचतां येण्याचा उपयोग होतो.

" काय आप्पासाहेब, तुम्ही बाबूरावांना Labour ची माहिती देत होतां वाटतें. तुम्हीं काय सांगितलें होतेंत बाबूरावांना ?" बॅरिस्टरसाहेबांनीं विचारलें.

" तें तुम्ही बाबूरावानांच विचारा " आप्पासाहेब हंसत म्हणाले.

" काय हो बाबूराव " बॅरिस्टरसाहेबांनीं विचारलें.

" श्रम करणें हें संपत्युत्पादनाला अत्यंत जरूर आहे. देशांतील जितके लोक संपत्तीकरतां जास्त मेहनत करतील तितके ते श्रीमंत होतील व त्यांचा देशही श्रीमंत होईल. मजूर वर्ग हा देशांतील एकंदर संख्येचा मोठासा भाग असतो. जितकी मजूर वर्गाची काम करण्याची तडफ ( Effeciency ) जास्त, तितका तो देश जास्त संपत्तीमान होतो.

मजूर वर्गाची काम करण्याची तडफ तीन गोष्टींवर अवलंबून असते ( १ ) मजूर वर्गाची शरीरसंपत्ति, त्यांचें अन्न, रहाणी वगैरे ( २ ) काम करणाऱ्या मजूरांच्या संख्येची वाढ ( ३ ) आणि त्यांचें शिक्षण.

मजूर अज्ञानामुळें व माहिती नसल्यामुळें आपलें घर सोडून दुसरीकडे काम करायला जायला फार नाखूष असतो. पण खायलाच न मिळालें म्हणजे त्याला परदेशांत जाणें भागच पडतें. मजूर घर सोडून जायला अगदीं नाखूष असतो; तर पांढरपेशा धंद्यांतील मनुष्य त्या मानानें कमी असतो. पण मजूर जितक्या लवकर आपला धंदा बदलूं शकतो तितक्या लवकर पांढरपेशा मनुष्याला आपला धंदा बदलतां येणें शक्य नसतें.

"Bravo" बॅरिस्टरसाहेब म्हणाले "तुम्ही तर आम्हाला श्रम व मजूर वर्ग यांचे संबंधानें थोडक्यांत सर्व माहिती दिली. आतां आप्पासाहेब यांनां भांडवलासंबंधानें उद्यां कांहीं तरी सांगा."

मला वाटतें. " कीं आपण आतां उठावें हेंच सांगणार कीं नाहीं बॅरिस्टरसाहेब आपण " आप्पासाहेब हंसत म्हणाले. व बॅरिस्टरसाहेबांचा निरोप घेऊन आम्ही घरीं यायला निघालों.

## प्रकरण ११ वें.

# भांडवल.

कालपर्यंतच्या आमच्या संभाषणांत आम्हीं श्रमासंबंधानें पुष्कळशा गोष्टींचा विचार केला. संपत्ति वाढवावयाची म्हणजे मनुष्यानें त्याकरतां प्रयत्न केला पाहिजे. थोडीशी खटपट करावयाला पाहिजे. ही खटपट म्हणजेच श्रम. संपत्ती मिळविण्याकरतां मनुष्यानें स्वतः खटपट केल्याशिवाय ती त्याला एकाएकीं कांहीं मिळत नाहीं; आणि म्हणून मनुष्याच्या श्रमाला अर्थशास्त्रांत येवढें महत्व आहे.

मनुष्य श्रम करायला तयार असला तरी त्याला सृष्टीची थोडीबहुत मदत ही पाहिजेच. उद्यां मी म्हटलें कीं, मला एक घर बांधावयाचें आहे. पण घर बांधायला जागाच जर नसली तर मी घर कसें बांधूं शकेन ? बरें जागा जरी असली तरी मला विटा चुना लाकडें पाहिजेत. ह्या वस्तु मी कुठून आणणार? अर्थात् मला सृष्टीची मदत पाहिजेच. ही सृष्टिदेवता उद्योगी मनुष्याला मदत करायला नेहमीं तयार असते सृष्टीदेवतेची ( Nature ) मनुष्याला मोठी मदत जमीनीच्या रूपानें होते. जमीन आहे म्हणून जगू गवळ्याला गवताचा व्यापार करतां येतो; जमीन आहे म्हणून उत्तमराव देशमूख तिच्यातून जास्त पीक काढण्याकरतां तिच्यांत जास्त खत घालतात, व त्यांना त्यांत यश येतें. जमीन आहे म्हणून कापूस पैदा होतो, व कापूस पैदा होतो म्हणून मंचरजीशेटचे मोठाले कारखाने चालतात. सृष्टि आम्हाला नुसती जमीनीच्या रूपानेंच मदत करते असें नाहीं. समुद्र नसता, तर कित्येक लोकांचा मासे धर-

ण्याचा धंदा चालला नसता. मुख्य ध्यानांत ठेवण्याची गोष्ट येवढीच कीं, सृष्टि मनुष्याला संपात्ति मिळवून देण्याकरतां जी मदत करते, त्यांतील पुष्कळशी मदत ती जमीनीच्या रूपानें करते आणि म्हणून आप्पासाहेबांनीं दोन दिवस मला जमीनीचा संपत्युत्पादनासाठीं कसा उपयोग होतो हें सांगितलें.

संपत्तीच्या उत्पत्तीच्या वरील दोन कारणासंबंधानें आम्हीं विचार केला. आज आमचें भांडवलासंबंधानें बोलावयाचें ठरलें होतें. त्याप्रमाणें मी आप्पासाहेबांचेकडे जातांच आमच्या संभाषणाला सुरवात झाली. आज आप्पासाहेबांच्या समोर एक लहानसें मेज ठेवलें होतें. व त्यावर एक कोयता, कांहीं रुप्याचीं नाणीं, आणि एक एक कागदाचा पुडका ठेवला होता.

" काय आप्पासाहेब " आज हें कसले पदार्थसंग्रहालय येथें करण्याचा तुमचा विचार आहे ? " मी म्हणालों.

" जरा सबूर ! बाबूराव" आप्पासाहेबांनीं उत्तर दिलें. "तुमची बुवा प्रत्येक कामांत घाईच फार. या पदार्थसंग्रहालयाचा काय उपयोग आहे हें तुम्हाला लवकरच समजेल.

कांहीं दिवसांपूर्वीं मी तुम्हाला जगू गवत्यासंबंधानें गोष्ट सांगितली होती ती तुम्हाला आठवते का बाबूराव ?"

" कां नाहीं आठवणार आप्पासाहेब " मी म्हणालों " जगू गवत्याच मुळीं पैसे कर्जाऊ मागण्याकरतां दादासाहेबांचेकडे आला होता. त्यानें आपला धंदा नुसत्या कोयत्याच्या सहाय्यानें कसा सुरू केला, प्रत्येक दिवशीं मिळालेल्या मजूरींतून थोडे थोडे पैसे शिल्लक टाकून त्यानें गवत आणण्याकरतां गाडीबैल कसे विकत घेतले व आतां जगूचा गवताचा व्यापार कसा मोठ्या प्रमाणावर चालतो हें जगूनेंच नाहीं का आपल्याला सांगितलें ?"

" ठीक आहे बाबूराव " आप्पासाहेब म्हणाले " जगू गवत्याची एकंदर हकीकत तुमच्या लक्षांत आहे म्हणायची. आतां असें पहा; जगूजवळ जर खुरपें नसतें तर त्याला गवत तोडणें शक्य झालें असतें का ? नाहीं. निदान इतक्या जलदीनें खास नाहीं. तेव्हां वरील **खुरप्याचा उपयोग जगूला काम लवकर लवकर करण्याकरतां झाला.** जगूला पोटाला जितका पैसा लागे त्यापेक्षां जास्त पैसा या खुरप्यामुळें मिळवितां आला. हा जास्त आलेला पैसा जगूनें शिल्लक ठेवून बैलजोडी वगैरे ठेवली, माणसें नोकरीला ठेवली, व आपला धंदा मोठ्या प्रमाणांत सुरू केला. जगूनें जर बैलजोडी व गाडी माणसें नोकरीला ठेवलीं नसतीं तर जगूला आज जसा पैसा मिळतो आहे तसा मिळाला नसता. स्वतः गवत आणून बाजारांत विकणें येवढाच धंदा जगूला राहिला असता. बैलजोडीमुळें व गाडी माणसांच्या मदतीनें जगूला वाटेल तेवढें गवत बाजारांत आणतां येऊं लागलें. व अशा रीतीनें जगूच्या संपत्तीची वाढ होत गेली.

जगू स्वतः अंगमेहनत करीत होता ही गोष्ट खरी. पण जगूच्या संपत्तीची आज होत आहे तशी वाढ जगूच्या खुरप्यामुळें व नंतर मुद्दाम ठेवलेल्या गाडीबैलामुळें झाली हें कोणालाही नाकबूल करतां यायचें नाहीं. आतां जगूच्या संपत्तीची वाढ ही ज्या वस्तूंच्या सहाय्यानें झाली त्या वस्तूंना आपण भांडवल म्हणूं या. जगूचा खुरपा, जगूचे बैल, जगूची गाडी, जगू आपल्या नोकरांनां मजूरी करतां जो पैसा देई तो पैसा, ह्या सर्व वस्तूंच्या योगानें जगूच्या संपत्तीची वाढ होऊं शकली.

यावरून आपल्याला एक गोष्ट स्पष्टपणें दिसून येईल बाबूराव. मनुष्य अंगमेहनतीनें आपल्या संपत्तीची वाढ करूं शकतो. ही गोष्ट जरी खरी असली तरी सध्यां ज्या अवाढव्य प्रमाणांत संपत्तीची

वाढ मनुष्य करून घेत आहे ती भांडवलाशिवाय होणें शक्य नाहीं. जगूचें आपण लहानसें उदाहरण घेतलें, त्यांत आपल्याला जगूचें भांडवल गाडीबैल, नोकरांचे पगार वगैरे वस्तूंत गुंतलेलें आहे, असें दिसून आलें. पण सध्यां आपण जगाचा संसार जर पहायला लागलों तर आपल्याला असें दिसून येईल कीं, प्रत्येक धंद्याला आतां भांडवल पाहिजे. एक कापडाची गिरणी काढूं म्हटलें तर केवढालीं अवाढव्य यंत्रें आणावीं लागतात. त्या यंत्रां-करतां मोठमोठाल्या इमारती बांधाव्या लागतात. तीं यंत्रें चालविण्या-करतां हुशार असे एंजिनियर लोक नोकरीस ठेवावे लागतात. आपल्या गिरणींतल्या मजूर लोकांनीं संतुष्ट रहावें म्हणून त्यांच्याकरितां चाळी, दवाखाने अशा सारखीं साधारण सुखसोयींचीं साधनें तयार ठेवावीं लागतात. एक कापडाची गिरणी काढायची पण तिचा व्याप केवढा."

"माझी समजूत आजपर्यंत अशी होती आप्पासाहेब कीं भांड-वल म्हणजे फक्त शिल्लक ठेवलेला पैसा" मी मध्येंच म्हणालों, "पण आज तुम्ही सांगत आहांत यावरून मला आतां असें वाटूं लागलें आहे कीं भांडवल म्हणजे कांहीं फक्त पैसा नव्हे."

"अर्थात् नव्हे. **भांडवल म्हणजे ज्या वस्तूंचा उपयोग संपत्तीची उत्पत्ति व वाढ करण्याकडे होतो त्या वस्तु.** मग त्या वस्तु सोन्याचें नाणें असोत नाहींतर लोखंडी खुरपे असोत.

"तर मग आप्पासाहेब जमीन ही भांडवल होईल कां" मी विचारलें.

"नाहीं बाबूराव, जमीन भांडवल होणार नाहीं. आणि याचें कारण मी तुम्हाला आतां सांगतों. जमीन ही एक सृष्टीची देणगी आहे हें आपण पाहिलेलेंच आहे तुम्ही कितीही प्रयत्न केला तरी

जगाच्या पाठीवर आहे त्यापेक्षां जास्त जमीन तुम्हाला मिळणार नाहीं. आणि तुम्ही कितीही नको म्हटलें तरी आहे त्या जमीनीचा नाश होणार नाहीं. पण भांडवलाचें तसें नसतें. **भांडवल हें मनुष्यानें निर्माण केलेलें असतें** जमीन. ही सृष्टिदेवतेनें (Nature) निर्माण केली आहे. भांडवल मनुष्याच्या हातचें असतें. जमीन ही सृष्टिदेवतेच्या हातीं आहे. भांडवल कमीअधीक प्रमाणानें कमी अगर जास्त होऊं शकतें. जमीन आहे तेवढीच रहाते. निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ज्या चल व जड वस्तूंचा मनुष्य संपत्ति वाढविण्याकडे व ती उत्पन्न करण्याकडे उपयोग करतो त्या वस्तूंचा समावेश भांडवलांत होऊं शकतो. मूरलँड नामक लेखकानें भांडवलाची व्याख्या खालीं दिल्याप्रमाणें केली आहे. All wealth ( other than land ) which is intended to be used for the production of wealth.

आपण जर मनुष्यजातीच्या इतिहासाकडे पाहिलें बाबूराव, तर आपल्याला असें दिसून येईल कीं, या भांडवलाचा उपयोग मनुष्यजात फार प्राचीनकाळापासून करीत आहे. नुसत्या धनुष्यबाणाच्या सहाय्यानें हरणें मारून त्यावर उपजीविका करणाऱ्या पारध्याचें भांडवल म्हणजे त्याचा धनुष्यबाण होय; कारण ह्या वस्तूचा उपयोग तो मनुष्य हरण मारण्याकडे म्हणजेच संपत्ति वाढविण्याकडे करीत असे मेंढ्यांचे कळप घेऊन हिंडणाऱ्या धनगराचें भांडवल म्हणजे त्याचा कळप असे. जगू गवत्याचें भांडवल त्याचा खुरपा त्याची गाडी, बैल वगैरे गोष्टींत असतें.-उत्तमराव देशमुखांचें भांडवल त्यांच्या जोड्या, नांगर आऊतें वगैरे वस्तूंत असतें. मंचरजीशेटचें भांडवल म्हणजे त्यांची अवाढव्य कापडाची गिरणी. सारांश काय बाबुराव कीं, भांडवलाशिवाय मनुष्यप्राणी आज जितकी

संपत्ति हस्तगत करतो आहे तेवढी केव्हांही करूं शकला नसता.

आतां असें पहा बाबूराव, भांडवल पाहिजे. म्हणजे मनुष्यानें काटकसर करायला शिकलें पाहिजे. जगू गवत्यानें मिळविलेला सर्व पैसा जर खर्च केला असता तर त्याला पुढें बैल विकत घेतां आला नसता; तेव्हां मनुष्य शिल्लक ठेवण्याच्या बुद्धीनें ज्या वेळेस कांहीं संपत्ति एके बाजूला काढून ठेवील तेव्हांच त्याच्याजवळ भांडवल जमूं शकेल. मनुष्यानें अशी शिल्लक कां बाजूला ठेवावी? त्याला पुढें कांहीं जास्त फायदा झाला पाहिजे म्हणून ना? आजचें सुख गमावून उद्याच्या सुखाची वाट पहात मनुष्य जेव्हां बसतो तेव्हां आज मिळणाऱ्या सुखापेक्षां उद्या मिळणारें सुख खात्रीनें जास्त मिळेल असें मनुष्याला वाटत असलें पाहिजे. ही उद्याच्या सुखाची वाट पहात बसण्याची किंमत म्हणजेच व्याज होय. बाकी व्याजासंबंधानें आज आपल्याला बोलावयाचें नाहीं. व्याजासंबंधानें जास्त माहिती आपल्याला आपले सुंदरशेट देतील. आज आपल्याला मनुष्याला पैसा बाजूला ठेवावा अशी इच्छा केव्हां होते हें पहावयाचें आहे. पैसा बाजूला ठेवावा अशी इच्छा होते याचें कारण मनुष्याला आपल्याला संपत्ति जास्त जलद मिळावी अशी स्वाभाविक इच्छा असते. ही संपत्ति जलद कशी मिळवावयाची? याचें उत्तर हेंच कीं, आपण आपल्या सहाय्याला इतर पुष्कळ गोष्टींची मदत घेऊन जास्त शीघ्रपणानें काम करावयाचें. इतर वस्तूंचीं मदत घ्यावयाची म्हणजे त्या कोणत्या वस्तु? अर्थात् ज्या वस्तूंच्या योगानें आपल्याला आपल्या कामांत पुष्कळ मदत होईल अशा वस्तु घ्यावयाच्या. ह्या वस्तु आणावयाच्या कुठून? एकतर त्या आपल्याजवळ असल्या पाहिजेत किंवा त्या मिळविल्यातरी पाहिजेत. आणि मिळवायच्या म्हणजे कोणी त्या फुकट तरी दिल्या पाहिजेत, किंवा आपण विकत

तरी घेतल्या पाहिजेत. अर्थात् नेहमीं आपल्याला कोणी कांहीं फुकट देणें शक्य नाहीं. आणि विकत घ्यावयाच्या म्हटलें म्हणजे पैसा पाहिजे. हा पैसा जवळ असावा म्हणून आपल्याला आपल्या उत्पन्नांतून बचत करावयाला शिकलें पाहिजे.

जमीन ही परमेश्वराची देणगी आहे. श्रम करणें हें मनुष्याचें काम आहे. पण पुढील फायदा लक्षांत घेऊन आज समोर दिसत असलेला फायदा दूर करणें हें फक्त विचार करणाऱ्या मनुष्यालाच शक्य आहे. भांडवल कसें उपयोगांत आणायचें, जमीन श्रम व भांडवल या संपत्तीच्या उत्पत्तीच्या तीन कारणांचा योग्य उपयोग कसा करून घ्यावयाचा व या तीन शक्तींचा जास्तींत जास्त फायदा मनुष्यानें कसा करून घ्यावयाचा हा मनुष्याच्या बुद्धीचा प्रश्न आहे, व धंद्यांची शिस्तवार मांडणी करून मनुष्य आपल्यापरीनें तो प्रश्न सोडवीत आहे.

आजपर्यंत बाबूराव, आपण संपत्तीच्या उत्पत्तीच्या तीन कारणांचा विचार केला. आतां उद्यां आपण धंद्यांतील शिस्तवार मांडणी (Organisation of Production) म्हणजे काय या गोष्टीचा विचार करूं. आज मला वाटतें पुरे झालें माझें लेक्चर. कंटाळलेले दिसता बाबूराव आज तुम्ही फार"

"छे! छे मी मुळींच कंटाळलों नाहीं" मी म्हणालों. "आज तुम्ही दिलेलें लेक्चर म्हणजे माझ्या ज्ञानाचें भांडवलच म्हणानात आप्पासाहेब तुम्ही! या भांडवलावर अर्थशास्त्राच्या पुढील ज्ञानाची इमारत मला उभारावयाची आहे. बरें पण आज पुरेच आप्पासाहेब. नमस्कार."

"नमस्कार बाबुराव, आज तुम्हाला काव्याची लहर आलेली दिसत आहे."

## प्रकरण १२ वें.

# धंद्यांतील शिस्तवार मांडणी म्हणजे काय ?

## Organisation of Production.

आमचीं अर्थशास्त्राचीं व्याख्यानें सुरळीतपणें चाललीं होतीं. आप्पासाहेबांनी कांहीं गोष्टी स्वतः सांगून तर कांहीं दुसऱ्याकडून सांगवून, कोणच्याही तऱ्हेनें का होईना, पण आतांपर्यंत अर्थशास्त्र हा एक मौजेचा विषय करून सोडला होता; आणि म्हणून मला मी आप्पासाहेबांकडे जाईन केव्हां व पुढील माहिती मिळवीन केव्हां असें दररोज होत असे. आणि त्यांतून आज आप्पासाहेब मला संपत्तीचीं जीं कांहीं मूर्त कारणें आहेत, त्यांपैकीं शेवटल्या कारणा-संबंधानें माहिती देणार होते. तेव्हां मी आज सकाळीं नेहमीं-पेक्षां थोडासा लवकर आप्पासाहेबांकडे गेलों यांत आश्चर्य तें कसलें !

" यावें बाबूराव " आप्पासाहेब हंसत हंसत म्हणाले " आज तुम्ही तर नेहमींपेक्षां थोडेसे लवकर आलेले दिसतां ? ठीक आहे, आतां माझे बरोबर चहा घ्या व नंतर आपण आजच्या विषयाला सुरवात करूं. "

" पण आप्पासाहेब " मी म्हणालों " आज आपण कोणच्या विषयासंबंधानें बोलणार आहांत ? "

" तें आपण मागून पाहूं बाबूराव, सध्यां चहा तर घ्या तुम्ही; आणि हीं ताजीं बिस्किटें पण पहा. आजचीं बिस्किटें आमच्या कुसुमनें तयार केलीं आहेत. " आप्पासाहेब म्हणाले.

कुसुम ही आप्पासाहेबांची धाकटी बहीण. ही उमरावतीच्या मुलींच्या हायस्कूलमध्यें असून पुढील वर्षीं प्रवेशपरीक्षेला बसणार होती.

चहा झाल्यावर आमचें संभाषण पुन्हां सुरू झालें.

" तुम्हाला जगू गवत्याच्या उदाहरणाचा अगदीं कंटाळा आला असेल बाबूराव, पण आजही आपल्याला त्याच्याचविषयीं पुन्हां बोलावयाचें आहे.

पहिल्यानें जगू एकटाच जंगलांत जाऊन गवत डोकीवर आणून बाजारांत विकी. पुढें त्यानें गवत आणण्याकरतां एक बैल ठेवला. नंतर एक बैलगाडी ठेवली. त्यानंतर बैलगाड्यांची संख्या वाढवून गवत तोडण्याकरतां व गाड्यावर भरून तें बाजारांत आणण्याकरतां त्यानें माणसें नोकरीला ठेवलीं. आणि आतां जगू यंत्राचे सहाय्यानें गवताचे गठ्ठे बनवून ते अगगाडीनें हिंदुस्थानच्या कोणच्याही भागांत आपले येथील गवत पाठवतो.

जगूला गवत मिळतें तें जमीनीमधून. जगू व त्याचे नोकर मेहनत करतात आणि म्हणून गवत बाजारांत विक्रीला येतें. जगूनें आपल्या प्राप्तींतून पैसे वांचवून सांठलेल्या पैशांतून बैल गाड्या वगैरे विकत घेतल्या; त्याच पैशांतून तो आपल्या नोकरांनां पगार देतो. मंचरजीशेटच्या जिनमधून तो गवताचे गठ्ठे बांधून घेतो, व त्या बद्दल तो मंचरजीशेटला पैसे त्यांतूनच देतो. अशा रीतीनें आपल्या भांडवलाच्या बळावर जगू आपलें उत्पन्न खूप वाढवत आहे. जितकें जास्त भांडवल तितका जास्त नफा; जितका जास्त नफा तेवढी जगूजवळ शिल्लक वाढण्याचा संभव जास्त. आणि जगूजवळ शिल्लक वाढली कीं जगूनें आपलें भांडवल वाढविलेंच.

आतांपर्यंत आपण पाहिलें कीं जगूच्या संपत्तीची सध्यां जी वाढ

होत आहे ती त्याच्या भांडवलाच्या जोरावर होत आहे. पण येवढ्यानेंच झालें नाहीं. जगूजवळ जमीन असली, जगू व जगूचे नोकर मेहनत करावयाला कितीही तयार असले, जगूचे जवळ भांडवल कितीही असलें, तरी येवढ्यानेंच जगूचा धंदा आज जितका उत्तम रीतीनें चालत आहे तितका उत्तम रीतीनें चालला नसता."

"कां बरें" मीं मध्येंच विचारलें.

"तेंच मी तुम्हाला आतां सांगतों. आपण आतां अशी कल्पना करूं कीं जगूजवळ ५० नोकर आहेत. त्यापैकीं कांहीं गवत कापण्याचे कामावर आहेत; व कांहीं गवत आणून त्याच्या गंजा लावण्याचे कामावर आहेत. कोणच्या मजूरांनीं काय काम करावयाचें हें जगूनें ठरवून दिलें आहे. आतां हें जर ठरविलें नसतें तर काय झालें असतें बाबूराव?" आप्पासाहेबांनीं विचारलें.

"व्हायचें काय आप्पासाहेब?" मीं उत्तर दिलें "सारा गोंधळ माजला असता आणि काय? गवत कोणी कापायचें हें ठरलेलें नाहीं; व कांहीं लोकांनीं कापलेंच तर तें गाड्यातून गावांत कोणी आणायचें हें ठरलेलें नाहीं. कोणालाच कोणचें काम करायचें हें माहीत नसल्यामुळें जवाबदारीही कोणावरच नाहीं. जगूचा धंदाच बसला असता कीं अशा गैदीपणामुळें" मी म्हणालों.

"झालें तर बाबूराव. जगूचा धंदा नुसत्या जमीन, श्रम व भांडवल येवढ्यावरच चालत नाहीं आहे, तर जगूनें आपल्या धंद्यांत जी कांहीं एक व्यवस्थेशीर मांडणी केली आहे तिच्यावरही जगूची धंद्यांतील चलति पुष्कळ अंशीं अवलंबून आहे हें तुमचें तुम्हींच ठरविलेंत. धंद्यांतल्या या शिस्तीवार मांडणीला इंग्रजींत Organisation of Production म्हणतात. संपत्तीच्या उत्पत्तीचीं जीं चार कारणें आहेत त्यांपैकीं धंद्याची शिस्तवार मांडणी हें एक चौथें

पण अत्यंत महत्वाचें कारण आहे. सृष्टीदेवतेची तुमच्यावर कितीही कृपा असूं द्या; तुम्ही कितीही श्रम करायला तयार असा; तुमच्याजवळ कितीही भांडवल असूं द्या; तुम्हाला संपत्तीची वाढ जर झपाट्यानें व्हावयाला पाहिजे असेल तर **संपत्तीच्या ह्या पहिल्या तीन कारणांचा उत्तम उपयोग आपल्याला करून घेतां येईल अशा तऱ्हेची धंद्याची शिस्तवार मांडणी करायला पाहिजे.** जमीन ही परमेश्वरी देणगी आहे; श्रम ही शरीराची तालीम आहे; भांडवल हें सुखाचा उपभोग कांहीं कालपर्यंत लांबणीवर टाकल्याचें बक्षीस आहे; आणि धंद्याची मांडणी हा बुद्धीचा खेळ आहे. ज्याची ही मांडणी जास्त चांगली त्याला धंद्यांत फायदा जास्त.

धंद्याच्या ह्या शिस्तवार मांडणीला हें सध्याच्याच युगांत अतिशय महत्व आलेलें आहे. एकेकाळीं तें मुळींच नव्हें; व जसजसा काल जात गेला तसतसें तें जास्तजास्त येऊं लागलें.

धंद्याच्या ह्या शिस्तवार मांडणीची जरूर केव्हां भासायला लागते? ज्या वेळेस धंदा फार मोठ्या प्रमाणावर सुरू राहील तेव्हां. जेव्हां जगू स्वतःच एक खुरपा घेऊन जंगलांत जाई व गवताचा भारा डोक्यावर आणून बाजारांत विकी, त्या वेळेस जगूला धंद्यांतली शिस्तवार मांडणी ती काय करायची होती?

ज्या वेळेस व्यापार येवढा वाढला नव्हता, ज्या वेळीं प्रत्येक गांव आपल्या गरजापुरतें पहात असे, त्यावेळीं या धंद्यांतील शिस्तवार मांडणीकडे लक्ष द्यावयाचें कोणालाच कारण नव्हतें. धंद्यांतली ही शिस्तवार मांडणीची जरूर केव्हां भासते? जेव्हां संपत्तीची वाढ जास्त झपाट्यानें व्हावी अशी मनुष्याची इच्छा असेल तेव्हांच ना? पण त्यावेळीं लोकांना संपत्तीची वाढ व्हावी असें वाटतच नव्हतें मुळीं. आपल्या पोटापुरतें मिळवावें व स्वस्थ बसावें

अशी त्यावेळच्या लोकांची प्रवृत्ति असे. गावांत एक लोहार, सुतार, सोनार, चांभार, वाणी, कापडवाला, सर्व कांहीं तेथेंच. परगांवशीं कांहीं संबंध नाहीं. शेतांत धान्य पिकवायचें. शेतीकरितां जीं कांहीं थोडीशीं हत्यारेंपात्यारें लागतील तीं गांवच्या सुताराकडून व लोहाराकडून तयार करून घ्यावयाचीं, व त्याचा मोबदला धान्य द्यावयाचें; घरीं चरक्यावर सूत काढावयाचें; व हातरहाटावर कापड विणावयाचें. जरूर वाटली तरच कपडा वापरायचा नाहींतर आपले उघडेच राहिले. खेड्यांतलें हें असलें स्वराज्य असल्यावर बाहेर गांवच्या लोकांशीं संबंध ठेवण्याची जरूरीच व्हावयाची नाहीं. अशा परिस्थितींत आपला धंदा जास्त वाढावा अशी माणसाला इच्छा होण्याचें कारणच रहात नाहीं. आपल्याकडे अशी स्थिति एकेकाळीं होती. समाजाच्या असल्या स्थितीला इंग्रजींत State of self-supporting groups असें म्हणतात. संपत्ती वाढविण्याची या स्थितींतील समाजाला फारशी इच्छा नसल्यामुळें धंद्यांतील शिस्तवार मांडणीकडे लक्ष देण्याची त्यांना जरूर नसते.

पण समाज कांहीं नेहमीं याच परिस्थितींत रहात नाहीं. तो सारखा पुढें जात असतो. स्वभावतःच मनुष्याला सुख पाहिजे असतें आपल्याला चैनीचे जिन्नस मिळावेत असें मनुष्याला सहाजीकपणें वाटूं लागतें. नुसत्या पोट भरण्याकरतां सारा दिवस काबाडकष्ट करणें मनुष्याला आवडेनासें होतें. आतां चैनीचे किंवा ज्याच्या योगानें आपल्याला जास्त सुख मिळेल असे जिन्नस एखाद्या मनुष्याला कसे मिळतील? त्यानें त्या जिनसांबद्दल त्या जिनसा देणाऱ्या मनुष्याला कांहींतरी मोबदला दिला पाहिजे. मोबदला द्यावयाचा तो कोठून? आपण जर फक्त आपल्याला पाहिजेत तेवढयाच वस्तु तयार करतों तर मोबदला द्यावयाला आपलेजवळ कोणच्या वस्तु

शिल्लक रहाणार ? शिल्लक रहावयाला आपण आपल्याला जितक्या जितक्या वस्तु अत्यावश्यक आहेत तितक्यापेक्षां कांहींतरी जास्त वस्तु पैदा केल्या पाहिजेत. रामूच्या कुटुंबाला दरसाल एक खंडी ज्वारी खावयाला लागते. रामूजवळ जर फक्त एकच खंडी ज्वारी असली तर रामू घरच्या लोकांचेकरतां कापड कोठून घेऊं शकेल ? रामूला आपल्या शेतांत जास्त खपलें पाहिजे. जास्त खत घातलें पाहिजे, आणि आपले शेतांत निदान दोन खंडी ज्वारी पिकविली पाहिजे, म्हणजे एक खंडी ज्वारी घरीं खायला राहील व एक खंडी ज्वारी विकून त्याचे जे पैसे येतील त्यांतून त्याला कापडचोपड वगैरे जिन्नस विकत आणतां येतील.

एकंदरींत तात्पर्य काय बाबूराव कीं समाजाच्या या दुसऱ्या स्थितींत प्रत्येक मनुष्य आपली प्राप्ति वाढवावयाला लागेल. रामू धान्य पिकवून तें सुंदरशेटला विकील.सुंदरशेट कापड रामूला विकील. मारुती लोहार खूपसे नांगराचे फाळ तयार करून ठेवील आणि ते दुसऱ्या गांवच्या लोकांनासुद्धां विकील. कोणच्या गांवीं कोणच्या वस्तूला काय भाव आहे याचेकडे लोकांचें लक्ष जायला लागेल. एकच मनुष्य एकच वस्तू तयार करण्याकडे जास्त लक्ष द्यायला लागला कीं संवयीनें तो त्या वस्तु जास्त सफाईदार व पुष्कळ तयार करूं लागेल. अशा रीतीनें त्याची संपत्ति वाढत जाईल, रामूजवळ जरूरीपेक्षां पुष्कळ धान्य जास्त झालें म्हणजे त्याला चांगले कपडे घालावेसे वाटतील. आणि मग सिताराम शिंपी त्याला उत्तम कपडे शिवून देण्याचें कबूल करील. आपल्या गावांतच सारसर्वस्व मानण्याची लोकांची प्रवृत्ति नाहींशी होऊन आपल्या गावांबाहेरील जगाशीं मनुष्य व्यापार करूं लागेल.

आतां अशा तऱ्हेनें मनुष्य आपली संपत्ति वाढवावयाला लागला

कीं तेथें धंद्याच्या व्यवस्थित मांडणीची जरूर आलीच. रामू आपल्या शेतांत ज्वारी पेरत असे पण लोकांना आतां गहूं पाहिजेत असें त्याला कळलें कीं तो गहूं पेरतो. बाजारच्या अगदीं मुख्य रस्त्यावर एक जागा भाड्यानें घेऊन तेथें तो आपलें गव्हाचें दुकान लावतो, व बाहेर " रामराव देशमूख यांची गव्हाची मोठी वखार " अशी एक भली जंगी पाटी लावतो. अशा रीतीनें कोणची जागा आपल्या धंद्याच्या जास्त उपयोगी पडेल हें तो ठरवितो. शिदू चांभारही Shoe market मध्येंच आपलें दुकान थाटतो. थोडेसें जास्त भाडें द्यायला त्याला कांहीं वाटत नाहीं. लोकांना कोणच्या तऱ्हेचे जोडे आवडतात हें पाहून तो तसले जोडे तयार करतो. दुकानावर गिऱ्हाईक आलें कीं त्यांना खुर्ची देतो. गिऱ्हाइकांशीं गोड बोलून भाव ठरवितो. जोडयांची शिवण चांगली असावी म्हणून आपल्या दुकानांत एक शिवण्याचें यंत्र आणून ठेवतो. आणि अशा रीतीनें आपला धंदा वाढवितो.

समाजाच्या या दुसऱ्या स्थितीला इंग्रजींत "Artisan Stage" असें म्हणतात. या स्थितींत प्रत्येक मनुष्य एकच वस्तु दुसऱ्या पुष्कळ लोकांचे करतां तयार करतो व अशा रीतीनें स्वतःची संपत्ति व त्याबरोबरच समाजाचीही संपत्ति वाढवितो.

"पण आप्पासाहेब या कारागिरांच्या काळांत Artisan Stage धंद्यांतल्या शिस्तीची कुठें जरूर लागते तें माझ्या ध्यानांत नाहीं आलें" मी म्हणालों.

" कां बरें तुमच्या ध्यानांत नाहीं तें ? असूं द्या. आपण पुन्हां शिदू चांभाराचेंच उदाहरण घेऊं. शिदू जर घरींच बसून राहिला तर त्याच्या दुकानीं लोक जोडे विकत घ्यायला जाणार कसे ? शिदू जर गिऱ्हाइकाशीं बोललाच नाहीं तर कोणचें गिऱ्हाईक त्याच्याशीं

बोलण्याचा प्रयत्न करील? गावांत सध्यां लोकांना पंपशूज आवडतात असें माहीत असतांना शिदूनें जर चढाऊ जोडेच खूपसे करून विक्रीला ठेवले तर त्याची कशी विक्री होईल? शिदूला जर आपला धंदा वाढवावयाचा असेल तर त्यानें जोडयांच्या बाजारांत दुकान थाटलें पाहिजे; गिऱ्हाइकांशीं बोललें पाहिजे; गिऱ्हाइकांना कोणच्या तऱ्हेचा माल लागतो हें ध्यानांत घेऊन त्याप्रमाणें दुकानांत माल तयार ठेवला पाहिजे. आणि या सर्व गोष्टी नीट करण्याकरतां त्याला आपली बुद्धि खर्च केली पाहिजे. हा बुद्धीचा उपयोग म्हणजेच धंद्यांतील शिस्तीची मांडणी. आलें का ध्यानांत आतां मी काय म्हणतों तें?"

"होय आप्पासाहेब. मला आतां धंद्यांतील शिस्तीची मांडणी म्हणजे काय तें चांगलें समजलें," मी म्हणालों.

"आतांपर्यंत बाबूराव आपण समाजाच्या दोन स्थितींचा विचार केला. पहिली स्थिति म्हणजे स्वतःच्या गरजा स्वतःपुरविणारा समाज (Stage of Self Supporting Group)दुसरा काल कारागिरांचें (Artisan stage) आणि सध्यां चालू आहे हें यंत्राचें युग असें म्हणतां येईल.

सध्यां जगाच्या एकंदर गरजा फार झपाट्यानें वाढत आहेत. आणि त्या गरजा पुऱ्या पडण्याकरितां नुसत्या मनुष्याचे श्रम पुरे पडत नाहींत. थोड्या वेळांत जास्त पुरवठा कसा करायचा हा मनुष्यापुढें फार मोठा प्रश्न होता. आणि त्या प्रश्नांचें उत्तर उत्कृष्ट यंत्र सामुग्रींच्या जोरावर वाटेल तेवढ्या वस्तु तयार करून मनुष्यानें दिलें आहे. तुम्हाला फोर्ड मोटार माहीत आहेच बाबूराव. या गाडीच्या कारखान्यांत दररोज हजारों गाडया तयार होतात. आणि मौज ही आहे कीं या साऱ्या मोटारगाडयांना मागणीही पण आहेच.

या यंत्रसामुग्रीच्या युगांत (Factory Stage) बाबूराव धंद्यांतील शिस्तवार मांडणीची अत्यंत जरूर आहे. कारखान्याच्या एका भागांत मोटारचीं चाकेंच तयार होत रहातील. एका भागांत नुसते स्क्रूच होतील. अशा तऱ्हेनें श्रम विभागाच्या तत्वावर कामें जास्त प्रमाणावर व जास्त चांगल्या रीतीनें होतील.

धंद्यांतील शिस्तवार मांडणीचा विचार आपल्याला खालील सदराखालीं करतां येईल.

१ धंद्यांतील मजूर व यंत्र सामुग्री यांचेमधील धंद्याला जरूर पडणारा श्रम विभाग. (Division of Labour)

१ धंद्याच्या जागेची सोईस्कर व योग्य निवड.( Localisation of industry )

३ मोठ्या प्रमाणावर कारखान्यांची वाढ.( Production on a large Scale )

४ धंद्याच्या व्यवस्थेच्या निरनिराळ्या तऱ्हा, ( Different Forms of business-management )

आज आपल्याला पुष्कळच उशीर झाला आहे बाबूराव, तेव्हां उद्यां व परवां मिळून वरील चार मुद्यांचा आपण विचार करूं. आज येथेंच थांबलेलें बरें नाहीं का ?"

"ठीक आप्पासाहेब नमस्कार" मी म्हणालों, व आप्पासाहेबांची रजा घेतली.

## प्रकरण तेरावें.

# श्रमविभाग व त्या दृष्टीनें यंत्र सामुग्रीचा उपयोग.

" बाबूराव काल आपण धंद्यांतील शिस्तवार मांडणीची संपत्ति मिळविण्यांत व वाढविण्यांत किती जरुरी आहे याचा विचार केला. कोणच्याही उद्योगांत व धंद्यांत शिस्त ही पाहिजेच आणि ही शिस्तवार मांडणी करण्यांतच मनुष्याच्या बुद्धिमत्तेची परीक्षा होते. "

नेहमीप्रमाणें मी आप्पासाहेबांचेकडे सकाळीं गेलों. व नंतर आमचा संवाद सुरू झाला; हें दररोज सांगायला पाहिजे असें नाहीं. जितके दिवस साधेल तितके दिवस दररोज सकाळीं अप्पासाहेबांचेकडे जाण्याचा योग फुकट दवडण्याइतका मी खात्रीनें मूर्ख नव्हतों.

" समाजाच्या पहिल्या स्थितींत प्रत्येक गांव फक्त आपल्यापुरतें पहात असे. अशावेळीं आपल्याला पोटापुरतें मिळालें म्हणजे पुरे अशी प्रत्येक मनुष्याची इच्छा असे. पुढें जसजशी मनुष्याची नजर फांकत गेली, तसतसा मनुष्य दुसऱ्या गांवासंबधानें विचार करूं लागला. आपण एखादी वस्तु तयार करण्यांत प्राविण्य मिळवावें, व ती वस्तु आपल्याला पाहिजे त्यापेक्षां जास्त प्रमाणांत तयार करून ठेवावी. नंतर आपल्याला नको असलेल्या वस्तु दुसऱ्याला देऊन त्याचेपासून आपल्याला पाहिजे त्या वस्तु घ्याव्यात असें मनुष्याला वाटावयाला लागलें. मनुष्याच्या गरजेच्या वस्तु जसजशा वाढत गेल्या तसतसा त्यांचा पुरवठा करण्याचे लोक झटून प्रयत्न करूं लागले. मनुष्य एकच काम नेहमीं करीत राहिला त्यामुळें

तें काम चांगलें व फारच थोड्या वेळांत होऊं लागलें. हा सारा संचयीचा परिणाम आहे. या मनुष्यस्वभावाचा फायदा घेऊन मनुष्यानें एकच वस्तु खूप मोठ्या प्रमाणांत तयार करण्यास सुरवात केली. काम लवकर व्हावें म्हणून यंत्राची मदत घेण्यांत आली. यंत्राकडून झटपट कामें होऊं लागलीं. तेव्हां अशा तऱ्हेच्या यंत्रांना जास्त मागणी होऊं लागली आणि म्हणून तीं यंत्रें तयार करण्याचे कारखाने निघूं लागले. यंत्रानें दुसरीं यंत्रें तयार होऊं लागलीं, अशा तऱ्हेनें यंत्रसामुग्रीच्या युगास सुरवात झाली."

"पण अप्पासाहेब, यंत्रें वापरण्यापासून खात्रीनें फायदा होत असला पाहिजे, नाहीं का? मी विचारलें.

"होय फायदा होतोच" अप्पासाहेबांनीं उत्तर दिलें. हातानें काम जितक्या लवकर होऊं शकतें त्याचे कितीतरी पट जास्त जलद यंत्रानें होऊं शकतें हा पहिला फायदा. मनुष्य एकच काम सारखें करून थकून जातो. तेंच तेंच काम सारखें करून त्याला एक तऱ्हेचा कंटाळा येतो. हा कंटाळा यंत्राच्या मदतीनें नाहींसा होतो. तेंच तेंच काम करायचें झालें कीं तेथें यंत्र म्हणतें "बाबा तूं हो बाजूला आणि मला करूं दे तुझें काम. मला कंटाळा येत नाहीं कांहीं नाहीं; तूं कां विनाकारण तकलीफ घेतोस? तुला काम करायची जर फार हौस असली व तुला कितीही वेळ सारखें काम करीत रहाण्याची उमेद असली तर तूं आपली उमेद दुसऱ्या एखाद्या जास्त उपयुक्त कामाकरतां राखून ठेव" आणि खरोखर बाबूराव यंत्रें नसतीं तर जगांत आज जितके उद्योगधंदे चालू आहेत तितके दिसणें अशक्य होतें.

यंत्रांच्या योगानें संपत्तीची वाढ झपाट्यानें होते; यंत्रांच्या योगानें मनुष्याला तेंच तेंच काम करण्याची जरूर पडत नाहीं; यंत्रांच्या

योगानें मोठ्या प्रमाणावर कारखानें सुरू झाल्यामुळें गिऱ्हाइकांना स्वस्त माल देणें परवडतें. यंत्रावर काम करणाऱ्या मजूराला यंत्र एखादे वेळेस जर काम करायचें थांबलें तर काय करावयाचें येवढ्या पुरती तरी माहिती असावी लागते. यंत्रानें केलेलीं कामें एकसारखीं होत असल्यामुळें गिऱ्हाइकांचा घोंटाळा कधींही होत नाहीं. आतां कल्पना करा बाबूराव, आपल्याला सिंगरमशीनचा एक नवा भाग पाहिजे आहे. आपल्याला आपल्या मोडक्या भागाचा नंबर माहिती असतो आणि त्या नंबरचा नवा भाग आपण बोलावला म्हणजे तो आपल्या यंत्रावर बरोबर बसेल ही आपली खात्री असते. आणि ही खात्री असल्यामुळेंच आपण सिंगरमशीन विकत घेतों. मोडलेला भाग आपण जर हातानें करवूं म्हटलें तर एक तर त्याला किंमत अतीशय पडेल, आणि इतकी किंमत देऊन सुद्धां तो जरा लहान मोटा झाला कीं झालाच सारा घोंटाळा. अशा तऱ्हेचे बाबूराव यंत्राचे आपल्यावर कितीतरी उपकार आहेत."

"तर मग आप्पासाहेब" मी मध्येंच विचारलें" यंत्रापासून तोटे कांहींच नाहींत का ?

"नाहींत कसे" आप्पासाहेबांनीं उत्तर दिलें" यंत्रापासून जसे फायदे आहेत तसे तोटेही आहेत. आतां येवढें मात्र खरें कीं तोटयांच्या मानानें फायदे फार आहेत. आणि म्हणून मनुष्यानें यंत्राच्या मदतीचा जरूर फायदा घेतला पाहिजे.

आतां आपण अशी कल्पना करूं या बाबूराव, कीं, आपल्या गांवांत प्रत्येक मनुष्याला दरवर्षी दहा वार कापड लागतें, व आपल्या गांवीं दहा हजार लोकसंख्या आहे. म्हणजे आपल्या गांवाला दरवर्षी एक लाख वार कापड पाहिजे. आतां आपण अशी कल्पना करूं कीं, हें एक लाख वार कापड हातरहाटावर सूत काढून तें

सुत मागावर घालून त्याचें विणलेलें असलें. आतां इतकें कापड हात मागावर काढण्याला कितीतरी लोकांना सारा दिवस खपावें लागेल. पण एकदां कापडाची एक गिरणी निघाली कीं कितीतरी कापड फारच थोड्या लोकांच्या सहाय्यानें यंत्रावर निघूं शकेल. याचा परिणाम काय होईल बाबूराव ?"

"याचा परिणाम मला वाटतें असा होईल कीं, पुष्कळशा कोष्टी लोकांना आपलें कापड विकणें बंद करावें लागेल. आणि त्यामुळें त्या गरिबांच्या पोटाचा धंदा नाहींसा होईल. बरोबर आहे का माझें उत्तर आप्पासाहेब" ? मी म्हणालों.

"अगदीं बरोबर" आप्पासाहेब म्हणाले "जितका यंत्रांचा प्रसार जास्त, तितकी मनुष्याच्या शारीरीक मेहनतीची जरूर कमी. आतां इतके रिकामे झालेले लोक अगदीं उपाशीच मरतील असें नाहीं. मजुरी स्वस्त आहे असें पाहून त्याचा फायदा घेण्याकरतां आणखी पुष्कळ इतर जिनसांचे कारखाने निघतील व त्या कारखान्यांत बेकार मजूरांची सोय लागेल. तरी पण हे नवीन निघणारे कारखाने दुसऱ्याच प्रांतांत निघाले तर आपल्या येथील बेकार मजुरांना त्याचा फारच थोडा फायदा करून घेतां येईल. कारण बाबूराव, आपण मागें पाहिलेंच आहे कीं, मजूर अगदीं जरूरच पडल्याशिवाय घर सोडून जायला कधींहीं तयार नसतो. समजलें का बाबूराव तुम्हाला मी काय म्हणतों तें ?"

"होय समजलें" मी उत्तर दिलें. "पण आप्पासाहेब मला एक शंका आहे. यंत्रावर माल तयार होऊं लागला कीं तो स्वस्त विकणें कारखानदाराला परवडतें हें तुम्हीं मला अगोदरच सांगितलें आहे. मग बाजारांत यंत्रावर तयार होणारा माल जर स्वस्त विकूं लागला तर मजूर वर्गाला फार थोड्या खर्चांत रहातां येणें शक्य होईल. असें

असतांना सुद्धां मजूर लोक एखादे वेळेस पगार वाढीकरतां अडून बसतात व कधीकधीं संपही करतात याचा अर्थ काय ?"

"यंत्राच्या सहाय्याने जो माल तयार होतो तो बाजारांत स्वस्त विकला जातो हें खरें आहे बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले. "पण मजूर वर्गाला ज्या वस्तूंची नेहमीं अत्यंत जरूर लागते त्या वस्तू तयार करण्याचे किंवा उत्पन्न करण्याचे कामीं यंत्रांचा फारच थोडा उपयोग होतो. आपल्या मंचरजीशेटनीं एक पेपरमिंटची गिरणी काढली आहे व त्यामुळें पेपरमिंट आपल्याला स्वस्त मिळूंही शकेल. पण पेपरमिंट स्वस्त झालें म्हणून मजूर लोक कांहीं नुसतें पेपरमिंट खाऊन तर राहूं शकत नाहींत ना ? मजूर लोकांना पहिल्या प्रथम खावयाला पोटभर अन्न, व रहावयाला घर ह्या दोन गोष्टी जरूर पाहिजेत. आणि तुम्हाला हें माहीत असेलच बाबूराव, कीं शेतीच्या देशांत यंत्रसामुग्रीनें अजून फारसा शिरकाव केला नाहीं. त्यामुळें बाजारांत पेपरमिंट कितीही स्वस्त झालें तरी गणबा शेवटीं ज्वारी काय पायली मिळते हीच चवकशी प्रथम करील व ज्वारी कांहीं पेपरमिंटासारखी एकदम स्वस्त होणें शक्य नाहीं यंत्रावर तयार होणारा माल हा बहुतकरून सुखवस्तु लोकांचे करतांच असतो व म्हणून त्या स्वस्ताईचा फायदा मजूर वर्गाला जरी मिळाला तरी अतिशय थोडा मिळतो.

यंत्रांचा कितीही प्रसार झाला तरी बाबूराव, मजूर जर म्हणूं लागेल कीं मी फक्त दिवसांतून दोनतीन तास काम करीन व नंतर मग सारा दिवस "वाङ्मयसेवा" करीन तर तें केव्हांही शक्य होणार नाहीं. आणि याचीं कारणेंही वरच्या प्रमाणेंच आहेत. मजूर-दारांचा बराच मोठा भाग शेतीच्या कामांत गुंतलेला असतो. आणि शेतींत यंत्रसामुग्रीचा कारखान्यांच्या मानानें फारसा उपयोग होत

नाहीं. तसेंच घरें बांधण्याच्या कलेंत सुद्धां यंत्रांचा फारसा उपयोग होत नाहीं. तेव्हां मजूरवर्गाच्या बऱ्याच मोठ्या भागाला यंत्रांची फारशी मदत मिळत नाहीं व मिळाली तर फारच थोडी मिळते हें ओघानें ठरलेंच.

बाबूराव आज आपण धंद्यांत श्रमविभागाचें तत्त्व अंगिकारल्यामुळें संपत्तीची उत्पत्ति आपल्याला जास्त प्रमाणावर करतां येते हें पाहिलें. यंत्रसामुग्रीच्या मदतीनें संपत्तीची वाढ अवाढव्य प्रमाणावर कशी होते याचा आपण विचार केला. यंत्रसामुग्रीचा उपयोग एकंदर मनुष्य जातीच्या हिताला फायदेशीरच कसा होतो हें आपण पाहिलें. यंत्रांचें मदतीचा उपयोग अजूनपर्यंत शेतींत व घरें बांधण्याचे कामांत फारसा होत नाहीं आणि वरील दोन कामांतच मजूरवर्गाचा बराचसा भाग गुंतलेला असल्यामुळें वरील धंद्यांत पडलेल्या मजुरांना बरेचसें काम स्वतःचे शारिरीक मेहनतीनें व सर्व वर्षभर करणें कसें व कां जरूर पडतें ह्याचाही आपण विचार केला. एकंदरींत धंद्यांतील शिस्तवार मांडणीच्या ज्या चार सदरांखालीं आपल्याला विचार करतां येतो त्यांपैकीं पहिलें सदर जें श्रमविभाग व त्या दृष्टीनें यंत्रसामुग्रीचा त्यासंबंधी उपयोग त्याचा आपण विचार केला. आतां उद्यां आपण दुसऱ्या सदराकडे वळूं या. कोणचा धंदा कोणच्या ठिकाणीं केला असतां फायदेशीर होतो हें ठरविणें कांहीं सोपें नाहीं. जगू गवत्या ज्या ठिकाणीं परगांवच्या गाड्या येऊन उतरतात त्या ठिकाणींच आपलें गवत विकायला ठेवतो आणि म्हणून त्याला त्याचे धंद्यांत फायदा होतो. बरें तें असूं द्या. उद्यां सकाळीं धंद्याच्या जागेची व सोइस्कर व योग्य निवड कशी करावयाची यासंबंधानें आपण थोडासा विचार करूं. आज आपण येथेंच पुरें करूं या.

"होय आप्पासाहेब" मी म्हणालों. मीही स्वतः यासंबंधानें उद्यां थोडासा विचार करून येईन. बरें आहे नमस्कार आप्पासाहेब.

नमस्कार बाबूराव.

---

## प्रकरण चौदावें.

# धंद्यांतील यशाची गुरुकिल्ली

## माणेकजी शेट यांचा अनुभव.

दुसरे दिवशीं सकाळीं मी दररोजच्या प्रमाणें आप्पासाहेबांचे घरीं गेलों. पण आप्पासाहेब नेहमींप्रमाणें एकटे बसले नसून त्यांचेकडे कोणीतरी पारशी गृहस्थ येऊन बसले आहेत असें माझ्या दृष्टीस आलें. नेहमींप्रमाणें आज आप्पासाहेबांशीं अर्थशास्त्रासंबंधानें आपल्याला या अनाहूत पार्शी गृहस्थाच्या येण्यामुळें बोलावयाला सांपडणार नाहीं हा विचार माझ्या डोक्यांत येऊन मी थोडासा हिरमुसला झालों. हें सांगावयाला नकोच.

"या बाबूराव" आप्पासाहेब आपल्या नेहमींच्या पद्धतीनें हंसत हंसत म्हणाले "या पाहुण्यांची व तुमची ओळख करून देतों. हे गृहस्थ कोण आहेत तें सांगतों तुम्हाला. यांचें नांव माणेकजी. हे नागपूरच्या एंप्रेस मिल्समध्यें एंजिनिअर आहेत. दादासाहेबांना भेटावयाला हे आले आहेत. आपल्या वऱ्हाडांत विदर्भ मिल्सनांवांची कापडाची गिरणी निघणार आहेना? त्या संबंधानेंच हे आले आहेत इकडे नागपूर सोडून; आणि हे पहा माणेकजी शेट" आप्पासाहेब शेटजींच्याकडे वळून म्हणाले "हे आमचे मित्र बाबुराव! सुखवस्तु गृहस्थ आहेत हे; आणि शिवाय यांना अर्थशास्त्राचा फारच नाद आहे. पुढें मागें अर्थशास्त्रावर एखादा ग्रंथ लिहिण्याचा विचार आहे यांचा; पण सांगू नका बरें का शेटसाहेब ही गोष्ट कोठें!

आप्पासाहेब हंसले. आम्हीं दोघेही हंसलों. माणेकजी शेटनीं माझ्याशीं प्रेमानें हस्तांदोलन केलें.

" मला फार आनंद झाला बाबुरावनां भेटून " माणेकजी शेट हंसत हंसत म्हणाले.

" तेवढयानें भागत नाहीं शेटसाहेब " आप्पासाहेब म्हणाले. " आजचें अर्थशास्त्रावरील व्याख्यान तुमचें झालें पाहिजे अशी सूचना आहे. व बाबूरावजींचें त्याला अनुमोदन आहे. तेव्हां आपल्या तिघांच्या सभेंत आम्हीं दोघांनीं बहुमतानें पास केलेला ठराव तुमच्यावर या लोकशाहीच्या दिवसांत बंधनकारक समजला पाहिजे.

" वाहवा वाहवा ! शेटसाहेब हंसत हंसत म्हणाले " ठीक आहे बुवा तुमची ही लोकशाही ! बरें पण मी बाबूरावनां आज अर्थशास्त्रासंबंधानें काय सांगू हें तरी मला सांगाल कीं नाहीं."

" मी सांगतों तुम्हाला काय तें शेटसाहेब " मी मध्येंच म्हणालों. काल आम्हीं असें पाहिलें कीं कोणताही धंदा किंवा कारखाना कोणच्या जागीं सुरु केला जातो यावर त्या धंद्यांतील यशापयश अवलंबून असतें. आतां तुम्ही मला सांगा शेटसाहेब कीं, धंद्याची जागा ठरवितांना कारखानदार कोणच्या गोष्टी ध्यानांत घेतात ?"

"All right" शेटसाहेब म्हणाले, " मी तरी तेवढ्याचकरतां नागपुराहून उमरावतीस आलों होतों, विदर्भ मिल्स कोठें काढावी हा पडला आहे त्या कारखान्याच्या डायरेक्टर्सपुढें प्रश्न. तेव्हां त्या लोकांना मी जें सांगितलें तेंच मी तुम्हाला सांगतों म्हणजे झालें. पण माझें आहे मोडकेंतोडकें मराठी. तेव्हां तुम्ही त्याला हंसूं नका बरें का !"

कारखाना काढावयाचा झाला म्हणजे आपण पहिल्या प्रथम मुख्य अशा एका गोष्टीचा विचार केला पाहिजे. ज्या वस्तुचा आपल्याला

कारखाना काढावयाचा आहे त्या वस्तूकरतां लागणारा कच्चा माल कोठें पैदा होतो ? आपला कारखाना आपण जर त्याच मुलुखांत घातला तर आपल्याला तो सर्व कच्चा माल जवळच्याजवळ व थोडाबहुत स्वस्त किमतीला घेतां येईल. लांबून कच्चा माल आणावयाचा झाला म्हणजे आगगाडीचा खर्च विनाकारण अंगावर बसतो. आणि पुन्हां माल आणतांना नुकसानी होऊन रेल्वेकंपनीवर दिवाणी दावे करीत बसावें लागतें तें निराळेंच.

बरें, आपल्याला कारखान्याला कच्चा माल जरी पुष्कळ मिळाला तरी कारखाना चालवावयाला आपल्याला कोळशाचा किंवा विजेचा पुरवठा साध्य करून घेतां येईल कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. आमच्या एंप्रेस मिलला बंगालचा उत्तम कोळसा फारच जवळ पडतो आणि नागपूरच्या जवळपास कापूसही बराच पिकत असल्यामुळें नागपूरला आमची एंप्रेस मिल निघाली व आतां नवीन मॉडेल मिलही निघाली आहे. तुमच्या वऱ्हाडांत सुद्धां कापूस पुष्कळ पिकतो आणि म्हणून तुमच्या उमरावती जिल्ह्यांत एक कापडाची गिरणी चांगली चालूं शकेल असें माझें मत आहे.

तिसरी गोष्ट कारखाना काढतांना ध्यानांत घ्यावयाची ती ही कीं, कारखान्याला आपल्याला पुरेसे मजूर मिळतील कीं नाहीं ? व मजूर मिळत असले तरी ते आपल्या कामीं उपयोगी पडण्यासारखे मिळतील कीं नाहीं ? तसेंच आपण ज्या ठिकाणीं कारखाना काढूं म्हणतों तेथील हवा कशी काय आहे तेथें पाणी पुरेसें आहे कीं नाहीं; हेंही आपण लक्षांत घेतलें पाहिजे. ज्या प्रांतांत अति उष्णता असते त्या प्रांतांतील मजूरांच्या हातून चांगलें काम होत नाहीं. थंड मुलुखांत मनुष्याला काम करण्याची एक तऱ्हेची हुशारी वाटते. आणि त्यामुळें त्याचे हातून कामहीपण चांगलें होतें.

आतां एकच ठिकाणीं एकाच तऱ्हेचे चार पांच कारखाने निघाले तर किती तरी फायदा होईल. आपण आतां अशी कल्पना करूं कीं नागपुरलाच आणखी एक कापडाची गिरणी कोणी काढावयाचें मनांत आणलें तर तेथें गिरणी काढणें मुळींच कठीण जाणार नाहीं. गिरणीला मजूरहीं वाटेल तेवढे मिळूं शकतील. कापडाच्या कारखान्यांत अमदाबादच्या गिरण्यांत काम केलेले व कांहीं कारणामुळें तेथील धंदा सोडून मध्यप्रांतांत येऊं इच्छिणारे लोक सरळ नागपूरला जातील व त्यांना तेथें कोणच्याही गिरणींत काम मिळूं शकेल. एकाच जागीं पुष्कळशा कापडाच्या गिरण्या झाल्या कीं चढाओढीमुळें कापडाचा भावही उतरेल. आपण वर पाहिलेल्या गोष्टी ध्यानांत ठेवूनच कारखानदारांनीं कारखाने काढले असल्यामुळें त्यांनाहीं माल चांगला व स्वस्त काढणें परवडेल व अशा रीतीनें बाहेरील मालाशीं टक्कर देतां येऊन स्वदेशी चळवळीला उत्तेजन देतां येईल.

सध्यांचें युग बाबुरावजी यंत्राचें आहे. तुम्ही जर जगांतील मोठमोठ्या परदेशी कारखानदारांशीं टक्कर दिली नाहीं तर तुमचा सारा पैसा परदेशांत गेलाच म्हणून समजा. आणि परदेशी कारखानदारांचे बरोबर टक्कर द्यावयाची म्हणजे तुम्हाला त्यांच्या त्यांच्याच युक्त्यांनीं लढलें पाहिजे. आपल्यालाही मोठ्या प्रमाणावर कारखाने काढले पाहिजेत. आतां असे मोठ्या प्रमाणावर कारखाने काढावयाचे म्हणजे आपल्याला खूप भांडवल जमवलें पाहिजे ही गोष्ट खरी. आणि म्हणूनच तर आम्हीं आप्पासाहेबांच्यासारख्या जमीनदारांना आमच्या गिरण्यांचे शेअर्स घेण्याविषयीं आग्रह करतों."

इतक्यांत आप्पासाहेबांच्या आचाऱ्यानें चहाचें साहित्य व ट्रे टेबलावर आणून ठेवला. आप्पासाहेबांनीं चहा गाळला. माणेकजींनीं

इंग्रजीपद्धतीनें कपानें चहा घेतला. मी आपला बशींत चहा ओतून चटकन पिऊन टाकला.

चहा झाल्यावर माणेकजी शेटनीं टेबलावरील सिगार उचलला. लगेच आप्पासाहेबांनीं काडी ओढून शेटजींचा सिगार पेटवून दिला. मी सुपारीचें खांड तोंडांत टाकलें आप्पासाहेबांनीं नुसती लवंग घेतली व पुन्हां आमच्या भाषणाला सुरवात झाली.

" आतां बाबूरावजी, कारखाना म्हटला म्हणजे तो मोठ्या प्रमाणावरच असला पाहिजे. एकाच माणसानें रेटियावर सूत काढून नंतर मागावर कापड काढून तें जर बाजारांत विकायला आणलें तर तें फार महाग पडेल. आणि सध्याच्या यंत्राच्या युगांत तरी अशी कांहीं Competition आहे बाबूरावजी, कीं कांहीं विचारूं नका. प्रत्येक वारामागें १ पैसा किंमत कमी कशी करतां येईल इकडे आमचें सारें लक्ष असतें. आणि मालाची किंमत कमी करावयाची म्हणजे माल तयार व्हावयाला जो खर्च लागतो ता कमी करावयचा. आणि हा खर्च कमी करावयचा म्हणजे मोठ्या प्रमाणावर कारखाना काढावयाचा.

एकंदरींत काय बाबूरावजी सध्याच्या युगांत मोठ्या प्रमाणावर कारखाना काढणेंच (Large Scale Production) फार जरूर आहे.

मोठ्या प्रमाणावर कारखाना काढण्यापासून पुष्कळ फायदे आहेत— पण तुम्हाला घरीं जायला उशीर तर होत नाहीं आहे ना बाबूरावजी"

" छे ! छे !" मी मध्येंच म्हणालों " चालूं द्या शेटसाहेब तुमचें बोलणें; आपल्या संभाषणाला आतांतर कोठं रंग येत आहे "

" मोठ्या प्रमाणावर कारखाना काढण्यांत पहिला मोठा फायदा म्हटला म्हणजे कच्च्या मालाची पुष्कळशी बचत ( Economy

of Raw materials ) करतां येते हा होय. लहनशा कारखान्यांत पुष्कळसा कच्चा माल नासधूस होऊन फुकट वांया जातो.

दुसरा फायदा म्हटला म्हणजे यंत्रसामुग्रीची बचत ( Economy of machinery ) हा होय कारखान्याकरतां उत्तमांत उत्तम यंत्रें आणावयाचीं म्हटलीं म्हणजे त्याला पैसा फार लागतो. आणि लहान कारखानदारांना तें कांहीं परवडत नाहीं. तसेंच मोठ्या कारखान्यांत कारखानदाराला निरनिराळ्या तऱ्हेचे प्रयोग (Experiments) करून पहातां येतात. व कोणच्या तऱ्हेनें यंत्राकडून काम करून घेतलें असतां आपल्याला बाजारांत कमी किंमतीनें माल देतां येईल हें ठरवितां येतें. लहान कारखान्यांत हा फायदा मिळणें केव्हांही शक्य नसतें.

तसेंच मोठ्या कारखान्यांत कोळशाची किंवा विजेची पुष्कळ बचत ( Economy of motive power ) करतां येते. ६ हॉर्सपावरच्या एंजीनला २ हॉर्सपॉवरच्या एंजीनपेक्षां तिप्पट कोळसा खात्रीनें लागत नाहीं.

मोठ्या कारखान्यांत जागेची ही पुष्कळ बचत (Economy of Space) करतां येते. लहान कारखान्याला जर एक एकर जमीन लागली तर मोठ्या कारखान्याला दीड एकर जमीन पुरी होते. आणि ज्या ठिकाणीं जमिनीची किंमत चौरस फुटांनीं लागते त्या ठिकाणी जागेची बचत हीं किती महत्वाची गोष्ट आहे याची तुम्ही कल्पना करा बाबूरावजी.

सध्याच्या युगात जाहिराती देणें हें एक मोठें शास्त्र आहे बाबुरावजी.तुमच्या मुंबईच्या डोंगऱ्यांच्या बालामृताच्या जाहिराती तुम्हाला वाटेल तेथें पहायला सांपडतील. जाहिरातीशिवाय त्यांच्या गिऱ्हाइकाला तुमच्या मालाची माहिती होणार कशी ! आणि जाहिराती

पुष्कळ व चित्ताकर्षक जर देतों म्हटलें तर त्याला पैसा नको का पुष्कळ खर्च करायला ? येवढा पैसा फक्त मोठा कारखानदारच खर्च करूं शकतो व म्हणूनच त्याच्या मालाची दूरवर माहिती पोंचून त्याचें गिऱ्हाईक वाढतें."

"तर मग शेटसाहेब" मी म्हणालों "तुमच्या म्हणण्याप्रमाणें मोठ्या प्रमाणावर कारखाने निघणेंच अत्यंत जरूर आहे. राष्ट्राच्या भरभराटीकरतां मोठे कारखानेच निघाले पाहिजेत असेंच तुमचें म्हणणें आहे ना ?"

"होय बाबुरावजी पुष्कळ अंशीं मोठे कारखाने निघणें जरूर आहे असें माझें मत आहे. पण राष्ट्राचा उद्धार मोठाल्या प्रमाणावर कारखाने निघाले नाहींत तर होणारच नाहीं असें मला वाटत नाहीं. एखाद्याच कंपनीचा खूप मोठा कारखाना असण्यापेक्षां लहान लहान चार कंपन्यांनीं सहकारितेच्या तत्वावर जर आपआपले कारखाने चालविले तर मला वाटतें मोठाल्या कारखान्यापासून जे कांहीं फायदे मिळणें शक्य आहे ते त्यांनां मिळूं शकतील पण अशा वेळीं संघ-शक्तीची व सहकारितेची अत्यंत जरूर आहे हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे."

आमचें बोलणें चालू असतानांच दादासाहेब वर आले व त्यामुळें आमचें संभाषण येवढ्यावरच थांबलें. माणेकजी शेट आणखी एक दिवस येथें थांबणार आहेत तेव्हां ते उद्यां काय सांगणार आहेत तें मी प्रथम ऐकून नंतर माझ्या प्रेमळ वाचकांना सांगेन.

## प्रकरण १५ वें.

# माणेकजी शेट यांची मुलाखत (पुढें चालू).

---

### शेअरवाल्या कंपन्या.

दररोजप्रमाणें मी सकाळींच आप्पासाहेबांचेकडे गेलों. माणेकजी शेटचें रा. दादासाहेबांचेकडचें काम पुरें झालें नसल्यामुळें तेही अजून येथेंच होते व तेसुद्धां आमच्या बैठकीला हजर होते. काल माणेकजी शेटनीं कारखाना सुरू करतांना कोणच्या गोष्टींचा विचार करावा लागतो; धंद्याकरतां जागा शोधून काढण्याला कसें चातुर्य लागतें; कारखाने यशस्वी होण्याकरतां काय युक्त्या करणें जरूर आहे इत्यादि गोष्टी थोडक्यांत सांगितल्या होत्या; आणि आजही ते असेंच कांहींतरी मला सांगणार होते. आणि कालच्या माणेकजीं-च्या एकंदरींत सांगण्याच्या पद्धतीवरून माझेंही मत त्यांचेविषयीं फारच चांगलें झालें होतें.

मी जातांच आम्हीं टेबलावरील चहा बिस्किटांचा फन्ना उड-विला, व नंतर आमचे संभाषणाला सुरवात झाली.

"काल ब बूराव आपण कारखाने कोठें व केवढ्या प्रमाणावर काढले असतां ते फायदेशीर होतील हें पाहिलें" माणेकजी शेट सिगारेटचा एक झुरका घेऊन म्हणाले "पण कारखाना काढा-वयाचा तो कशाकरतां? माझ्या घरीं माझ्या भावाचा पेपरमिंटाचा कारखाना आहे. याचा अर्थ कारखान्यांतला सर्व पेपरमिंट आम्हाला घरींच लागतो असें थोडेंच आहे! धंदा करावयाचा म्हणजे एखाद्या वस्तूची खूप पैदास करून नंतर ती वस्तु ज्याला पाहिजे त्याला

विकावयाची; आणि अशी पैदास आपल्याला करतां यावी म्हणून त्या वस्तूंचा कारखाना काढावयाचा.

प्रत्येक धंद्यांत काय किंवा कारखान्यांत काय, तीन गोष्टी मुख्यत्वें-करून करावयाच्या असतात.

पहिली गोष्ट म्हटली म्हणजे धंदा सुरू करावयाला भांडवल लागतें. पैशाशिवाय तर जगांत कांहीं होतच नाहीं. हा पैसा प्रथम आपल्याला, नाहींतर कोणाला तरी, प्रथम घरांतूनच धंद्यांत घालावा लागतो. हा पैसा जो मनुष्य पुरवितो त्याला मराठींत सावकार किंवा "भांडवलवाला" व इंग्रजींत "Capitalist" असें म्हणतात.

पैसा मिळविला; पण नुसत्या रुपयांच्या थैल्यांकडे पाहून किंवा नोटांच्या पुडक्यांकडे पाहून कारखाना थोडाच निघतो. काय तात्या मी म्हणतों तें खरें कीं नाहीं? तुम्हाला मुंबईला गेलें पाहिजे; हजार ठिकाणीं चवकशी केली पाहिजे व चांगल्या एंजिनियरच्या खास सल्ल्यानें जरूर ती यंत्रसामुग्री आणून कारखाना उभा केला पाहिजे.

कारखाना उभा झाला म्हणजे मग खरी धंद्याला सुरवात झाली; ज्याला कारखाना चालवावयाचा असेल त्यानें कच्च्या मालाच्या भावाची चवकशी करीत राहिलें पाहिजे; अनुकूल वेळीं खरेदी करून कच्चा माल कारखान्याला पुरविला पाहिजे. कोणच्या तऱ्हेच्या मालाची बाजारांत मागणी आहे; उद्यां बाजारांत कोणच्या तऱ्हेच्या मालाला मागणी येईल या गोष्टींचा विचार करून त्यानें आपलें धोरण आखलें पाहिजे, लोकांच्या अभिरुचींचा फायदा घेऊन त्यानें त्याप्रमाणें आपल्या कारखान्यांत माल बनविला पाहिजे. इतकेंच नव्हे तर लोकांच्या अभिरुचीला वळण लावण्याचें नाजूक कामही त्यानेंच केलें पाहिजे.

वरील सर्व कामें करणें बाबुराव कठीण आहे. ह्या गोष्टी फक्त अनुभवी व धंद्यांतल्या दर्दी लोकांनांच साधतात. आणि म्हणून अशीं कामें करूं शकणाऱ्या लोकांनां वेतनही जबरदस्त मिळतें. हीं कामें करणाऱ्या मनुष्यांना इंग्रजींत Entrepreneur असें म्हणतात Entreprenewr म्हणजे मराठींत योजक म्हणा पाहिजे तर. ( प्रो. भाटे यांचें अर्थशास्त्र ).

कारखान्यांतलें तिसरें काम म्हटलें म्हणजे मजूर लोकांचेवर देखरेख ठेवणें; कारखाना व्यवस्थित रीतीनें चालतों आहे कीं नाहीं हें पहाणें व Entrepreneur चे हुकूम अमलांत आणणें. हीं कामें करणाऱ्या मनुष्याला इंग्रजींत Employer of labour किंवा व्यवस्थापक असें म्हणतात.

पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें बाबूराव एकच मनुष्य हीं सारीं कामें करी. तुमच्या बाजारआळींतला गंपू चांभारच घ्याना. तोच स्वतःच्या पैशानें चामडीं खरेदी करतो; व दुकानांत जोडे शिवण्याचें यंत्रही आणतो. हीं कामें तो भांडवलवाला या नात्यानें करतो. त्यानंतर दुकानांत नोकर लोक वगैरे नोकरीला ठेवून त्यांचेकडून तो काम करून घेतो, व अशा रीतीनें तो दुकानाच्या व्यवस्थापकाचें ( Employer of labour ) काम करतो. बाजारांत कोणच्या तऱ्हेच्या जोड्याला मागणी आहे; पावसाळ्यांत कोणच्या जोड्याला मागणी वाढेल; दरबार वगैरे सारख्या बड्या प्रसंगीं कोणच्या तऱ्हेचे बूट अमीर लोकांना लागतील इत्यादि गोष्टींचा विचार करून गंपू आपल्या दुकानीं माल बनवितो आणि म्हणूनच त्याला त्याच्या धंद्यांत आज बरकत येते आहे.

प्राचीन काळीं बाबूराव व आजहीसुद्धां पुष्कळशा धंद्यांत वरील तिन्ही कामें एकच मनुष्य करतो. पण मोठ्या कारखान्यांतून तसें

चालत नाहीं. आज जर विदर्भ मिल्सच्या डायरेक्टर लोकांनीं म्हटलें कीं मिल आमची आम्हीच उभी करूं, लोकांच्या पैशाची आम्हाला जरूर नाहीं तर त्यांचें कांहीं चालावयाचें नाहीं. अहो! लहानशी मिल काढूं म्हटलें तर कमींतकमी १५ लाख रुपये लागतात कीं! येवढी मोठी रक्कम एकच मनुष्य कोठून उभी करूं शकणार! तेव्हां विदर्भ मिल्सच्या डायरेक्टरांनां लोकाचें भांडवल घेतलेंच पाहिजे. लोकांचें भांडवल कसें घ्यायचें? कंपनीच्या कांहीं डायरेक्टर लोकांनीं प्रथम एक प्रॉस्पेक्टस् (माहितीपत्रक) छापून काढावयाचा. अशा अशा तऱ्हेची कंपनी वऱ्हाडांत निघणें कसें इष्ट आहे याचीं कारणें त्या जाहीरपत्रकांत द्यावयाचीं. नंतर अशा कंपनीला किती भांडवल असणें जरूर आहे तो आकडा देऊन कंपनी निघाल्यास कंपनीला साधारणतः शेंकडा किती टक्के नफा भागीदारांनां देणें परवडेल तो आंकडा द्यावयाचा. हें हस्तपत्रक (प्रॉस्पेक्टस्) लोक वाचून पहातील. कंपनीचे डायरेक्टरलोक खरोखरच धंद्यांतील मुरब्बी आहेत कीं नाहीं, त्यांचे स्वतःचे किती पैसे या कंपनींत घालण्याची त्यांची तयारी आहे, कंपनीच्या अंतर्व्यवस्थेंत कितपत छब्बूशाही होणें शक्य आहे इत्यादि गोष्टींची ते चवकशी करतील; व शेवटीं त्यांना कंपनीच्या स्थैर्याची खात्री जर पटली तर ते तुमच्या कंपनीचे भाग किंवा Shares विकत घेतील. अशा लोकांचें भांडवल जमवून उभारलेल्या कंपन्यांना Joint Stock Companies किंवा शेअरवाल्या कंपन्या असें म्हणतात.

अशा तऱ्हेच्या कंपन्यापासून बाबूराव पुष्कळ फायदे असतात. पुष्कळ धंद्यांत खूप भांडवल असल्याशिवाय कामेंच होत नाहींत. आगगाडीचा एक मैल रस्ता बांधावयाचा झाला तर लाखों रुपये खर्च होतात. मग सर्व देशभर आगगाड्यांचे रस्ते बांधण्याची तर गोष्ट

बोलावयाला नको. तेव्हां अशा कामीं कंपन्या काढल्याशिवाय कामच होत नाहीं. अहो ! दसकी लकडी एकका बोजा ! तुमच्याजवळ २५ रुपये असले तर तुम्ही त्याचें काय करूं शकाल ? पण त्याच पंचवीस रुपयांचा जर तुम्ही किर्लोस्कर कंपनीचा किंवा विदर्भ मिलचा शेअर घेतलात तर तुमचाही फायदा होईल कंपनीचाही फायदा होईल. पंचवीस रुपयांवर तुम्हाला दरसाल घरबसल्या व्याज मिळूं लागेल, बरें भांडवल वाढल्यामुळें कंपनीचा धंदा जास्त वाढून त्यांनांही आपल्या भागीदारांना जास्त नफा देणें परवडेल.

या असल्या कंपन्यांमुळें लोकांना बाबूराव, लहानसहान रकमा सुद्धां व्यापारांत गुंतवितां येतात.

बरें ! कायद्याप्रमाणें डायरेक्टर लोकांनां कंपनीचे हिशेब सरकारी हिशेब तपासणाऱ्या लोकांचेकडून तपासून घेतां येत असल्यामुळें कंपनीची एकंदर स्थिति काय आहे याची सर्व लोकांनां बातमी असते, तेव्हां कंपनीच्या अंतर्व्यवस्थेंत डायरेक्टर लोकांनां फारशी ढवळाढवळ करावयाला जागा नसते.

अशा कंपन्यांत बाबूराव, भांडवल हिस्सेवाले लोक (Shareholders) पुरवितात. योजकांचें, किंवा कारखान्यात कसा माल तयार करावा, व तो कोणच्या तऱ्हेनें विकावा इत्यादि गोष्टींचा विचार करण्याचें काम (Entrepreneur) डायरेक्टर लोक करतात; व कारखाना चालविण्याचें काम ( Employer of labour ) कारखान्यांतील भारी पगाराचे नोकर करतात."

"पण काय हो शेटसाहेब, तुमच्या सांगण्याप्रमाणें या शेअरवाल्या कंपन्यांमध्यें दोषच मुळीं दिसत नाहींत." मी मध्येंच म्हटलें.

"छट् ! असें कसें होईल. बाबूराव" मंचरजीशेट म्हणाले

"अहो जगांतली अजून एकही शास्त्रीयकल्पना पूर्णावस्थेला पोंचली नाहीं. या कंपन्यांतही दोष आहेतच. आणि त्यांत सर्वांत मोठा दोष म्हणजे हा. या कारखान्यांतील डायरेक्टर लोकांत धाडस नसतें. त्यामुळें त्यांनां व्यापारांत मिळावा तेवढा नफा मिळत नाहीं. मला जर दिसलें कीं, आज कापसाचा भाव सवाशें आहे, पण एक आठवड्यांत तो खात्रीनें दीडशें होईल तर मी माझें सर्वस्व खर्ची घालून कापसाची आजच खरेदी करीन. अहो ! नफा जर मिळाला तर तो सारा माझा एकट्याचाच होणार ना ! पण कंपनीचा डायरेक्टर म्हणेल 'जाऊं द्या ! आपण भलत्याच भानगडींत पडूं नये. येवढी भानगड करून कंपनीला आपण नफा मिळवून दिला तर तो आपल्याला एकट्याला थोडाच मिळणार आहे. विनाकारण अंगावर डाव आला तर ठपका मात्र खात्रीनें येईल; तेव्हां आपल्याला ही पंचाईतच नको.'

दुसरा दोष म्हणजे बाबूराव, अशा कंपन्यांतून डायरेक्टर लोकांत आपसांत भांडणें सुरू होतात, आणि त्यानंतर जो कांहीं गोंधळ सुरू होतो तो कांहीं विचारूं नका. बिचाऱ्या शेअरहोल्डर लोकांचे विनाकारणच हाल होतात व नुकसान होत असतें कंपनीचें. बरें असो.

दिवसेंदिवस बाबूराव, हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर कारखानें निघाल्याशिवाय गत्यंतर नाहीं हें आपण पाहिलेंच आहे. आणि मोठे कारखाने निघावयाचे म्हणजे अशा तऱ्हेच्या शेअरवाल्या कंपन्या निघाल्याच पाहिजेत. लोकांनीं सहकारितेनें अशा कंपन्या काढल्याशिवाय गत्यंतर नाहीं. तुम्हीही बाबूराव शक्य असल्यास विदर्भ मिल्स, किर्लोस्कर कंपनी, ओगले ग्लासवर्क्स् अशासारख्या कंपन्यांचे शेअर जरूर घ्या.

अशा तऱ्हेच्या मोठ्या कारखान्यांतून मजूर वर्गाची जितकी

काळजी घ्यावयाला पाहिजे तेवढी आज दुर्दैवानें घेतली जात नाहीं. त्यामुळ मजूर व कारखानदार यांचे हरहमेश खटके उडून संपापर्यंत पाळी येत; व संपामुळें मजूरांचें तर नुकसान होतेंच. पण कारखाने बंद पडल्यामुळें मालाची पैदास कमी होऊन मालाची किंमत वाढते व संपाचे दुष्परिणाम बिचाऱ्या गिऱ्हाइकांना भोगावे लागतात. पण जाऊं द्या, संप हा आजचा विषय नव्हे. पुढें वेळ आली म्हणजे आप्पासाहेब तुम्हाला या विषयासंबंधानें सांगतीलच.

सध्यां बाबूराव, चोहोंकडे सहाय्यकारी (Co-operative) पेढ्या (Credit Societies) निघत आहेत. सध्यां गरीब लोकांना सावकारांचेकडून शेतीकरतां भारी व्याजानें कर्जाऊ पैसे काढावे लागतात; व ते न फिटल्यामुळें गरीब लोकांची शेती सावकाराचे घरांत जाते. ही आपत्ति टळावी म्हणून तुमच्यासारख्या चार सुखवस्तु लोकांचे रिकामे पडलेले पैसे एके जागीं जमवावेत, एक पेढी स्थापावी. व या पेढीमधून गरीब लोकांना योग्य तारणावर व योग्य व्याजाचे दरानें पैसे कर्जाऊ द्यावेत. अशी या सोसायटीची योजना असते. या सोसायटीला दुसऱ्या गांवच्या सोसयटीकडूनही कर्ज मिळूं शकतें. कल्पना करा तुमच्या सोसायटीचे १५ मेंबर्स आहेत. व दुसऱ्या. सोसायटीचे १० आहेत. तेव्हां ही ' ब ' सोसायटी तुमच्या ' अ ' सोसायटीला जें कर्ज देते तें १५ लोकांच्या एकंदर परीस्थितीकडे पाहून देते. त्यामुळें तुमच्या सोसायटीला कमी व्याजानें पैसे मिळूं शकतात, व म्हणून तुमची सोसायटी तुम्हालाही कमी व्याजानें पैसे देऊं शकते.

बाबूराव, हिंदुस्थान हा शेतकऱ्यांचा देश आहे. आणि लागवणीकरतां हिंदी शेतकऱ्याला नेहमीं कर्ज काढण्याचा प्रसंग यावयाचाच. तेव्हां आपल्या देशांत अशा तऱ्हेच्या परस्पर सहाय्य-

कारी पेढ्यांची किती जरूरी आहे हें सांगण्याची गरज नाहींच. अहो! अशा पेढ्या जितक्या निघतील तेवढ्या पाहिजेतच आहेत म्हणानात. तेव्हां या कामीं तरी सरकार व लोक यांनीं एकदिलानें प्रयत्न करून अशा तऱ्हेच्या पेढ्या खेडोखेडीं स्थापन करविण्याची खटपट केली पाहिजे.

बरें! बाबूराव आज मी तुमचा बराच वेळ घेतला. बाकी मी एकदां बोलावयाला लागलों कीं मला कांहीं सुमारच रहात नाहीं. आज दुपारच्या गाडीनें मला परत नागपूरला जावयाचें आहे तेव्हां आपली मुलाखत आपल्याला येथेंच संपविली पाहिजे. ठीक "Good-bye Gentlemen!" असें म्हणून आम्हां दोघांशीं हस्तांदोलन करून एक नवीन सिगारेट पेटवून मंचरजीशेट धुराचे फवारे सोडीत गेले.

" बाकी एकंदरींत शेट हुशारच बरें का!" मी म्हणालों, "आतां उद्यां काय आप्पासाहेब?"

"आपण संपत्तीच्या उत्पत्तीसंबंधानें बहुतेक बोललों आहोंत बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले. " तेव्हां आतां उद्याचा दिवस या विषयासंबंधानें शेवटलें बोलून. आजचा विषय संपवूं. ठीक नमस्कार बाबूराव. 'आज फार उशीर झाला आहे.'

" नमस्कार"

---

## प्रकरण १६ वें.

# संपत्तीच्या उत्पत्तीचें शेवटलें प्रकरण.

### आप्पासाहेबांचे विचार.

" या बाबूरावजी " नेहमींप्रमाणें मी आप्पासाहेबांचेकडे गेल्यावर आप्पासाहेबांनीं मला म्हटलें. " आज मी संपत्तीची उत्पत्ति या विषयाचें भरतवाक्य म्हणणार आहें. आज जवळजवळ दहा पंधरा दिवस आपण याच विषयासंबंधानें बोलत आहोंत. आतां आजपर्यंतचा स्वयंपाक झाला उद्यांपासून आपण जेवायला सुरवात करूं."

" म्हणजे ! तुमच्या म्हणण्याचा अर्थ तरी काय आप्पासाहेब !" मी म्हणालों, "तुम्ही तरी कधींकधीं असे चमत्कारिक तऱ्हेनें बोलतां कीं कांहीं सोय नाहीं. "

" समजेल ! मी काय म्हणतों याचा अर्थ तुम्हाला पुढल्या चारपांच दिवसांत खात्रीनें कळेल.

बरें असो. आज आपण आतां एकदम आपल्या मुख्य विषयाकडे वळूं या !

आपल्याला असें नेहमीं दिसून येईल बाबूराव, कीं जगांतला प्रत्येक देश कांहीं सारखा सुधारलेला नसतो. युरोपांतील देशांत लोक चैनीनें विमानांतच फिरावयाला जात असतील, तर आफ्रीकन जंगलांतील मनुष्याला अजून आगगाडीही माहीत नसेल. इंग्लंदमधील अवाढव्य कारखान्यांची हिंदी एंजिनियरला पुस्तकांपलीकडे फार कमी माहिती असण्याचा संभव आहे. यावरून तात्पर्य काय बाबूराव कीं, आधिभौतिक सुधारणांची वाढ सर्व देशांत सारखी कांहीं

झालेली नाहीं, येवढेंच नव्हे तर तशी होणें शक्यहीपण नाहीं."

"याचें कारण काय आप्पासाहेब?" मी मध्येंच विचारलें.

"याचें कारण सर्व राष्ट्रें सर्व बाबतींत सारखीं नसतात. प्रत्येक देशांतील हवामान, धर्म, रहाणी, विचार करण्याची पद्धति इत्यादि गोष्टी निरनिराळ्या असतात. इंग्लंडमध्यें एखादा मनुष्य कितितरी तास जरूर पडल्यास काम करूं शकेल; कारण. तेथील हवा थंड आहे. पण हिंदुस्थानांतील उन्हाळ्याचे दिवसांत येथें चांगलें काम होणेंच मुळीं अशक्य होतें. असो.

आपण पाहिलेंच आहे बाबूराव कीं, सध्यां चोहोंकडे आपल्या हिंदुस्थानांत सुद्धां मोठ्या प्रमाणावर कारखाने काढण्याकडे लोकांची प्रवृत्ति होत आहे. सध्यांच्या चढाओढीच्या काळांत कारखाने मोठ्या प्रमाणांत काढल्यावांचून व यंत्रसामुग्रीचें सहाय्य घेतल्यावांचून जगांतील व्यापारांत टक्कर देणें अशक्य झालें आहे.

मोठ्या प्रमाणावर व्यापार करणें, व यंत्रसामुग्रीचे बलावर मालाची पैदास वाढविणें या गोष्टी सध्याचे यंत्राचें युगांत ( Factory Stage ) फारच झपाट्यानें आपली प्रगति करून घेत असल्या, तरी या गोष्टी होणें ईष्ट आहेच; असें आपल्याला प्रत्येक देशांत प्रत्येक वेळीं म्हणतां येणार नाहीं यंत्रसामुग्रीचा प्रसार फारच झपाट्याने होत आहे व होणार असें म्हणणें निराळें, व तसें होणें ईष्ट आहे असें म्हणणें निराळें.

सध्यां बाबुराव, आपण अर्थशास्त्राचे विद्यार्थी आहोंत. जगांतील अमूक एक गोष्ट चांगली कीं नाहीं हें ठरविण्याचें काम आपलें नाहीं. जगांत अमूक एक पद्धति यशस्वी होत आहे, हिंदुस्थानांत यंत्रसामुग्रीचा पूर्ण उपयोग करून घेण्याची प्रवृत्ति बलवत्तर होत आहे एवढें आपण पाहिलें म्हणजे आपल्यासारख्या विद्यार्थ्यांचें

काम संपलें. चरक्यावर सूत काढून हातमागावर त्याचें कापड विणून तें विकणें हें चांगलें कीं कापडाच्या गिरणींत कापड बनवून तें विकणें चांगलें हा आपल्यापुढें प्रश्न नाहीं. मोठमोठाले अर्थशास्त्रज्ञ व डॉक्टर रे यांच्यासारखे अनुभवी लोक हा प्रश्न सोडवितील. आपल्याला आज फक्त डोळे उघडे ठेवून पाहावयाचें आहे. चरका उपयोगी पडत आहे का? पडत असल्यास कोणत्या कारणांनीं? त्याचा उपयोग व्यवहारांत होत नसल्यास असें कां होतें येवढयाच गोष्टींसंबंधानें आपल्याला विचार करावयाचा आहे.

" मी तुम्हांला एक प्रश्न विचारूं का आप्पासाहेब? " मी मध्येंच म्हणालों.

" हो हो! आप्पासाहेबांनीं उत्तर दिलें. एकच कां. वाटेल तेवढे विचारा कीं. मला उत्तर देतां आलें तर मी देईन; नाहींतर देतां येत नाहीं म्हणून सांगेन. त्यांत काय येवढें!"

"तर मग तुम्हींच सांगा आप्पासाहेब, तुमच्या मताप्रमाणें जगाच्या सध्याच्या यंत्रयुगांत मोठाले कारखाने निघणें अपरिहार्य झालें आहे; होय ना?"

" होय " आप्पासाहेब म्हणाले.

" बरें तर. मोठाले कारखाने निघणें जरूर आहे व त्या प्रमाणें ते निघत आहेत. मग जग सुखी कसें होत नाहीं आप्पासाहेब?"

"सुख ही इतकी स्वस्त चीज नाहीं बाबूराव. पण कांहो! तुम्हाला आज जगाच्या सुखाची फारशी काळजी दिसत आहे?

आपल्या भाषणांतला विनोद जरी सोडून दिला तरी एक गोष्ट बाबूराव आपल्याला स्पष्ट दिसते आहे; आणि ती ही कीं, संपत्तीची जरी झपाट्यानें वाढ होत आहे तरी तिची विभागणी ( Distribution ) व्हावी तशी होत नाहीं. पैशाकडे पैसा जातो म्हणतात

ना ? तसेंच होत आहे सध्यां. भांडवलवाले लोक ( Capitalists ) श्रीमंत होत आहेत; दोन मोटार ठेवण्याऐवजीं चार ठेवीत आहेत; इकडे स्वतःच्या घामानें संपत्तीचा येवढी जबरदस्त पैदास करणारा मजूर, भिकारीच रहात आहे. अर्थशास्त्रज्ञ लोकांच्या बाबूराव ही गोष्ट ध्यानांत आलेली आहे. संपत्तीची ही होत असलेली तऱ्हेवाईक वांटणी पाहून आपलें कुठें तरी चुकत आहे ही गोष्ट सर्वांच्या ध्यानांत आलेली आहे. मजूराला सध्यां आहे त्यापेक्षां जास्त संपात्ति मिळाली पाहिजे याविषयीं आतां फारसा मतभेद राहिला नाहीं. प्रत्येक राष्ट्रांतील मजूरवर्ग आपलें संघटन करीत आहे; पन्नास वर्षा-पूर्वी मजूर प्रधानमंडळ ही कल्पना कितीही हास्यास्पद वाटत असली तरी १९२४ सालीं इंग्लंडमध्यें मजुरांचा पुढारी मॅकडोनाल्ड् यानें खूप शर्थीनें राज्यकारभार हांकला आहे.

सध्यांच्या यंत्रसामुग्रीच्या युगांतील दोष कसे घालवून यावेत व संपत्तीची जास्त हितकर अशी कशी वाटणी करावी या संबंधानें खूप चर्चा सध्यां चालू आहे. सहकारी तत्वावर कारखाने चालवावेत; ( Co-operation ) अथवा सर्व मोठाले कारखाने सरकारी मालकीचेच करून टाकावेत; अथवा विवक्षित व ठरावीक उत्पन्नाचे वर होणारें सर्व उत्पन्न सरकारजमा करून घ्यावें; (Capital levy ) असे नाना उपाय सुचविले जात आहेत. कोणचा उपाय चांगला हें ठरविणें कालाचे स्वाधीन आहे.

असो बाबुराव, आज संपत्तीची उत्पात्ति हा आपला विषय संपला. माझी सुटीही आतां थोडी राहिली आहे. आतां पुढच्या चार पांच दिवसांत आपण संपत्तीचा व्यय कसा होतो या विषयासंबंधानें थोडासा विचार करूं. कबूल आहे कीं नाहीं तुम्हाला बाबूराव? माझें म्हणणें ?"

" मला कबूल नसायला काय झालें आप्पासाहेब. बरें असो तुमच्या या सुटींत आपण अर्थशास्त्राचा आणखी एक विभाग तरी संपविला पाहिजे बरें का आप्पासाहेब. बरें येतों आतां नमस्कार आप्पासाहेब.

# सुलभ अर्थशास्त्र

## पुस्तक दुसरें.

# संपत्तीचा विनियोग.

## प्रकरण सतरावें.

# मनुष्याच्या गरजा.

" काय अप्पासाहेब " मी आप्पासाहेबांचे घरीं नेहमींप्रमाणें गेल्याबरोबर म्हणालों " संपत्तीच्या संबंधानें आपण इतके दिवस बोललों. उत्तमराव देशमूख शेती विकत घेतांना, व तींतून पीक काढतांना कोणत्या गोष्टींचा विचार करतात हें आपण पाहिलें. संपत्तीची वाढ होण्याकरितां मनुष्याच्या श्रमांची किती जरूरी आहे ह्याचा विचार आपण केला. जमीन व मनुष्याचे श्रम यांचे जोडीला भांडवलाची जर जोड मिळाली, तर संपत्तीची वाढ किती झपाट्यानें होऊं शकते हें आपल्याला जगू गवळ्याच्या उदाहरणावरून दिसून आलें. जमीन, श्रम, व भांडवल या सर्वांचा योग्य उपयोग करून घेण्याकरतां कारखानदाराला धंद्याची मांडणी कशी करावी हें समजणें किती जरूर आहे हेंही आपल्याला कळलें. अशा तऱ्हेनें संपत्तीच्या उत्पत्तीसंबंधानें तुम्ही मला पुष्कळ माहिती दिली. आतां आज आपण कोणच्या विषयासंबंधानें बोलायचें ? "

" बोलायची इच्छाच असली कीं नाहीं बाबूराव, कीं आपल्याला हवे तेवढे विषय आहेत बोलायला. "

" पण आपल्याला अर्थशास्त्राविषयींच बोलायचें आहे आप्पासाहेब " मी मध्येंच म्हणालों. आप्पासाहेब वाटेल त्या विषयावर बोलूं शकतात, हें मला माहीत होतें. आणि म्हणून मला मध्यें पडावें लागलें. अप्पासाहेबांचेकडून शक्य तोंपर्यंत अर्थशास्त्राची माहिती करून घ्यावी हा माझा हेतु आप्पासाहेबांच्या इतर गोष्टींचेमुळें कदाचित् साध्य झाला नसता; आणि तें मला नको होतें.

" मी तें विसरलों नाहीं बाबूराव " आप्पासाहेब हंसत हंसत म्हणाले. " या सुटींत आपल्याला अर्थशास्त्रासंबंधानेंच फक्त बोलायचें आहे, हें माझ्या चांगलें ध्यानांत आहे.

" बरें बाबूराव आपण संपत्ति मिळावी म्हणून इतका प्रयत्न करतों तो कशासाठीं ? "

"कशासाठीं म्हणजे ? अहो संपत्ति आपल्याला पाहिजे ती आपल्याला तिचा उपभोग घेतां यावा म्हणून !" मी उत्तर दिलें.

" तें मला समजलें बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले " संपत्तीचा उपभोग घ्यावा हें ठरलें. पण उपभोग घ्यायचा म्हणजे तरी काय करायचें?"

" उपभोग घ्यायचा म्हणजे आपल्या सुखाकरतां संपत्ती खर्च करायची " मी उत्तर दिलें.

" ठीक बोललांत बाबूराव. संपत्ति खर्च करायची हा आपला उद्देश असतो हें बरोबर आहे. आणि आपल्या सुखाकरतां म्हणजे काय बरें ? "

" काय प्रश्न करतां आप्पासाहेब तुम्ही मला. अहो आपल्याला ज्या गोष्टींची जरूर त्या गोष्टी आपल्याला मिळाव्यात म्हणून आपल्याला संपत्ति खर्च करायची असते. "

" आतां ठीक जुळलें" आप्पासाहेब म्हणाले आपल्याला ज्या गोष्टींची किंवा वस्तूंची ( Things ) जरूर आहे त्या गोष्टी आपल्याला मिळाव्यात म्हणून आपण पैसा खर्च करतों; व हा खर्च करायला आपल्याजवळ संपत्ति पाहिजे म्हणून आपण ती मिळविण्याचा किंवा तिच्यांत भर घालायचा नेहमीं प्रयत्न करतों.

संपत्तीच्या उत्पत्तीसंबंधानें आपण इतके दिवस बोललों. ती संपत्ति आपल्याला कां पाहिजे हेंही आपण आतांच पाहिलें. संपत्ति

पाहिजे कशाला ? संपत्तीच्या योगानें आपल्याला इच्छित वस्तू मिळा-ण्यात म्हणूनच ना ? तेव्हां आतां आपल्याला कोणच्या वस्तूंची जरूर भासते ह्या गोष्टीचा विचार करणें ओघानें प्राप्त झालेंच; कारण आपल्या कोणच्या गरजा ( Wants ) आहेत हें ठरलें, कीं त्या पूर्ण करून घेण्याकरतां त्या गरजा पुरविण्याकरतां आपल्याला संप-त्तीचा व्यय केला पाहिजे; हें कोणालाही सहज समजेल.

" एकंदरींत आतां आपण संपत्तीच्या व्ययासंबधानें बोलणार आहोंत " मी मध्येंच म्हटलें.

"बरोबर ओळखलें बाबूराव तुम्ही" आप्पासाहेब म्हणाले "संपत्तीचा व्यय कां करायचा हें आपण पाहिलेंच आहे संपत्तीचा व्यय कां करा-यचा म्हणजे संपत्तीच्या योगानें आपण आपल्या गरजा पुरवून घ्याय-च्या. आपल्या खिशांतले पांच रुपये खर्चायचे आणि त्यांचे तांदूळ आणून ठेवायचे; अशा रीतीनें आपल्याला दररोज भात खाण्याची जी गरज भासते ती पुरवून घ्यायची. या दृष्टीनें जर आपण पाहिलें तर संप-त्तीच्या व्ययासंबधानें विचार करायचा म्हणजे मनुष्याच्या गरजा काय आहेत, व त्या कशा पूर्ण करून घ्यायच्या याचा विचार करायचा. Study of Consumption is the study of wants and their satisfaction.

आतां बाबूराव मनुष्याला गरजा तरी कसच्या असतात हें आपण पाहूं या. आपण जर अगदीं खेड्यांतला एखादा मनुष्य पाहिला तर असें आढळून येईल कीं त्याच्या गरजा अगदीं थोड्या आहेत. पोटाला पुरेशी भाकरी मिळाली, व लज्जारक्षणार्थ थोडेसें वस्त्र मिळालें म्हणजे झालें. पण तोच आपण जर शहरांतला एखादा मनुष्य घेतला तर त्याला कितीतरी गोष्टींची

जरूरी भासते असें आपल्याला दिसेल. शहरांतला मनुष्य सकाळीं उठला कीं त्याला चहा लागतो. जेवायच्या वेळीं त्याला साजूक तूप, एक दोन भाज्या, गरम पोळी, आमटी इतके पदार्थ अगदीं जरूर म्हणून लागतात. ऑफीसमध्यें जायचें म्हणजे त्याला अगदीं अपटु-डेट कटचा सूट लागतो. सायकल लागते. दोन वाजतांच्या सुटींत चहा लागतो. संध्याकाळीं सकाळच्या सारखेंच उत्तम जेवण लागतें. त्याला बसायच्या जागीं उत्तम सामान ( Furniture ) पाहिजे. असतें. एक ना दोन! कितीतरी अशा तऱ्हेच्या वस्तूंची शहरांतल्या माणसाला गरज भासते. संध्याकाळीं ऑफिसमधून आपला युवक परत आला कीं त्याला क्लबमध्यें जायचें असतें; तेव्हां ऑफीस सूट काढून ठेवून खेळायचा कोट, टेनीसचे बूट, एक उत्तम गोल्डमेडल टेनीसची बॅट या गोष्टींची त्याला जरूर लागते.

यावरून एक गोष्ट तुमच्या ध्यानांत येईल बाबूराव, कीं पहिल्या-प्रथम मनुष्याला ज्या गरजा असतात त्या पुरविण्याकरतां त्याला काम करावें लागतें. पण पुढें जसजशी एकंदर रहाण्याच्या पद्धतींत सुधारणा होऊं लागते, तसतसा आपल्याला निराळाच प्रकार दिसायला लागतो. पुढें आपल्याला अमकें एक काम करायचें हें ठरल्या-वर तें काम आपल्या हातून पुरें व्हावें म्हणून कांहीं गोष्टींची जरूर भासते.

आपला खेड्यांतला मनुष्य काम करतो कां? तर त्याला पोटाला भाकरी पाहिजे असते. आणि ती भाकरी त्याला काम केल्याशिवाय मिळत नाहीं. येथें त्या मनुष्याला आपल्या गरजा पुरवून घेण्या-करतां काम करावें लागते. शहरांतल्या मनुष्याला संध्याकाळीं क्लब-मध्यें जायचे असतें आणि म्हणून त्याला स्पोर्टींगसूटची जरूर लागते. या ठिकाणीं मनुष्याला काहीं काम करायचें असतें, आणि

त्यामुळें त्याच्या गरजा वाढतात; आणि म्हणून एका इंग्रजी अर्थशास्त्रज्ञानें म्हटलें आहे कीं In earlier days wants create activities; but afterwards activities create wants. साधारणतः कोणच्याही मनुष्याला बाबूराव तीन गोष्टींची अत्यंत जरूर असते. पुरेसें अन्न, लज्जारक्षणार्थ थोडासा कपडा व अंग टाकायला थोडीशी जागा या तीन गोष्टी मनुष्याला अत्यावश्यक आहेत. आतां बाकीच्या वस्तू जरूर आहेत कीं नाहीं हें प्रत्येक माणसाच्या एकंदर परिस्थितीवरून आपल्याला ठरवितां येईल. दरमहा तीन हजार रुपये मिळविणाऱ्या दिवाणसाहेबांना मोटार ही अगदीं जरूर वाटेल; दरमहा आठ नऊशें रुपये वकीलींत मिळविणाऱ्या बॅरिस्टर भालचंद्रांना मोटार ही पाहिजे अशी वस्तू वाटेल, व आपल्या गणबाचे मनांत मोटार घेण्याविषयींचे विचार स्वप्नांतही यायचे नाहींत.

आतां बाबूराव आपण आपल्या गरजा या आहेत तरी काय? व त्यांच्यांत मुख्य गुण कोणचे आहेत याचा विचार करूं.

आपण कितीतरी गोष्टी अगर वस्तू आपल्याला पाहिजेत असें म्हणत असतों. आपल्याला चांगलें अन्न पाहिजे; उत्तम घर पाहिजे; फॅशनेबल कपडे पाहिजेत; सायकल पाहिजे; मोटार पाहिजे; आणखी कितीतरी गोष्टी पाहिजेत. मुलांना विचारलें तर ते कितीतरी खेळायच्या वस्तू पाहिजेत म्हणून म्हणतील. बायकांना विचारलें तर त्या तुम्हाला निरनिराळ्या तऱ्हेच्या सोन्याच्या व मोत्यांच्या दागिन्याची एक यादीच सांगतील. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते. आणि ती ही कीं, मनुष्याच्या गरजा प्रत्येकाच्या विविक्षित परिस्थितीप्रमाणें नाना तऱ्हेच्या ( varied ) असतात. सर्व गरजा मनुष्याला पुरविणें शक्य नसल्यामुळें, त्यापैकीं ज्या गरजा पुरविणें मनुष्याला जास्त

जरूर वाटतें, त्या गरजा मनुष्य प्रथम पुरवितो; तसेंच एकदां आपण एक गरज पुरवून घेतली कीं आपल्याला तेवढें समाधान होतें. पुढें आपल्याला दुसऱ्या जास्त गरजा लागूं लागतात ही गोष्ट अलाहिदा आहे.

"थोडक्यांत सांगायचें म्हणजे बाबूराव कीं"

मनुष्याच्या गरजा पुष्कळ आहेत; त्या पुरवून घेणें मनुष्याला शक्य आहे. आणि मनुष्य आपल्या परिस्थितीप्रमाणें आपल्या गरजा पुरवून घेत असतो. हेंच ना सांगणार होतांत तुम्ही आप्पासाहेब?" मी मध्येंच म्हटलें.

"होय बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले, "मला गरजांसंबंधानें तुम्हाला काय सांगायचें होतें तें मी तुम्हाला सांगितलें व तुम्हाला तें समजलेंही आहे. आतां फारच थोडें तुम्हाला सांगायचें राहिलें आहे.

जगांतील सुधारणा जसजशी वाढत जाते बाबूराव, तशतशा माणसाच्या गरजाही वाढूं लागतात. आपल्या वऱ्हाडांत टेलिफोन नाहीं व आपल्याला त्याची गरजही भासत नाहीं. पण मुंबईच्या साधारण खाऊन पिऊन सुखी असणाऱ्या माणसाला आपल्या घरीं फोन असला तर बरें असें वाटूं लागतें मनुष्याचें ज्ञान वाढलें किंवा तो थोडे दुसरे देश पाहून आला कीं त्याच्या गरजा वाढतात. साधू लोक कांहींहीं म्हणोत बाबूराव, पण साधारण व्यवहारांत जितकी जास्त सुधारणा तितका मनुष्याचा व्याप जास्त, व तितक्या त्याच्या गरजा जास्त असेंच तुम्हाला नेहमीं आढळून येईल.

तसेंच आणखी एक मुख्य मुद्दा आपण ध्यानांत ठेवायला पाहिजे. आपण जेव्हां आपल्या गरजांसंबंधानें बोलतों तेव्हां ज्या गरजा आपण पैशानें तृप्त करून घेऊं शकूं अशा गरजांसंबंधानेंच बोलतों. अर्थशास्त्रांत जी गोष्ट पैशानें आपल्याला मोजतां येईल तेवढ्याच संबंधा-

नें आपल्याला विचार करायचा हें आपण अगोदरच ठरविलें आहे. तेव्हां अधिकारलालसा, तसेंच साधूंची मोक्षलालसा या कितीही जरी उदात्त गरजा असल्या तरी त्यांना आपल्या अर्थशास्त्रांत जागा नाहीं. अर्थशास्त्र हें सामान्य लोकांच्या व्यवहाराचें शास्त्र आहे. हें संत तुकाराम अशा सारख्यांचें चरित्र नव्हे.

असो बाबूराव आज आपण येथेंच थांबू या. उद्यां मनुष्याला कोणच्या गोष्टी आवश्यक आहेत व कोणच्या चैनीच्या आहेत याविषयीं आपण थोडेंसें बोलूं."

"बरें तर मी जातों आतां आप्पासाहेब. नमस्कार" मी म्हणालों.

"नमस्कार."

प्रकरण १८ वें.

# आवश्यक वस्तू, समाजानें जरूरीच्या ठरविलेल्या वस्तू व चैनीच्या वस्तू.

नेहमींप्रमाणें मी आज आप्पासाहेबांचे घरीं ७ वाजतांच जायचा, पण चि. चित्तरंजनकरतां कांहीं कपडे करणें जरूर आहे असा " खास हुकूम " झाल्यामुळें जोशी देशपांडे कंपनींत जाऊन मी कांहीं कपडा खरेदी केला व तो बेडेकर शिंपी यांचेकडे शिवायला देऊन नंतर आप्पासाहेबांचिकडे गेलों. तवळ्यांत मला आठ वाजले. आप्पासाहेब माझी अगदीं वाट पहात बसले होते असें मला दिसलें.

" काय बाबूराव " आप्पासाहेबांनीं मला पहिली सलामी दिली. "आज तुम्हाला यायला उशीरसा झाला ?"

"मला चि. चित्तरंजनकरतां कांही कपडे करायचे होते, म्हणून मला जोशी देशपांडे मंडळींत कापड घेण्याकरतां जावें लागलें; व त्यामुळें मला तुमच्याकडे यायला थोडासा उशीर झाला खरा. " मी म्हणालों.

" पण बाबूराव राजीकरतां कपडे करणें सध्यां जरूरच होतें का ? " आप्पासाहेबांनीं विचारलें. चि. चित्तरंजनला त्याची मावशी प्रेमानें राजी म्हणत असते हें आप्पासाहेबांना माहीत होतें.

" होय आप्पासाहेब. राजीला उघडा तर नाहींना ठेवायचा नेहमीं ? तसेंच त्याला कुठें बाहेर न्यावयाचें असलें म्हणजे थोडेसे चांगले असे रेशमी कपडे असणें जरूर आहे; असें नाहीं का तुम्हाला वाटत ? "

" आणखी नाहीं कांहीं खरेदी केलीत तुम्ही बाबूराव?" आप्पासाहेबांनीं मला हंसत हंसत विचारलें.

"होय आप्पासाहेब, मोने व साने कंपनींतून मीं एक मोठा बिलोरी आरसाही घेतला; पण तो माझ्याकरतां नव्हे. आमच्या शेजारीं ते विश्वनाथपंत रहातात ना? त्यांचेकरतां मीं तो आरसा घेतला. आरशाला किंमत चांगली दहा रुपये पडली. पण विश्वनाथपंतांना बिलोरी आरशाची फार हौस दिसली, आणि म्हणून मी तो आरसा त्यांचेकरतां विकत घेतला. बरें पण आपण आपल्या विषयासंबंधानें बोलूं या आप्पासाहेब आतां."

" पण कांहो बाबूराव, राजीला कांही कपडे जरूर होते हें मला कबूल आहे; पण रेशमी कपडे जे तुम्ही करविलेत ते कशाकरतां?"

" काय चमत्कारीक प्रश्न हा" मीं मनांतच म्हटलें " रेशमी कपडे घालून राजा बाहेर गेला म्हणजे तो सुंदर नाहीं कां दिसत आप्पासाहेब?"

" ठीक बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले. " तुमच्या म्हणण्याप्रमाणें रेशमी कपडे जरी अत्यावश्यक नसले तरी तुम्ही ज्या पद्धतीनें रहातां त्या पद्धतींत नीटपणें रहाण्याला राजीला चांगले रेशमी कपडे असणें जरूर आहे असेंच तुमचें म्हणणें आहे ना?"

" होय" मी म्हणालों.

" मला आतां मोकळेपणानें सांगा बाबूराव, विश्वनाथपंतांना येवढा दहा रुपयांचा बिलोरी आरसा घेण्याची काय जरूर होती? त्यांना मिळणार महिन्याचे सारे ८० रुपये; घरांत चार माणसें, वाढत्या संसारांत आरशावर १० रुपये खर्च करणें जरा चमत्कारीकच नाहीं का?"

"पण त्यांना तशा आरशाची फार हौस होतीना आप्पासाहेब!" मीं म्हटलें.

" मला सुद्धां मुंबईच्या ताजमहाल हॉटेलमध्यें रहाण्याची हौस आहे. आज तुम्ही हौसेकरतां १० रुपये खर्च केलेत. पण उद्यां तुम्हाला पैसे नसल्यामुळें कितीतरी आवश्यक अशा गोष्टी विकत घेणें अशक्य होईल; त्याची काय वाट?

प्रत्येक मनुष्याला बाबूराव अन्नवस्त्र व आंग टाकायला जागा या अत्यंत आवश्यक वस्तू आहेत; हें आपण काल पाहिलेंच आहे. तेव्हां ह्या वस्तू आपण प्रथम हस्तगत करून घेतल्या पाहिजेत. व ह्या गोष्टींचेकरतां आपण आपल्या खिशांतला पैसा प्रथम खर्च करायला पाहिजे. मी तर म्हणतों बाबूराव, ह्या गोष्टींची जरूर आहे म्हणूनच मनुष्य अंगमेहनत करून पैसे मिळवीत आहे. नाहींतर त्यानें केव्हांही उद्योग म्हणून केला नसता. अशा ज्या कांहीं आवश्यक गोष्टी आयुष्यांत मनुष्याला लागतात त्यांना इंग्रजींत Necessities of life म्हणतात.

आतां राजीला रेशमी कपडे जे तुम्ही केलेत ते कशाकरतां? त्याला ते कपडे अत्यंत जरूर होते असें नाहीं. पण तुम्ही ज्या समाजांत वावरतां त्या समाजांत दुसऱ्यांचीं मुलें चांगले कपडे करून हिंडतांना तुम्ही पहातां. अशा समाजांत वावरायचें, म्हणजे तुम्हाला इतर लोकांच्यासारखें रहाणें जरूर वाटतें; आणि म्हणून तुम्ही राजीला रेशमी कपडे करणें जरूर आहे; असें ठरवून त्याला तसे कपडे केलेत. बरोबर आहे ना माझें म्हणणें बाबूराव?"

"होय" मी म्हणालों.

" प्रत्येक मनुष्याला कांहीं सामाजिक बंधनें असतातच. आणि तीं सर्व पाळण्याची मनुष्याला अतोनात इच्छा होते. एके काळचे

सरदार, पण परिस्थितीमुळें गरीबींत दिवस घालवणें भाग झालें आहे. असे कितीतरी लोक या सामाजिक बंधनांकरतां लग्नकार्यादिकांत जरूरीपेक्षां व ऐपतीपेक्षां जास्त खर्च करतात; हें आपण नेहमीं पहातोंच. एका विविक्षित समाजांत रहावें लागतें म्हणून मनुष्याला ज्या गोष्टींची जरूरी भासते, त्या गोष्टींना इंग्रजींत Conventional necessities म्हणतात. मराठींत त्यांना समाजानें जरूरीच्या ठरविलेल्या वस्तू असें म्हणतां येईल. राजीला रेशमी कपड्यांचा अत्यंत जरूरी जरी नसली, तरी तुमच्या सामाजिक दर्जाला राजीनें तसे कपडे घालणें ही गोष्ट तुम्हाला जरूर वाटते ह्यांत वावगें कांहीं नाहीं; आणि म्हणून राजीला रेशमी कपडे तुम्हीं केलेत हें ठीकच केलेंत.

" प्रत्येक मनुष्यानें साधु पुरूष होणें शक्य नाहीं. आपल्याला अत्यंत जरूर अशा गोष्टी मिळाल्या म्हणजे झालें असें प्रत्येक मनुष्य म्हणणें शक्य नाहीं. फार तर काय बाबूराव, आपण आपल्या घरच्या जमाखर्चाकडे जर कधीं नजर फिरविली तर आपल्याला असें आढळून येईल कीं, आपण आपला फार थोडा पैसा अत्यंत जरूरीच्या वस्तूंवर खर्च करतों. पुष्कळसा पैसा आपण तयार केलेल्या सामाजिक बंधनांमुळें जरूर वाटणाऱ्या (Conventional necessities) वस्तूंवर खर्च होत असतो.

तरीपण बाबूराव विश्वनाथपंतानीं १० रुपयांचा आरसा घेणें हें कांहीं ठीक झालें नाहीं. तुमच्या परिस्थितींत तुम्हाला तसा आरसा घेणें शक्य झालें असतें. पण विश्वनाथपंतांच्यासारख्या ८० रुपये मिळविणाऱ्या मनुष्यानें १० रुपये किंमतीचा नुसता आरसा घेणें हा माझ्यामतें पैशाचा दुरुपयोग होय. "

आप्पासाहेब, विश्वनाथपंतांना आपण चैन करावी असें वाटलें तर त्यांत त्यांचें चुकलें कोठें ? मी विचारलें.

" जगांतील चैन अजीबात नाहींशी होणें अत्यंत कठीण आहे. ही गोष्ट शक्य नाहीं हें मला माहीत आहे; पण चैनीला कांहीं तरी मर्यादा पाहिजे. जरूरीच्या वस्तू घ्यावयाचें सोडून मनुष्य जर चैनीच्या वस्तूच खरेदी करूं लागला तर त्याला थोड्याशा क्षणिक सुखासाठीं जरूरीच्या वस्तू न मिळाल्यामुळें पुढें पुष्कळसें दुःख भोगावें लागेल. विश्वनाथपंतांना या महिन्यांत कदाचित् कमी दूध घ्यावें लागेल; कदाचित् हलक्या जातीचे तांदूळ खावे लागतील, कदाचित् त्यांचा कोट फाटला असला तरी या महिन्यांत नवा कोट करणें त्यांना परवडणार नाहीं. अशा हालांत दिवस काढणें जास्त वाईट कीं घरांत लहान आरसा आहे म्हणून वाईट वाटणें जास्त वाईट; याचा विचार तुम्हींच करा बाबूराव.

जगांत सर्वच लोक सारख्या दर्जाचे नाहींत. आणि प्रत्येक माणसाच्या दर्जानुरूप त्याच्या सामाजिक बंधनांनीं ठरवून दिलेल्या गरजा व चैनीच्या वस्तू बदलत असतात. राजीला रेशमी कपडे करणें तुम्हाला जरूर वाटतें. पण तसेंच जर विश्वनाथपंत करूं लागले तर तें क्षम्य होणार नाहीं; त्याचप्रमाणें मिनिस्टर साहेबांना मोटार अत्यंत जरूर वाटली तरी ती तुमच्या बाबतींत चैनीची वस्तूच होईल. कोणची वस्तू जरूर आहे; कोणची अत्यंत जरूर आहे, व कोणची चैनीची आहे हें प्रत्येक माणसाला आपल्या उत्पन्नाप्रमाणें ठरवून घ्यावयाचें असतें, हें आहे साऱ्या गोष्टींचें तात्पर्य. अन्नावर पैसा खर्च करणें, जरूरीच्या कपड्यांवर पैसा खर्च करणें, मुलांच्या शिक्षणाकरतां पैसा खर्च करणें ह्या अत्यंत जरूरीच्या गोष्टी आहेत. चांगले व पुष्कळ कपडे वापरणें, उत्तम लायब्ररी ठेवणें, दागिने करणें ह्या गोष्टी प्रत्येक माणसाच्या परिस्थितीप्रमाणें जरूर अगर चैनीच्या असूं शकतील. बिलोरी आरसा तुमच्या घरांत जरू-

रीचा असला तरी विश्वनाथपंतांच्या घरांत तो एक चैनीची वस्तू होऊन राहील.

आज बाबूराव आपण अत्यंत जरूरीच्या वस्तू, समाजानें जरूरीच्या ठरविलेल्या वस्तू व चैनीच्या वस्तू कोणच्या हें कसें ठरवावयाचें हें पाहिलें. मनुष्याच्या उत्पन्नावर ह्या साऱ्या गोष्टी अवलंबून आहेत. जरूरीच्या वस्तू मिळाल्यानंतर मनुष्यानें चैनीच्या वस्तूंवर पैसा खर्च करणें खात्रीनें वावगें नाहीं. पण जरूरीच्या वस्तू न घेतां चैनीच्या वस्तूंवर पैसा खर्च करणें हा एक माझ्यामतें सामाजिक अपराध होय. असो आज आपण येथेंच थांबू या. उद्यां काय बोलायचें हें आपण उद्यांच ठरवूं.

" बरें आहे येतों तर मी आप्पासाहेब नमस्कार "

" नमस्कार "

---

प्रकरण १९ वें.

# उतरत्या उपयुक्ततेचा सिद्धांत.

---

## माझा चहाचा पेला.

काल मला आप्पासाहेबांचेकडे जावयाला थोडासा उशीर झाला होता म्हणून मला फार वाईट वाटत होतें. आणि म्हणून आज त्यांचेकडे शक्य तेवढ्या लवकर जावें या उद्देशानें मी खूप लवकर उठलों व माझे सर्व प्रातर्विधि आटपून चहाची वाट पहात बसलों. चहा घेऊन नंतर आप्पासाहेबांचेकडे जावें, असा माझा विचार होता. पण घरचा चहा कांहीं लवकर होईना, व तेवढ्यांत आमच्या येथें एक पाहुणे गृहस्थ आल्यामुळें मग तर चहा लवकर मिळेल ही आशाच खुंटली. त्यांचा प्रातर्विधि आटोपून नंतर मग ते चहाला यायचे व मग त्यांचेबरोबर चहा घ्यावयाचा! अरे बापरे! तेव्हां नको तो घरचा चहा असा बेत करून मी आईला सांगून तसाच आप्पासाहेबांचेकडे निघालों. आप्पासाहेबांचे घरीं चहा मिळणार ही माझी पक्की खात्री होतीच.

" यावें बाबूराव " मी गेल्याबरोबर आप्पासाहेब मला म्हणाले. आप्पासाहेबांचे समोर एक लहानसें मेज असून त्यावर आप्पासाहेबांचें चहाचें सामानही होतें. मला आज घरीं चहा न मिळाल्यामुळें माझें लक्ष एकदम चहाच्या केटलीकडे गेलें. आप्पासाहेबांनीं मला चहा घ्या म्हटल्याबरोबर आपण चहा घ्यायचा असें मीं ठरविलें होतें. पण आप्पासाहेबांच्या लक्षांत माझी धांदल आली असावी; कारण ते मला कांहीं चहा घ्या असें म्हणेनात. " काय चमत्कारीक मनुष्य

तरी " मीं मनांत म्हटलें. आप्पासाहेब इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगूं लागले, पण माझें सारें लक्ष होतें चहावर. शेवटीं मी आपण होऊनच टेबलावरची एक कपबशी माझेकडे ओढली, व केटलींतील चहा त्यांत ओतूं लागलों.

" अरे वा! बाबूराव आज चहाची तुम्हाला फार घाईशी! घरीं चहा घेतला नाहींत वाटतें? वाहवा! बरें झालें केटलींत चहा होता म्हणून! बरें घ्या खूप चहा घ्या! काय संपला वाटतें चहा केटलींतला. बरें बिस्किटें तर घ्या थोडीं. आमच्या कुसुमनें केलीं आहेत तीं; अरे हरीराम! चहा तर आण आणखी थोडा."

मी आप्पासाहेबांच्या बोलण्याकडे लक्ष दिलें नाहीं. दोन कप चहा घेतला व थोडीं बिस्किटें खाल्लीं तेव्हां मला बरें वाटलें.

" घ्या हो बाबूराव आणखी एक कप चहा घ्या. "

आप्पासाहेबांच्या आग्रहास्तव मी आणखी एक कप चहा घेतला. पण जेव्हां आप्पासाहेब मला चहाचा सारखा आग्रह करूं लागले, तेव्हां मला त्यांना आतां जास्त चहा घेणें शक्य नाहीं असें सांगावें लागलें. हो! भलत्याच गोष्टींत भीड काय कामाची.

चहापान संपल्यावर मी आप्पासाहेबांना आमचा नेहमींचा विषय सुरू करण्याविषयीं विनंति केली.

"राहूं द्या हो तें सारें बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले. " तुम्हाला चहाची फारच संवय आहे असें दिसतें. चांगलें नाहीं बरें का तें. बरें पण बाबूराव मला एक गोष्ट अगदीं प्रामाणिकपणानें सांगा. तुम्हाला सकाळीं एक कप चहा जर न मिळाला तर फार त्रास होईल नाहीं? सकाळीं चहा मिळण्याकरतां तुम्हीं काय कराल बाबूराव?"

"माझें तर बुवा चहाशिवाय चालतच नाहीं. काय वाटेल तें झालें

तरी मला चहा हा पाहिजेच. हें व्यसन वाईट आहे, हें मला माहीत आहे. पण माझा त्याला इलाज नाहीं" मी म्हणालों.

"चहाला वाटेल ती किंमत द्याल बाबूराव तुम्ही ?" आप्पासाहेबांनीं विचारलें.

"होय आप्पासाहेब" मी उत्तर दिलें. "चहाचा एक कप मिळविण्याकरतां वाटेल ती किंमत मी देईन."

"आणि एक कप मिळाल्यानंतर दुसऱ्या कपालाही तुम्ही तितकीच किंमत द्याल ? समजा पहिल्या कपाला तुम्हीं जर पांच रुपये दिले असले तर दुसऱ्या कपालाही तितकीच किंमत तुम्ही द्याल का?"

"आप्पासाहेब मला दोन कप चहा नेहमीं लागतोच. पण एका कपाला जर पांच पांच रुपये पडूं लागले तर मी फक्त एकच कप घेईन कारण त्याशिवाय माझें चालायचेंच नाहीं" मी उत्तर दिलें.

"पण दुसऱ्या कपाला तुम्ही तीन रुपये तरी खात्रीनें द्याल ना?. तुम्हाला चहा मिळणें अगदीं अशक्य झालें आहे अशा अडचणीच्या वेळेसंबंधानेंच आपण बोलतों आहोंत हें तुम्ही ध्यानांत ठेवा बरें का बाबूराव !" आप्पासाहेब म्हणाले.

"होय माझ्या ध्यानांत आहे तें" मी म्हणालों. "दुसऱ्या कपाकरतां मी तीन रुपये देईन; कारण मला दोन कप नेहमीं लागतातच.

"आणि तिसऱ्या कपाला बाबूराव ?" आप्पासाहेबांनीं विचारलें.

"छे ! छे ! मला तिसरा कप लागतच नाहीं. आणि म्हणून मी तिसरा कप फुकट मिळाला तरी तो घेणार नाहीं. आतांच नाहींत का पाहिलेंत तुम्ही ? मी तिसरा कप घेतला तो फक्त तुमच्या आग्रहाकरतांच घेतला. पण यांपेक्षां जास्त चहा घेणें मी अजीबात

नाकारलें. पण तें जाऊं द्या आप्पासाहेब आज तुम्ही मला अर्थशास्त्रा-संबंधानें काय सांगणार आहांत? मी विचारलें. "

" मी काय सांगणार अर्थशास्त्रासंबंधानें तुम्हाला ! " आप्पासाहेब हंसत हंसत म्हणाले. " तुम्हीच तर मला आतां अर्थशास्त्रांतला एक सिद्धान्त समजाऊन देत आहांत. "

" मी तुम्हाला एक सिद्धान्त समजाऊन देत आहें! " मी आश्चर्यचकीत होऊन आप्पासाहेबांना विचारलें.

" होय तुम्हीच ! " आप्पासाहेब मला म्हणाले. " तुम्हीच मला सांगितलेंत कीं, मला ज्या वेळेस चहाची अत्यंत जरूर भासते त्या वेळेस मी एका चहाचे कपाला पांच रुपये सुद्धां देईन. मला दोन कप नेहमीं लागतात, म्हणून मी दुसऱ्या कपाला तीन रुपये सुद्धां देईन. जास्तच किंमत पडायला लागली तर एकाच कपावर माझी तहान मी भागवीन. तिसऱ्या कपाला मी कांहींही किंमत देणार नाहीं कारण मला त्याची जरूर लागत नाहीं. तुम्हींच सांगितलेंत ना मला हें सारें ?

"होय आप्पासाहेब" मी म्हटलें. " पण यांत अर्थशास्त्राचा कोणचा सिद्धान्त मी तुम्हाला सांगितला हें मला बरोबर कळलें नाहीं. "

" तुम्ही जशी चहाची गोष्ट सांगितलीत तशीच आपल्याला जरूर वाटणाऱ्या प्रत्येक वस्तूची गोष्ट होईल कीं नाहीं? आपल्याला एखादे वेळेस अत्यंत जरूर वाटणाऱ्या वस्तूला आपण वाटेल ती किंमत देऊं कीं नाहीं? पण तीच वस्तू आपल्याला जसजशी जास्त मिळत जाईल तसतशी ती आपल्याला तितकी जरूर अशी वाटणार नाहीं; व म्हणून आपण त्याला पूर्वींइतकी किंमत देणार नाहीं; ती वस्तु आपल्याला पुरेशी झाली म्हणजे आपण मग मुळीं तिच्या किंमतीची चौकशीही करणार नाहीं. तुम्हाला पाहिल्या कपाची

जितकी जरूरी वाटली, तितकी दुसऱ्या कपाची वाटत नाहीं. आणि म्हणून तुम्ही दुसऱ्या कपाला पहिल्या कपाइतकी किंमत द्यायला तयार नसतां. तिसऱ्या कपाची तुम्हाला मुळींच जरूर भासत नाहीं; आणि म्हणून तुम्ही तिसरा कप कितीही स्वस्त मिळाला तरी तो घेत नाहीं.

एकंदरींत काय बाबूराव कीं आपल्याला ज्या वस्तूची एखादे वेळीं अत्यंत जरूरी भासते त्या वस्तूला आपण वाटेल ती किंमत द्यायला तयार असतों–"

"पण जसजशी ती वस्तू आपल्याला जास्त जास्त मिळत जाते तसतसा तिचा आपल्याला पूर्वीइतका उपयोग होत नाहीं; आणि म्हणून आपण त्या वस्तूला पुढें कमीकमी किंमत द्यायला लागतों. हेंच सांगणार होतात ना आप्पासाहेब तुम्ही मला? मी मध्येंच म्हटलें.

"होय बाबूराव तुम्हीच चहाचें उदाहरण घेऊन वरील सिद्धान्त प्रस्थापित केलात. इंग्रजींत वरील सिद्धान्ताला The Law of Diminishing Utility म्हणतात. मराठींत त्याला आपण '**उतरत्या उपयुक्ततेचा सिद्धान्त**' असें म्हणूं शकूं. हें मराठीं नांव थोडेसें बोजड दिसतें खरें. पण त्याला इलाज नाहीं. The more of a thing that a man gets, the lesser is the price that he is willing to give for a little more of it."

"तर मग आप्पासाहेब श्रीमंतांना पैशाचीसुद्धां किंमत कमीच वाटत असेल नाहीं?" मी विचारलें.

"अर्थात्" आप्पासाहेब म्हणाले. "तुमच्याजवळ ५ रुपये असले तर तुम्हाला त्या संपत्तीचें जितकें महत्व वाटतें तितकें श्रीमंताला त्या रुपयांचें वाटत नाहीं. उद्यां एका कोट्याधिशाच्या तिजोरींतून हजार रुपये गेले तर त्याला त्याचें कांहींच वाटणार नाहीं.

तुम्हाला तितकेच रुपये हरवल्याबद्दल फार हळहळ वाटेल. पण गणबाचे जर हजार रुपये हरवले तर तो त्या धक्यानें मरून जाईल. अर्थात् तिन्ही ठिकाणच्या हजार रुपयांची जगांतल्या बाजारांत एकच किंमत आहे. पण कोट्याधिशाला त्या हजार रुपयांचें मुळींच महत्व नसतें, तर गणबाला ती आपली सारी दौलत वाटते. जितका जास्त पैसा मनुष्याला मिळूं लागतो तितकें पैशाचें महत्व किंवा त्याची उपयुक्तता त्याला कमी वाटूं लागते.

अशा रीतीनें आज आपण उतरत्या उपयुक्ततेचा सिद्धान्त (Law of Diminishing Utility) काय हें पाहिलें. आज आपण आतां येथेंच थांबू या. उद्यां काय बोलायचें तें उद्यांच ठरवूं."

"बरें तर येतों मी आप्पासाहेब" मी म्हणालों.

"पण एक चहाचा कप तर घ्या." आप्पासाहेब हंसत हंसत म्हणाले.

"छे! छे! मला आतां त्याची मुळींसुद्धां उपयुक्तता (Vitility) भासत नाहीं. बरें तर येतों मी आप्पासाहेब नमस्कार"

"नमस्कार."

---

१०

## प्रकरण २० वें.

# जगूचा बाजार.

## ( सुधारणायुगांतील फायदे. )

नेहमींप्रमाणें मी आप्पासाहेबांचेकडे गेलों. आज आप्पासाहेब मला जरा गडबडींतच दिसले. चौकशी करतां ते रात्रीच्या गाडीनें नागपूरला जात आहेत असें मला त्यांच्या नोकरांकडून कळलें.

"यावें बाबूराव" आप्पासाहेब म्हणाले "आज रात्रीं मी नागपूरला जात आहें हें तुम्हाला कळलें असेलच; हें आणि शिवाय आपला 'संपत्तीचा विनियोग' हा विषयही संपलेलाच आहे. तेव्हां माझ्या जाण्यामुळें तुमचा कांहीं तोटा होईल असेंहीं नाहीं. बरें तर मग! आतां आपण आपल्या विषयालाच सुरवात करूं या.

काल व परवां बाबूराव, आपण मनुष्याच्या एकंदर गरजा काय आहेत हें पाहिलें. मनुष्याला ज्या कांहीं वस्तू "हव्याशा" वाटत असतात त्यांपैकीं कांहीं अत्यंत जरूरीच्या, कांहीं सामाजीक बंधनामुळें जरूर वाटणाऱ्या व कांहीं चैनीच्या असतात. मनुष्याला ह्या सर्व वस्तू पाहिजे असतात. प्रश्न येवढाच असतो कीं, या मिळावयाच्या कशा?–"

आप्पासाहेब पुढें कांहीं बोलणार होते. इतक्यांत त्यांचा एक नोकर जगू त्यांच्याजवळ खर्चाकरतां पैसे मागावयाला आला. दादासाहेब घरीं नसल्यामुळें तो सरळ आप्पासाहेबांचेकडे आला होता.

"ठीक झालें जगू; तू अगदीं योग्य वेळीं आलास" आप्पासाहेब म्हणाले." मी देतों तुला तुझा पगार पण आज पगार घेऊन तूं करणार कायरे जगू त्याचें ?

जगू कांहीं बोलणार इतक्यांत मध्येंच मीं म्हटलें, " पण आप्पासाहेब आपल्याला संपत्तीच्या विनियोगासंबंधानें बोलावयाचें आहे ना? आज जर आपलें बोलणें संपलें नाहीं, तर मला पुढल्या वर्षाकरितां थांबावें लागेल ?

" थांबा हो बाबूराव " आप्पासाहेब मला म्हणाले. आजचें व्याख्यान आपण जगूचेंच करवूं. हं! मग जगू तूं आतां पगार घेऊन करणार तरी काय?"

" मी काय दुसरें करणार आप्पासाहेब " जगू म्हणाला " मला मिळणार सारे चवदा रुपये. त्यापैकीं सात रुपये मला अगोदरच वाण्याचे द्यावयाचे आहेत. घरधानिणीनें कालच बंडाप्पाचे दुकानांतून उधार धान्य आणलें. त्याचे पैसे अगोदर देऊन टाकतों; अन् तसेंच सुंदरलाल शेटचे कापडाचे ६ रुपये द्यायचे आहेत. घास-लेट तेल आणायचें आहे; अन् मग माझ्याजवळ काय फारतर तीन रुपये शिल्लक रहातील; या पैशाचें काय करावयाचें हें ठरवीन मग मी. घरधनीण पुष्कळ दिवसापासून बाळीला चांदीची साखळी करा म्हणते आहे; तेव्हां रुपयाभराची चांदीही घेऊन ठेवीन. तसेंच पुढल्या महिन्यांत सत्यनारायण करायाचा आहे तेवढयाकरतां थोडेसें तूप घेऊन ठेवणार आहें. एखादा शेर तरी तूप घेतलें पाहिजे नारा-यणाकरतां. असा आहे माझा जमाखर्च आप्पासाहेब." जगू म्हणाला.

आप्पासाहेब हे सगळ्या लोकांशीं अगदीं मिळून मिसळून वागत आणि नोकर लोकांशीं त्यांचीवागणूक फारच प्रेमळपणाची असे.

" पण जगू, सध्यां तूप थोडें महाग झालें आहे, हें नाहीं का माहीत तुला ? " मी जगूला म्हटलें.

" तर मग मी पाऊणशेरच तूप घेईन. जास्त पैसे कोठून आणूं गरीब मनुष्य मी ? " जगू म्हणाला.

" हे घे जगू तुझे पैसे " आप्पासाहेब म्हणाले. आणि त्यांनीं टेबलावरील मनीबॅगमधून एक दहा रुपयांची, व एक पांच रुपयांची अशा दोन नोटा जगूला दिल्या " तुझ्या पगाराचे चवदा रुपये आणि एक रुपया मी तुला बक्षीस देतों. पण कायरे जगू आतां या रुपयाचें तूं काय रे करणार ?"

" आतां मी पुरें शेरभर तूप घेईन आप्पासाहेब " जगू म्हणाला " बरें तर जाऊं मी ? रामराम बाबूराव, " जगूनें आप्पासाहेबांचे पायावर आपलें डोकें ठेवलें व नंतर प्रसन्न चित्तानें तो तेथून निघून गेला.

" हं ! मग जगूनें काय सांगितलें बाबूराव आपल्याला ? " कांहीं वेळानें आप्पासाहेबांनीं विचारलें.

" जगूनें महत्वाचें असें कांहींच सांगितलें नाहीं आप्पासाहेब. आज जगूला बाजार करण्याकरतां पैसे पाहिजे होते, आणि हे पैसे कसे खर्च करणार येवढेंच त्यानें आपल्याला सांगितलें."

" पण त्यांतच सर्व कांहीं आलें कीं " आप्पासाहेब म्हणाले, आतां असें पहा बाबूराव, जगू पहिल्या प्रथम वाण्याचे पैसे चुकते करणार आहे. म्हणजे आपल्या पगारांतून तो पहिल्यानें जरूरीच्या वस्तू खरेदी करणार आहे. त्यानंतर उरलेल्या पैशांतून तो कापड घेणार आहे. जगू कांहीं झालें तरी भला मनुष्य आहे, आणि त्याला ज्या समाजांत वावरावें लागतें त्या समाजांत थोडासा चांगला कपडा अंगावर मधूनमधून घालणें जरूर समजलें जातें. एकंदरींत काय बाबूराव कीं जगू पहिल्याप्रथम अत्यावश्यक व सामाजीक जरूरीच्या वस्तू घेण्याकरतां आपला पैसा खर्च करणार आहे; व उरलेल्या पैशाचें म्हणजे फारतर दोन तीन रुपयांचें काय करावें येवढाच त्याचेपुढें प्रश्न पडणार आहे.

आणि बहुतेक लोकांचेंही असेंच असतें बाबूराव. आपण काल

पाहिलेंच आहे कीं, प्रत्येक मनुष्याच्या आवश्यक व अत्यावश्यक वस्तू त्याच्या सामाजीक दर्जाप्रमाणें ठरत असतात. तेव्हां एखादा मनुष्य फार श्रीमंत असला तरी त्याच्या उत्पन्नापैकीं बहुतेक भाग पहिल्या दोन जातींच्या गरजा भागविण्यांतच खर्च होऊन जातो आणि या पैशाचें आतां काय करावयाचें असा प्रश्न फारच थोड्या रकमेच्या बाबतींत त्या मनुष्यापुढें उभा रहातो.

जगू एक शेर तूप सत्यनारायणाकरता घेणार होता. पण तूप महाग झालें आहे असें समजतांच त्यानें पाऊण शेरच तूप घ्यावयाचें ठरविलें. यावरून काय दिसतें आपल्याला बाबूराव ?"

"यावरून आपल्याला असें दिसतें कीं जगूला तूप पाहिजे, पण जर किंमत वाढली तर तो कमी तूप घेईल. म्हणजे बाजारभाव जास्त झाला तर तो आपली खरेदी कमी करील." मी म्हणालों.

"शाबास बाबूराव' आप्पासाहेब म्हणाले. "जगूच्या उदाहरणा-वरून तुम्हाला हा सिद्धान्त कळला कीं भाव जास्त झाला कीं लोक तो माल कमी विकत घेऊं लागतात. त्याचप्रमाणें त्या वस्तूंचा भाव उतरला कीं मग त्यांना ती वस्तू जास्त घ्यावीशी वाटते. पण हा सिद्धान्त त्रिकालाबाधीत मात्र नाहीं. आतां आपण जगूचेंच उदा-हरण घेऊं. मी जगूला चवदाचे ऐवजीं पंधरा रुपये दिले, तेव्हां तूप महाग झालें असूनसुद्धां जगूनें एक शेर तूप घ्यावयाचेंच निश्चित केलें यावरून आपल्या एक गोष्ट ध्यानांत यावयाला पाहिजे, आणि ती ही. मनुष्याचें उत्पन्न वाढलें कीं तो वाढत्या बाजारभावाची फारशी पर्वा न करतां त्याला पाहिजे ती वस्तू जास्त प्रमाणांत खरेदी करतो.

पण ही झाली चैनीच्या गोष्टींची नाहींतर सामाजिक जरुरीच्या (Conventional necessities) वस्तूंची गोष्ट. पण जरूरीच्या

वस्तूंची गोष्टच निराळी असते. आपण येथें एक उदाहरण घेऊं. जगूला दर महिना एक मण ज्वारी लागते असें आपण समजूं. त्यान तितकी ज्वारी घेतली नाहीं तर चालतच नाहीं. घरांतल्या सव मंडळींचीं पोटें तर भरलीं पाहिजेत ना? तेव्हां ज्वारीचा भाव जरी जास्त झाला तरी त्याला एक मण ज्वारी घेणें भागच आहे. त्याचा पगार त्याला पुरेनासा झाला तर तो पहिल्याप्रथम चैनीच्या वस्तू घेणें बंद करील. तेवढ्यानेंही नच भागलें तर तो सामाजीक जरूरीच्या वस्तूही घेणें बंद करील पण ज्वारी ही त्याला घ्यावीच लागेल.

जगूच्या उदाहरणावरून आतां आपल्याला कांहीं सिद्धान्त काढतां येईल कीं नाहीं; हें आतां आपण पाहूं या. तुम्हाला येईल का कांहीं सिद्धान्त काढतां जगूच्या उदाहरणावरून बाबूराव ?"

"मी प्रयत्न करून पहातों आप्पासाहेब" मी म्हणालों "मनुष्याचा बहुतेक पैसा त्याच्या अत्यावश्यक व सामाजीक जरूरीच्या कामींच खर्च होतो. मनुष्याला ज्या वस्तू अत्यावश्यक आहेत त्यांचा बाजारांत भाव जरी वाढला तरी त्याला त्या विकत घेणें जरूरच पडतें. पण दुसऱ्या इतर वस्तूंचें तसें नाहीं. त्यांची किंमत जर बाजारांत उतरली तर मनुष्य त्या जास्त प्रमाणांत विकत घेईल; याच्या उलट त्यांची किंमत जर वाढली तर त्या वस्तू मनुष्य पूर्वीइतक्या प्रमाणांत विकत घेणार नाहीं. अर्थात् हा विचार करीत असतांना मनुष्याचें उत्पन्न तितकेंच राहिलें आहे असें आपण गृहीत धरून चाललों आहोंत हें विसरून उपयोगी नाहीं. बरोबर आहे ना माझें उत्तर आप्पासाहेब!"

"अगदीं बरोबर" आप्पासाहेब म्हणाले. बाजारांतील "वस्तूंच्या भावावरून लोकांच्या त्या वस्तूंच्या मागणींतही फरक होतो. जरूरीच्या वस्तूंच्या मागणींत बाजारभावांतील चढ-

उताराचा फारसा परिणाम होत नाहीं. पण तोच चैनीच्या वस्तूंच्या मागणींत फार होतो. आणि याचें कारणही सोपें आहे. चैनीची वस्तू महाग झाली तर मनुष्य ती घेतच नाहीं; कारण तियाशिवाय त्याचें अडत असतें थोडेंच. पण ती वस्तू जर स्वस्त झाली तर मात्र ती त्याला जितकी जास्त मिळेल तितकी पाहिजे असते. बाजारभावांतील चढउतारावरून वस्तूंच्या मागणींतही जो कमजास्त फरक पडतो त्याला इंग्रजींत 'Elasticity of Demand' असें म्हणतात. Elasticity म्हणजे लवचीकपणा. चैनीच्या वस्तूंची मागणी Elastic आहे; कारण त्यांचा भाव कमी होतांच लोकांची त्या वस्तूंची मागणी एकदम वाढते. अत्यावश्यक वस्तूंची मागणी लवचिक नसते; (Inelastic) म्हणजे तींत बाजारभावांतील चढउतारमुळें एकदम फार फरक पडत नाहीं.

व्यवहारांत जगू जसा वागतो तसेच साधारणत: सारे लोक वागतात. तेव्हां जगू बाजारांत खरेदीच्या वेळीं ज्या तऱ्हेनें विचार करतो त्याच तऱ्हेनें इतर लोक विचार करतात; यावरून जगूच्या खरेदीच्या वेळीं त्या खरेदीला आपण जे नियम लावू तेच साधारणत: इतर लोकांच्या खरेदींना जर लावले तर आपलें कांहीं चुकणार नाहीं.

मला वाटतें बाबूराव, आपण संपत्तीचा विनियोग या विषयासंबंधानें पुष्कळ बोललों. आतां एकाच विषयासंबंधानें विचार करून यंदाची 'व्याख्यानमाला' आपण पुरी करूं या. आज मी नागपूरला जातों आहें. तेव्हां उद्यांपासून तुमची माझ्या बडबडीपासून अनायासेंच सुटका होत आहे.

हें पहा बाबूराव आज मी नागपूरला जात आहें. आगगाडीच्या दुसऱ्या वर्गानें नागपूरला जावयला सात रुपये पडतात. तिसऱ्या वर्गानें

तीन रुपयांत नागपूरला जातां येतें. आतां असें पहा तुम्ही; मला नागपूला तर जावयाचें आहेच, आणि आगगाडी तर नाहीं! तर काय होई? समजा आगगाडी नव्हती त्या वेळीं आमच्या पणजोबांना नागपूला जावयाचें असतें, तर त्यांना घरची गाडी, शिपाई, हवालदार अशा संरजामानिशीं नागपूराला जावें लागलें असतें. अशा प्रवासाला २०० रुपये खर्च सहज आला असता; पण आज मी ७ रुपयांत आमचे पणजोबा गेले असते त्यापेक्षां अधीक सुखानें नागपूरला जाईन. म्हणजे मी आजच्या काळांत, आजच्या सुधारणांच्या काळांत, जन्माला अल्यामुळें नागपूरला जाण्याच्या खर्चांत माझा १९३ रुपयांचा फायदा होत आहे.

आपण दुसरें एक उदाहरण घेऊं बाबूराव. तुम्ही आपल्य चुलत भावाला मुंबईला पत्र लिहितां, दोन पैशाचें कार्ड तुम्हाला हिंदुस्थानांत कुठेंही धाडतां येतें. तुमच्या पणजोबांच्या वेळेला मुंबईस जर पत्र पाठवावयाचें झालें असतें तर त्यांना कोण त्रास पडला असता. तसेंच तुम्हाला एकट्याचें पत्र मुंबईला पाठवावयाचें असतें तरी तें फारच महाग पडलें असतें. एखादा मनुष्य तुम्हाला तेवढ्याकरतां मुंबईला पाठवावा लागला असता. निदान पांच-पंचवीस रुपये तरीं तुम्हाला एक पत्र पाठवावयाला खात्रीनें खर्च आला असता; पण तेंच काम आज जास्त चांगल्या रीतीनें फक्त दोन पैशांत होत आहे. तेव्हां तुम्ही आजच्या काळाचा सुधारणायुगाचा किती फायद घेत आहांत, याची तुम्हीच कल्पना करा. हा आजच्या परिस्थितीचा जो फायदा तुम्ही घेत आहांत त्याला इंग्रजींत Consumer's Surplus असें म्हणतात. Consumer's Surplus म्हणजे गिऱ्हाइकाचा सुधारणांमुळें व आजच्या परि-

स्थितीमुळें जो कांहीं आर्थिक फायदा होतो तो.

मला वाटतें बाबूराव आतां आपण येथेंच थांबूं या ! नागपूरला गेल्यावर मी याच विषयाचा अभ्यास करणार आहें. तेव्हां मी परत येथें आलों की आपण अर्थशास्त्रासंबंधानें पुन्हा आपली व्याख्यान-माला सुरू करूं. पण मी तुम्हाला आजपर्यंत जी कांहीं माहिती दिली तेवढी तर तुम्हाला चांगली समजली ना ?"

" अर्थात् " मी म्हणालों " तुम्ही जें कांहीं मला सांगितलें आहे तें मी सारें लिहून काढून पुस्तकरूपानें प्रसिद्ध करणार आहें. मला तुमची विवेचनपद्धति आवडली तशीच बाकीच्या लोकांनाही ती खात्रीनें आवडेल. आतां पुढच्या सुटींत आपण हा विषय पुढें पुन्हा सुरू करावयाचा; होय ना आप्पासाहेब ?"

" अगदीं तसेंच " आप्पासाहेब म्हणाले " तुमच्यासारखा श्रोता मिळाल्यावर मग मला तुम्हाला जास्त माहिती देण्यांत खात्रीनें उल्हास वाटेल. "

इतक्यांत चहा आला व त्याच्या जोडीला हरीरामनें फराळाचेंही आणून ठेवलें. चहा फराळाचा समाचार घेऊन मी घरीं आलों. आप्पासाहेब त्याच दिवशीं रात्रीं नागपूरला गेले. आप्पासाहेबांनी मला अर्थशास्त्राची जी माहिती दिली ती मला जशी समजली, व ज्या वांकड्यातिकड्या रीतीनें मला लिहिता आली त्या तऱ्हेनें वाचकांचे-पुढें आज ठेवीत आहें व वाचकांना ती आवडेल अशी मला फार आशा आहे.

समाप्त

२७५९